
४२ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



सोलापूर | शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २५१ | पाने १२+४+४ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वराज्याचा अर्थ काही निवडक लोकांचे राज्य असा नाही. त्याचा अर्थ देशाच्या आम जनतेचे राज्य असा आहे. जे आपल्या गावाच्या प्रगतीचा विचार करतात, अशा सर्वच लोकांचे राज्य.

- **भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# जिहादी साहित्यावर 'सर्जिकल स्ट्राईक'



- इसिस, अल-कायदाच्या विषारी प्रचाराला राज्य सरकारचा दणका
- ११४ हून अधिक दहशतवादी मासिकांवर बंदी

### एटीएसच्या अहवालानंतर धडक कारवाई

**मुंबई, ७ ऑगस्ट**

महाराष्ट्रात तरुणांची माथी भडकवून त्यांना दहशतवादाकडे वळवणाऱ्या आणि कट्टरतेचे विष पेरणाऱ्या जिहादी संघटनांवर अंकुश ठेवण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत आक्रमक आणि स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. 'व्हॉईस ऑफ खुरासान' आणि 'नवा-ए-गझवा-ए-हिंद' यासारख्या तब्बल ११४ विषारी आणि राष्ट्रविघातक मासिकांवर व साहित्यावर महाराष्ट्र सरकारने तत्काळ प्रभावाने बंदी घातली आहे.

मुंबई दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) केलेल्या सखोल गुप्तचर तपासणी आणि सायबर पाळत ठेवण्याच्या अहवालानंतर ही धडक कारवाई करण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम ९८ (१) अंतर्गत राज्य सरकारने या साहित्यावर बंदी घालणारी अधिसूचना गुरुवारी जारी केली.

राज्याच्या गृह विभागाने स्पष्ट केले आहे की, हे साहित्य तरुणांचे 'ब्रेनवॉश' करून त्यांना हिंसक जिहादसाठी प्रवृत्त करत होते, ज्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला गंभीर धोका निर्माण झाला होता.

**कोणत्या संघटनांच्या साहित्यावर बंदी?**

राज्य सरकारच्या अधिसूचनेनुसार, हे जप्त केलेले साहित्य प्रामुख्याने 'इस्लामिक स्टेट', 'इस्लामिक स्टेट इन खुरासान प्रोव्हिन्स', 'अल-कायदा' आणि 'हिजबुल मुजाहिदीन' यासारख्या कुख्यात दहशतवादी संघटनांशी संबंधित आहे. या संघटना डिजिटल प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया आणि एन्क्रिप्टेड चॅनेल्सचा वापर करून हे विखारी साहित्य पसरवत होत्या.

**तरुण पिढीला वाचवण्यासाठी कठोर पाऊल**

एटीएसच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांनी १७ मार्च २०२६ रोजी राज्य सरकारला दिलेल्या अहवालात स्पष्ट केले होते की, हे साहित्य बीएनएस-२०२३ च्या अंतर्गत गंभीर गुन्ह्यांस कारणीभूत ठरत आहे. राज्य सरकारने या धोक्याची गांभीर्याने दखल घेत, हे साहित्य डिजिटल किंवा भौतिक कोणत्याही स्वरूपात जवळ बाळगणे, विकणे किंवा प्रसारित करणे यावर पूर्णपणे निर्बंध लादले आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

**बंदी घातलेले प्रमुख साहित्य**

बंदी घातलेल्या साहित्याच्या यादीत 'अल-अझाईम मीडिया'द्वारे प्रकाशित होणाऱ्या 'व्हॉईस ऑफ खुरासान' मासिकाचे अनेक अंक समाविष्ट आहेत. तसेच, अल-कायदाचे 'नवा-ए-गझवा-ए-हिंद', हिजबुल मुजाहिदीनचे 'द रिव्होल्युशनरी रिसर्जन्स' आणि 'काश्मीर किफा' यासारख्या मासिकांचाही यात समावेश आहे. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, 'एक्सप्लोझिव्ह-बेसिक्स' आणि 'पेट्रोल बॉम्ब-मॅन्युअल' यासारख्या बॉम्ब बनवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या साहित्यावरही शासनाने कठोर बंदी घातली आहे. याशिवाय 'हाऊ टू स्टे अनॉनिमस' आणि 'द मुजाहिदीन पॉयझन्स हँडबुक' यासारख्या भयंकर पुस्तकांचाही यात समावेश आहे.

## अमेरिकेत जन्मसिद्ध नागरिकत्वावर बंदी

**वॉशिंग्टन, ७ ऑगस्ट**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याचा निर्णय बेकायदेशीर ठरवत, अमेरिकेत जन्माला आलेला प्रत्येक व्यक्ती देशाचा नागरिक असल्याचा निर्णय गेल्या महिन्यात दिला होता. मात्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी न्यायालयाचा निर्णय मान्य करण्यास नकार देत पुन्हा जन्मसिद्ध नागरिकत्वावरील बंदी लागू केली आहे. त्यांनी शुक्रवारी यासंदर्भातील कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली.

परदेशी नागरिकांच्या अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना नागरिकत्व मिळणार नाही. ◂ (वृत्तसंस्था)



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरण

**मुंबई :** बँकिंग आणि फायनान्शियल क्षेत्रातील शेअर्समध्ये झालेल्या विक्रीमुळे, तसेच कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जागतिक तणावामुळे भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी घसरण पाहायला मिळाली. या घसरणीमुळे गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेला तेजीचा प्रवास थांबला. शुक्रवारी व्यवहार बंद होताना सेन्सेक्स ४५५.५९ अंकांनी घसरून ७८,४९९.१७ वर आला. तर निफ्टी ६५.३५ अंकांच्या घसरणीसह २४,५७०.६५ वर बंद झाला. बजाज फायनान्स आणि बजाज फिनसर्व्ह या कंपन्यांच्या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली.

# पाच हजार कोटींची कर्जमाफी खात्यांत

## राज्यातील ६.२२ लाख शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती!

**मुंबई, ७ ऑगस्ट**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पहिल्या टप्प्यात ६ लाख २२ हजार २०७ पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२९ कोटी रुपयांची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. आषाढीच्या शुभमुहूर्तावर घोषित करण्यात आलेल्या पहिल्या यादीतील शेतकऱ्यांचे आधार ऑथेंटिकेशन पूर्ण होताच ही खाती थेट 'नील' (शून्य) करण्यात आली आहेत, अशी महत्त्वपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

योजनेच्या अंमलबजावणीबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, या योजनेसाठी शेतकऱ्यांना कुठलाही किचकट अर्ज किंवा इतर कागदपत्रांची गरज पडणार नाही. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पात्र शेतकऱ्यांच्या याद्या पाठवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनी केवळ आपले आधार ऑथेंटिकेशन आणि ॲग्रिक नंबर पूर्ण करायचा आहे. जसे जसे खात्यांचे ऑथेंटिकेशन होईल, तसतशी रक्कम थेट डीबीटीद्वारे बँक खात्यात वर्ग केली जात आहे.



**पहिल्या टप्प्यातील विभागनिहाय माहिती**

| विभाग | एकूण शेतकरी | लाभ (कोटी रुपयांत) |
|---|---|---|
| अमरावती | १,५८,१४६ | १,३७२.१७ |
| नाशिक | १,४०,०८९ | १,२०९.३९ |
| छ. संभाजीनगर | १,३०,९३४ | ९३२.६१ |
| पुणे विभाग | १,०४,०६१ | ८६०.९७ |
| नागपूर | ७०,२९० | ५४४.७१ |
| कोकण | १८,६८७ | १०८.८६ |

**महत्त्वाचे ठळक मुद्दे**

- **एनपीए व्याजाचा गैरसमज दूर :** बँकांनी एनपीए खात्यांवर लावलेले जास्तीचे व्याज रद्द केले आहे. त्यामुळे शासन भरत असलेली रक्कम आणि प्रत्यक्ष कर्जखात्यातील रक्कम आता तंतोतंत जुळली असून खाती पूर्णपणे नील झाली आहेत.

- **१२ लाख खाती दुरुस्तीसाठी परत :** सुमारे १२ लाख कर्जखात्यांमध्ये नावे, नंबर मिसमॅच किंवा दुबार नोंदी अशा तांत्रिक त्रुटी आढळल्याने ती बँकांकडे दुरुस्तीसाठी परत पाठवली आहेत.

- **सिबिलवर परिणाम नाही :** ही योजना कुठलेही 'ओटीएस' नसून उरलेली सर्व मुद्दल व व्याज सरकार स्वतः भरत आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याच्या 'सिबिल' स्कोअरवर किंवा भविष्यात नवीन कर्ज मिळण्यावर याचा विपरीत परिणाम होणार नाही. ◂ (तभा वृत्तसेवा)

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी शेगाव येथे घेतले श्रींचे दर्शन



**शेगाव, ७ ऑगस्ट**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे शुक्रवारी सकाळी संतनगरी शेगाव येथे रेल्वेने आगमन झाले. तेथे स्वयंसेवकांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी श्रींच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

मंदिरात त्यांचे आगमन होताच श्री गजानन महाराज संस्थानतर्फे पारंपरिक पद्धतीने टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले. त्यांनी समाधी मंदिरात श्रींचे विधिवत दर्शन घेतले. याप्रसंगी त्यांनी मंदिर प्रशासनाच्या विविध सेवा व सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. संस्थानच्या सेवेकऱ्यांनी त्यांना संस्थानतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध धार्मिक, शैक्षणिक आणि समाजोपयोगी कार्याचा संक्षिप्त आढावा दिला. त्यांचा दौरा दोन दिवसांचा असून, शेगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांमध्ये ते सहभागी होणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पृष्ठभूमीवर मंदिर परिसर आणि शहरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. भाविकांना अडचण होऊ नये यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले होते.


## भारतातील अंतर्गत प्रश्नात नाक खुपसू नका

### परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकी खासदाराला सुनावले

**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

एफसीआरए (परकीय योगदान सुधारणा नियमन कायदा) विधेयकावर इतर देशांच्या नेत्याने आक्षेप घेण्याचे कारण नाही, ही भारताची अंतर्गत बाब आहे. यावर भारतीय संसद निर्णय घेण्यासाठी सक्षम असून, इतरांनी याप्रकरणी नाक खुपसू नये, अशा शब्दांत परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेचे खासदार रिले मूर यांच्या टिप्पणीचा समाचार घेतला.

भारताच्या कायदेशीर बाबींवर देशाच्या संसदेद्वारे निर्णय घेतला जातो आणि ती पूर्णपणे अंतर्गत बाब आहे. परकीय निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणारे नियम केवळ भारतालाच नव्हे, तर अमेरिकेसह अनेक देशांना लागू होतात, त्यामुळे अमेरिकेच्या खासदाराने यावर टिप्पणी करणे आश्चर्याची बाब असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रपरिषदेत सांगितले. मध्यपूर्वेतील जहाजांना तणावावर बोलताना ते म्हणाले, आखाती प्रदेशात भारतीय जहाजे आणि खलाशांची सुरक्षा हे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारतीय खलाशी आणि भारतीय ध्वज असलेल्या तत्काळ मदत पुरवण्यासाठी भारतीय दूतावास, नौवहन मंत्रालय, सागरी अधिकारी आणि स्थानिक संस्थांच्या सतत संपर्कात आहेत.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### पवित्र पोर्टल अंतर्गत प्राधान्यक्रम नोंदणी प्रक्रिया

**सोलापूर, दि.७ ऑगस्ट**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षण सेवक पदभरतीसाठी पवित्र पोर्टल अंतर्गत प्राधान्यक्रम नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ मधील गुणांच्या आधारे ही भरती करण्यात येणार आहे. राज्यभरातील एकूण ३० हजार २०९ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. यात सोलापूर जिल्हा परिषदेसाठी अंदाजे ५०० शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतच्या शाळांमधील एकूण रिक्त शिक्षक व शिक्षण सेवक पदांपैकी ८० टक्के पदांची भरती पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येणार आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २७ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी २,२८,६०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २,११,३०८ उमेदवार प्रत्यक्ष परीक्षेला बसले, तर १,७०,१०८ उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतच्या शाळांमधील रिक्त शिक्षक व शिक्षण सेवक पदांपैकी ८० टक्के पदांची भरती पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील खासगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक अतिरिक्त आहेत. त्यामुळे खाजगी शिक्षण संस्थेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय पवित्र पोर्टल द्वारे खाजगी शिक्षण संस्थांमध्ये भरती न करण्याचे शासन धोरण आहे. त्यामुळे पवित्र पोर्टलद्वारे होत असलेल्या भरती प्रक्रियेत सोलापूर जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक अतिरिक्त असल्यामुळे नवीन भरती होणार नसल्याचे शिक्षण अधिकारी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

### मनोज जरांगे-पाटील यांची उद्या वाटंबरे येथे सभा

**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**



मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांचा पश्चिम महाराष्ट्र प्रत्यक्ष गाठीभेटी नियोजित दौरा शुक्रवार, दि.७ ऑगस्टपासून आयोजित करण्यात आला. रविवार दि.९ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता वाटंबरे (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेस मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुंबईत बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी

**मुंबई :** १५ ऑगस्टपूर्वी मुंबईवर हल्ला करण्याची धमकी देणारा एक ई-मेल महापौर रितू तावडे यांना मिळाला. ई-मेल पाठवणाऱ्याची ओळख अद्याप झालेली नसून, पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांनी मुंबईत सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांना खलिस्तान समर्थक असल्याचे सांगत शुक्रवारी एक ई-मेल आला. त्यात १५ ऑगस्टपूर्वी शहरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली. महापौर कार्यालय, मुंबई मेट्रो, शाळा आणि शेअर बाजाराच्या इमारतीत स्फोट होणार असल्याचे त्यात नमूद होते.

# 'झेडपी'तील दिव्यांग शिक्षकांची पुन्हा पडताळणी; सोलापूरच्या प्रमाणपत्रांवर संशयाची सुई

**▶▶ शासकीय रुग्णालयातून प्रमाणपत्र घेतलेल्या शिक्षकांच्या नोंदींची होणार फेरतपासणी**

**▶▶ ३५ शिक्षकांचे पडताळणी प्रमाणपत्र अद्याप प्रलंबित**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

सोलापूरातील बोगस दिव्यांग प्रमाणपत्र रॅकेट उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील दिव्यांग प्रमाणपत्रधारक शिक्षकांची पुन्हा एकदा कसून पडताळणी करण्याची तयारी सुरू झाली आहे. विशेषतः सोलापूरच्या शासकीय रुग्णालयातून दिव्यांग प्रमाणपत्र अथवा फेरपडताळणी प्रमाणपत्र घेतलेल्या शिक्षकांच्या कागदपत्रांवर संशयाची सुई निर्माण झाली असून, संबंधित प्रमाणपत्रांची नव्याने तपासणी करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे.

सोलापूर शासकीय रुग्णालयातील अधिष्ठातांच्या डिजिटल स्वाक्षरीचा गैरवापर करून बोगस दिव्यांग प्रमाणपत्र तयार करणारे रॅकेट उघडकीस आल्यानंतर राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकरणात वैद्यकीय अधिकाऱ्यासह आठ जणांना अटक करण्यात आली असून, या रॅकेटचे धागेदोरे अहिल्यानगर, नाशिक, नांदेडपर्यंत पोहोचल्याचे तपासात समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाणपत्रांकडे पुन्हा लक्ष वेधले गेले आहे. यापूर्वी शिक्षक बदली प्रक्रियेत दिव्यांग संवर्गाचा लाभ मिळविण्यासाठी काही शिक्षकांनी गैरमार्गाने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवल्याची तक्रार झाली होती. त्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ४३ संशयित शिक्षकांच्या वैद्यकीय तपासणीसाठी मुंबईच्या सर जे. जे. रुग्णालयाकडे पत्र पाठविले होते. त्यापैकी १८ शिक्षकांनी जे. जे. रुग्णालयातून दिव्यांगत्व पडताळणी करून अहवाल जिल्हा परिषदेकडे सादर केला होता.

सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात सध्या ३९७ दिव्यांग शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी ३६२ शिक्षकांनी दिव्यांगत्व पडताळणी प्रमाणपत्र सादर केले असले, तरी ३५ शिक्षकांनी अद्याप पडताळणी पूर्ण केलेली नाही. याशिवाय सोलापूरच्या शासकीय रुग्णालयातून प्रमाणपत्र मिळविलेल्या काही शिक्षकांच्या कागदपत्रांबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ नुसार अपात्र व्यक्तीने दिव्यांगत्वाच्या नावाखाली शासकीय लाभ घेतल्याचे सिद्ध झाल्यास दोन वर्षांपर्यंत कारावास, एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. त्यामुळे या पडताळणी प्रक्रियेकडे संबंधित शिक्षकांसह प्रशासनाचेही लक्ष लागले आहे. यापूर्वी तत्कालीन अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर यांनीही संशयित वैद्यकीय प्रमाणपत्रांची फेरतपासणी मुंबईच्या सर जे.जे. समूह रुग्णालयामार्फत करण्याची शिफारस केली होती. विविध शिक्षक संघटनांनीदेखील पारदर्शक चौकशीची मागणी केली होती.

दरम्यान, बोगस प्रमाणपत्र रॅकेटच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शासकीय रुग्णालयातून दिव्यांग प्रमाणपत्र किंवा पडताळणी प्रमाणपत्र मिळिवलेल्या सर्व शिक्षकांच्या नोंदींची संबंधित विभागामार्फत पुन्हा पडताळणी केली जाणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली. या प्रक्रियेबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे मार्गदर्शनही घेण्यात येणार आहे. या फेरतपासणीतून संशयित प्रमाणपत्रांचा उलगडा होणार का आणि गैरमार्गाने लाभ घेतलेल्या व्यक्तींवर कारवाई होणार का, याकडे आता जिल्हा परिषद वतुळांचे लक्ष लागले आहे.

#### सर्व प्रकरणांची नियमानुसार फेरपडताळणी

सोलापूरच्या शासकीय रुग्णालयातील दिव्यांग प्रमाणपत्रांबाबत उघड झालेल्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आमच्या विभागातील ज्या शिक्षकांनी या रुग्णालयातून दिव्यांग प्रमाणपत्र किंवा पडताळणी प्रमाणपत्र घेतले आहे, त्या सर्व प्रकरणांची नियमानुसार फेरपडताळणी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत कोणावरही अन्याय होणार नाही, मात्र बनावट अथवा संशयास्पद प्रमाणपत्रे आढळल्यास शासनाच्या नियमांनुसार आवश्यक ती कारवाई केली जाईल. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

## 'भगवान रेसिडेन्सी'च्या बांधकाम परवानगीवर प्रश्नचिन्ह

**९६ कथित बेकायदा परवान्यांच्या प्रकरणातील अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात मंजुरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

महापालिकेच्या बांधकाम विभागातील ९६ कथित बेकायदा बांधकाम परवान्यांचे प्रकरण चर्चेत असतानाच अंत्रोळीकर नगर परिसरातील 'भगवान रेसिडेन्सी' या नऊ मजली इमारतीच्या बांधकाम परवानगीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. इमारतीला परवानगी देताना नियम व अटींचे उल्लंघन झाल्याचा आरोप असून, कागदोपत्री नमूद माहिती आणि प्रत्यक्ष बांधकामात तफावत असल्याचे सांगितले जात आहे.



९६ कथित बेकायदा बांधकाम परवान्यांच्या प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातच या इमारतीला परवानगी देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.दरम्यान, विकासक रुपेश भांदुले यांनी महापालिकेकडून वापर परवानगी दिली जात नसल्याची तक्रार नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्याकडे केली होती. त्यानंतर गुप्ता यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्याशी चर्चा केली. या बैठकीला कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती आणि कनिष्ठ अभियंता महेंद्र बोठे उपस्थित होते.

इमारतीची उंची सुमारे ३२.३० मीटर असल्याचे सांगितले जात असून, या उंचीनुसार आवश्यक सुरक्षा निकष पूर्ण करण्यात आले नसल्याचा आक्षेप आहे. दोन लिफ्टची आवश्यकता असतानाही त्याची पूर्तता झालेली नसल्याचे नमूद करण्यात आले. अग्निसुरक्षा नियमांचे पालन, पार्किंगची व्यवस्था आणि आवश्यक मोकळ्या जागेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

तळमजल्याचा वापर बँकेसाठी करण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक जागा राखीव नसल्याचा आक्षेप आहे. अतिरिक्त एफएसआयचा लाभ घेतल्याचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. कागदोपत्री प्रत्येक मजल्याची उंची २.७५ मीटर दाखविण्यात आली. इमारतीची कॅनोपी पूर्णपणे बंद करण्यात आल्याचा तसेच बँकेच्या जागेसमोरील आणि बाजूच्या मोकळ्या जागेत स्टीलचा जिना उभारण्यात आल्याचाही आक्षेप आहे. या जिन्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसतानाही बांधकाम झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

## मिटकलवाडी अॅट्रॉसिटी प्रकरणातील आरोपींचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.७ ऑगस्ट-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ३७६/२०२६ मधील आरोपी जालिंदर मोटे व सोनल झुवरे यांना बार्शी येथील विशेष न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. विशेष न्यायाधीश सूरज व्ही. केंद्रे यांनी हा आदेश दिला.

दि.२८ मे २०२६ रोजी मिटकलवाडी-बेंबळे रोडवरील मलुंकीचा ओढा परिसरात फिर्यादी व त्याच्या मुलावर मारहाण, जातीवाचक शिवीगाळ, चाकूचा धाक दाखविणे आणि १०,२०० रुपये हिसकावल्याचा आरोप करण्यात आला होता.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि तपासाची कागदपत्रे पाहिल्यानंतर न्यायालयाने तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल झाल्याचे, आरोपींकडून आणखी कोणतीही जप्ती करायची नसल्याचे तसेच पुढील चौकशीसाठी त्यांची कोठडी आवश्यक नसल्याचे नमूद केले.

खटला तातडीने सुरू होण्याची शक्यता नसल्याने आरोपींना अनिश्चित काळ कारागृहात ठेवणे योग्य ठरणार नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला.

दोन्ही आरोपींची प्रत्येकी १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर व तेवढ्याच रकमेच्या एक सक्षम जामीनदारावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. यात आरोपींच्या वतीने अॅड.अजिंक्य दत्तात्रय संगीतराव यांनी काम पाहिले.

## 'लोकल ते ग्लोबल'साठी एकत्रित प्रयत्नांची गरज : महापौर कोंड्याल

**राष्ट्रीय हातमाग दिनी विणकरांचा गौरव**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

'लोकल ते ग्लोबल'साठी एकत्रित प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले. राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विणकर बाग येथे हातमागावर काम करणाऱ्या विणकराच्या प्रतीकात्मक पुतळ्यास पुष्पहार अर्पण आणि हातमाग उद्योगात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विणकरांचा गौरव समारंभात ते बोलत होते.

सोलापूरची ओळख हातमाग उद्योग आणि विणकरांच्या कष्टाळू परंपरेमुळे देशभर निर्माण झाली आहे. सोलापुरी चादर, टॉवेल आणि अन्य हातमाग वस्त्रांनी देश-विदेशात ओळख निर्माण केली असून हा वारसा जपणे ही सामूहिक जबाबदारी आहे. विणकर समाजाने मंडलेल्या सात दिवसांच्या हातमाग प्रदर्शनाच्या तसेच कायमस्वरूपी हातमाग संग्रहालय उभारण्याच्या मागण्यांचा महापालिका प्रशासन सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाहीसाठी प्रयत्न करेल, असेही त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ समाजसेवक अशोक इंदापुरे यांनी सांगितले की, सोलापूरच्या हातमाग उद्योगाचा इतिहास जतन करण्यासाठी विणकर बाग येथे दरवर्षी राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सात दिवसांचे हातमाग प्रदर्शन आयोजित करावे, हातमाग उद्योगाचा इतिहास, पारंपरिक विणकामाची साधने, विविध वस्त्रप्रकार आणि विणकर समाजाचा वारसा जतन करण्यासाठी कायमस्वरुपी हातमाग संग्रहालय उभारावे.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे विश्वस्त रामचंद्र जन्नू, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अॅड.श्रीनिवास क्यातम, प्रा.श्रीनिवास कोंडी, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, सोलापूर मार्कंडेय सहकारी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, ज्येष्ठ समाजसेवक अशोक इंदापुरे, शिवसेना उबाठाचे प्रा.अजय दासरी, नगरसेवकद्वय प्रथमेश कोठे, ज्ञानेश्वर म्याकल, सत्यनारायण गुर्रम, विनोद भोसले, अक्षय अंजीखाने, विजय चिप्पा, प्रशांत पल्ली, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, अंबादास बिंगी, नागेश सरगम, नागेश खरात, वासुदेव इपलपल्ली, मुरलीधर आरकाल, रमेश विडप, मल्लिकार्जुन आरकाल आदी उपस्थित होते.

#### या विणकरांचा झाला गौरव

राष्ट्रीय हातमाग दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्रवीण फलमारी, नागनाथ वंगा, विजय बडगु, व्यंकटेश येमूल, महेश सुंचू, सत्यनारायण गंगा, श्रीनिवास अनंतुल, झुंजा या विणकरांचा गौरव करण्यात आला.

## सोलापूरच्या हातमाग उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणार : आमदार देवेंद्र कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

सोलापुरातील विणकर बांधवांच्या कौशल्याचा उपयोग त्यांच्या अर्थार्जनासाठी व्हावा आणि सोलापूरची उत्पादने राज्यभर व देशभरात विकली जावीत यासाठी सोलापूरच्या हातमाग उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याकरिता प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली.



राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयातर्फे विणकर सेवा केंद्राच्यावतीने रामचंद्र बुर्ला मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर महापौर विनायक कोंड्याल, वस्त्र विभागाचे क्षेत्रीय उपायुक्त गजानन वाडेकर, विनय धोटे, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे उपाध्यक्ष अॅड.सिध्देश्वर बुगडे उपस्थित होते.

टॉवेल, चादर, नॅपकिन या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याकडे मागणी केली आहे. विणकर बांधवांनी बाजारातील बदलानुसार आपल्या व्यवसायात बदल करावेत. विणकर बांधवांना केंद्र शासनाकडून योजनेतून ओळखपत्र मिळवून देण्यासाठी शिबिरांचे आयोजन करून ओळखपत्रे देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी नगरसेवक व्यंकटेश कोंडी, भाजपाचे मंडल अध्यक्ष नागेश सरगम आदी उपस्थित होते.

## नई जिंदगी येथील खुनप्रकरणी तीन आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट -**

नई जिंदगी भागात झालेला खुनाचा गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला २४ तासाच्या आत उघडकीस आणण्यात यश आले आहे .पोलिसांनी उमर मौलाली बिराजदार (रा.कस्तुरबा नगर, नई जिंदगी बसवारुढ मठा जवळ, नई जिंदगी सोलापूर) याच्या खून प्रकरणी त्याच्या तीन मित्रांना अटक केली आहे.

मन्सुरअली महंमद नदाफ (वय-२२, रा.सिध्देश्वर गांधी नगर भाग-५, नई जिंदगी सोलापूर), आहद इकबाल सय्यद (वय-२२, रा.मजरेवाडी, सोलापूर), अविनाश दशरथ चव्हाण (वय-२०, रा.बापूजी नगर, मजरेवाडी, नई जिंदगी सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.





दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे १२:१५ वा. ते सकाळी ९:३० वा. चे दरम्यान नई जिंदगी पाण्याची टाकी येथे खून झाल्याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोनि अरविंद माने व त्यांचेकडील तपास पथके, एम.आय.डी.सी पो. ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस. बिराजदार , पो.नि संगीता पाटील, पोलीस उप निरीक्षक अल्फाज शेख व त्यांचे पथकातील अंमलदार, यांनी घटनास्थळास भेट दिली. घटनास्थळाचे परिसरातील सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी सुरु केली . यादरम्यान गोपनीय बातमीदारामार्फत फौजदार अल्फाज शेख यांना माहिती मिळाली की, '' उमर बिराजदार यांचा खुन केलेले तीन इसम हे अक्कलकोट रोडवरील बी.एस.एन.एल टॉवर जवळील मोकळया मैदानात थांबलेले आहेत. '' त्याप्रमाणे पोलिसांनी वरील तिघा आरोपींना ताब्यात घेतले. त्याचेकडे विचारपूस केली असता त्यातील आरोपी मन्सुरअली नदाफ याने सांगितले की, दि. ६ ऑगस्ट रोजी पहाटेच्या वेळेस तो आणि त्याचे मित्र आहद इकबाल सय्यद, अविनाश दशरथ चव्हाण व मयत मित्र उमर बिराजदार असे नई जिंदगी पाण्याचे टाकीखाली गप्पा मारत बसले होते, त्यावेळी त्यांचेत पुर्वी झालेल्या वादावरुन भांडण सुरु झाले. या भांडणात आरोपींनी तीष्ण हत्याराने मारून उमर बिराजदार याचा खुन केल्याची कबुली दिली. वरील तिघा आरोपींना खुनाच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई वपोनि बी.एस. बिराजदार, पोनि संगीता पाटील यांचे मार्गदर्शनाखाली फौजदार अल्फाज शेख, पोअं राकेश पाटील, एकनाथ उबाळे, संदीप जावळे, सचिन भांगे, दिलीप विधाते, आमसिध्द निंबाळ, अविनाश शिंदे, अविनाश डिगोळे, सचिन लवटे, सुहास अर्जुन, अमर शिवशिंगवाले, नागेशसिंह चव्हाण, कुमार बोल्ली, सकलेन मुकादम, अमोल खरटमल, राहुल सुरवसे, अय्याज बागलकोटे, अर्जुन गायकवाड यांनी केली आहे.

## नालेसफाईच्या बिलांत तब्बल ८३ लाखांची तफावत; मनपाच्या तपासणीत बिलांची रक्कम फुगवल्याचे स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

महापालिकेच्या नालेसफाई कामाच्या बिलांमध्ये मोठी तफावत आढळून आली असून, तपासणीत तब्बल ८३ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम समोर आली आहे. मक्तेदाराकडून सादर करण्यात आलेली बिले आणि तपासणीनंतर सुधारित करण्यात आलेल्या बिलांच्या रकमेत मोठा फरक असल्याचे महापालिकेच्या अधिकृत कागदपत्रातून स्पष्ट झाले आहे. ही अतिरिक्त रक्कम मक्तेदाराकडून वसूल करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. असे असतानाही नगर अभियंता सारिका अकुलवार यांनी सभागृहात दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचा आरोप नगरसेवक अनंत जाधव यांनी केला आहे.

महापालिकेच्या नालेसफाई कामासाठी मक्तेदाराने सादर केलेल्या बिलांबाबत मुख्य लेखापाल कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर संबंधित बिले तपासून सुधारित करण्यात आली. तपासणीत काही बिलांमध्ये प्रत्यक्ष देय रकमेपेक्षा जादा रक्कम नमूद झाल्याचे निदर्शनास आले.



कागदपत्रातील 'ए' व 'बी' प्रकारातील बिलांमध्ये एकूण १ कोटी ३५ लाख १ हजार ९१८ रुपयांची रक्कम देय होती. तपासणीनंतर ती रक्कम १ कोटी १९ लाख १६ हजार ५७४ रुपये करण्यात आली. त्यामुळे तब्बल १३ लाख ९३ हजार ३४४ रुपयांची तफावत आढळली. अशाच प्रकारे इतरही ठिकाणी तफावत आढळली आहे. ही रक्कम मक्तेदाराकडून वसूल करण्याचे नमूद करण्यात आले आहे. सुधारित रकमेनुसारच देयक प्रक्रिया करण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे.

'ए', 'बी' आणि 'सी' प्रकारातील बिलांची तपशीलवार माहिती महापालिका आयुक्तांना सादर करण्यात आली आहे. निविदा समितीच्या अभिप्रायानुसार संबंधित मक्तेदाराकडून जादा फरकाची रक्कम वसूल करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८ अंतर्गत नालेसफाईसाठी मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये पुरविण्यात आलेल्या पोकलेन मशिनचे वाहतूक भाडे तसेच इतर बाबींचाही तपशील तपासण्यात आला आहे. आयुक्तांच्या आदेशानुसार रणजित टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांच्याकडून जादा फरकाची रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश जून २०२६ मध्ये देण्यात आले आहेत. असे असताना नगर अभियंता अकुलवार यांनी महापालिका सभेत दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. ही गंभीर बाब आहे असा आरोप करत या प्रकरणी तात्काळ चौकशी पूर्ण करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी नगरसेवक अनंत जाधव यांनी केली आहे.

महापालिकेच्या तपासणीमुळे नालेसफाईच्या बिलांमधील लाखोंची तफावत समोर आल्याने या प्रकरणातील बिलांची मंजुरी आणि प्रत्यक्ष काम याबाबतही आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असे नगरसेवक अनंत जाधव यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाकिस्तान, सौदी, तुर्कीचा संरक्षण करार

## इस्लामिक नाटोच्या स्थापनेची घोषणा, भारत-इस्रायलसाठी धोका

**रियाध, ७ ऑगस्ट**

पाकिस्तान, तुर्की, सौदी अरबने इस्लामिक नाटोच्या स्थापनेची घोषणा करत मक्का संयुक्त संरक्षण करारावर स्वाक्षरी केली. करारानुसार एका देशावर झालेला हल्ला हा तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल. तिन्ही देशांत झालेला करार भारत आणि इस्रायलसाठी धोक्याची घंटा आहे.

सौदी अरबमध्ये सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान, तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगान आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यात झालेल्या बैठकीनंतर करारावर शिक्कामोर्तब झाले. वाढत्या सुरक्षा चिंतेच्या पृष्ठभूमीवर हा करार या तीन देशांमधील सहकार्य अधिक दृढ करेल असे शरीफ यांनी म्हटले आहे. सौदी अरबचे सर्वांत महत्त्वाचे आणि इस्लामचे पवित्र धार्मिक शहर असलेल्या मक्का येथे स्वाक्षरी झालेल्या या नवीन त्रिपक्षीय संरक्षण कराराला 'इस्लामिक नाटो'च्या समकक्ष मानले आहे. सौदीच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पाकिस्तान, सौदी अरब आणि तुर्कीने शुक्रवारी मक्का संयुक्त संरक्षण करारावर स्वाक्षरी केली. कोणत्याही प्रकारच्या हल्ल्यापासून सामूहिक सुरक्षा मजबूत करणे हा याचा उद्देश आहे. करार झालेल्या तीन देशांपैकी कोणत्याही एका देशावर झालेला सशस्त्र हल्ला हा त्या सर्वांवरील हल्ला मानला जाईल. विशेष असे की, पाकिस्तान आणि सौदी यांच्यात यापूर्वीच असाच एक करार आहे. मात्र, अफगाणिस्तानने केलेल्या हल्ल्यानंतर सौदीकडून पाकिस्तानला कोणतीही मदत मिळाली नव्हती. याशिवाय इराणने सौदीवर केलेल्या हल्ल्यावेळी देखील पाकिस्तान मदतीसाठी आला नाही.



मक्का संयुक्त संरक्षण कराराचे दस्तवेज दाखविताना पाकिस्तान, तुर्की, सौदी अरबचे नेते

**सामूहिक सुरक्षा शक्य**

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, हा त्रिपक्षीय संरक्षण करार सामूहिक सुरक्षा आणि प्रदेशातील शांतता व स्थिरतेशी जोडला आहे. तथापि, संपूर्ण जगाला माहीत आहे की हे तीन देश इस्लामिक देशांमध्ये दहशतवादाचे सर्वांत मोठे आश्रयदाते आहेत. सौदी अरब हा वहाबी विचारसरणीचा सर्वांत मोठा समर्थक आहे. त्याने १९९० च्या दशकात जगभरातील दहशतवादाला वित्तपुरवठा केला होता. पाकिस्तान हा दहशतवादाचा उगम आणि आश्रयदाता आहे. दरम्यान, तुर्की कट्टर इस्लामचा नवीन कारखाना बनत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### भारतासमोर एक नवीन आव्हान

**भारताचे माजी लष्करप्रमुख जनरल वेद मलिक यांनी या त्रिपक्षीय लष्करी युतीला भारतासाठी एक मोठे सुरक्षा आव्हान म्हटले आहे. लष्करी गटांच्या निर्मितीमुळे जगात संघर्षाची शक्यता वाढते आणि जागतिक संबंधांमध्ये दुरावा निर्माण होतो. भारताचे अरब देशांशी, विशेषतः सौदी अरबशी, मजबूत व्यापारी, राजनैतिक आणि संरक्षण संबंध असले तरी, हा करार भारत-सौदी संबंधांमध्ये व्यत्यय आणू शकतो, ज्यामुळे भारतासमोर एक नवीन आव्हान उभे राहील.**

### संरक्षण तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाला प्रोत्साहन

तुर्की सौदी अरबच्या निधीचा वापर करून प्राणघातक शस्त्रे तयार करेल आणि पाकिस्तान त्यांचा वापर करेल. त्या बदल्यात पाकिस्तान गरजेनुसार दोन्ही देशांना अणुऊर्जा पुरवेल. याशिवाय या करारानुसार, हे तीन देश भविष्यात गुप्त माहितीची देवाणघेवाण करतील आणि संयुक्त लष्करी सराव, प्रशिक्षण आणि संरक्षण तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाला प्रोत्साहन देण्यासाठी काम करतील.



बिहारची राजधानी पाटणा येथे रस्ता अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त जमावाने तोडफोड करीत वाहनांना आग लावली

## महत्त्वाचे

### सुरक्षा दलांची काश्मिरात 'मॉक ड्रिल'

**राजौरी :** १७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या वार्षिक श्री बुढा अमरनाथ यात्रेच्या पृष्ठभूमीवर, सुरक्षा यंत्रणा आणि आपत्कालीन सेवांनी शुक्रवारी राजौरी जिल्ह्यातील जम्मू-राजौरी-पूंछ राष्ट्रीय महामार्गावर दहशतवादविरोधी 'मॉक ड्रिल' आयोजित केली. याद्वारे त्यांच्या प्रतिसाद यंत्रणेची चाचणी आणि बळकटीकरण करण्यात आले. हा सराव नौशेरा भागातील 'बग्नोटी राजाल' येथे घेण्यात आला. इथे महामार्गावर दहशतवादी हल्ला झाल्याचे दृश्य उभे करण्यात आले होते. या संयुक्त सरावात जम्मू-काश्मीर पोलिस, केंद्रीय सशस्त्र पोलिस दले, अग्निशमन व आपत्कालीन सेवा आणि आरोग्य विभाग यांचा सहभाग होता, असे त्यांनी सांगितले. विविध यंत्रणांनी जलद तैनाती, परिसराची तपासणी व सुरक्षितता, जखमींना सुरक्षित स्थळी हलवणे आणि आपत्कालीन प्रतिसाद यांसारख्या बाबींवर समन्वयाने काम करण्याचा सराव केला.

### मोटारसायकल-कारची धडक; दोन ठार

**बलरामपूर :** येथील तुळशीपूर-बढनी राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाने येणाऱ्या कारची आणि मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन मोटारसायकलवरील दोन जण ठार झाल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली. ही दुर्घटना गुरुवारी रात्री उशिरा रामनगर गावाजवळ घडली. त्यावेळी बलरामपूर शहरातील टेढी बाजार येथील रहिवासी असलेले राजन सैनी आणि जय प्रकाश सैनी हे मोटारसायकलवरून बढनीहून परत येत होते. मोटारसायकलची समोरासमोरून येणाऱ्या कारशी धडक झाली. या धडकेमुळे मोटारसायकलवरील दोन्ही स्वार रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपांमध्ये फेकले गेले, तर कार उलटली, असे पचपेडवा पोलिस ठाण्याचे प्रभारी ओम प्रकाश चौहान यांनी सांगितले.

### विजय यांच्या पत्नीची घटस्फोटाची याचिका मागे

**चेंगलपट्टू :** तमिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांच्या पत्नी संगीता यांनी चेंगलपट्टू कुटुंब न्यायालयात दाखल केलेला घटस्फोटाचा अर्ज मागे घेतला आहे. शुक्रवारी या प्रकरणाची सुनावणी होती, त्यावेळी विजय यांच्या पत्नी संगीता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर झाल्या. त्यांनी न्यायाधीश सुजाता यांना अर्ज मागे घेतल्याची माहिती दिली. न्यायाधीशांनी सुमारे १५ मिनिटे त्यांची चौकशी केली आणि नंतर अर्ज स्वीकारून घटस्फोटाचे प्रकरण संपवले. संगीता यांनी याच वर्षी फेब्रुवारी २०२६ मध्ये हा घटस्फोटाचा अर्ज दाखल केला होता. यामध्ये त्यांनी विजय यांच्यावर विवाहबाह्य संबंधांचा आरोप केला होता. विजय यांनी याच वर्षी १० मे रोजी तमिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती.



### अमरनाथसाठी आणखी एक तुकडी रवाना



**जम्मू :** काश्मीरमधील वार्षिक अमरनाथ यात्रेसाठी ९२६ भाविकांचा एक नवीन गट शुक्रवारी येथील तळ-छावणीतून कडेकोट सुरक्षा व्यवस्थेमध्ये रवाना झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. हा ताफा पहाटे २:५९ वाजता भगवतीनगर यात्री निवासातून ४२ वाहनांमधून ज्यात २१ बसेसचा समावेश होता, तो रवाना झाला. आजचा गट रवाना झाल्यामुळे, या वार्षिक यात्रेसाठी जम्मूच्या तळ-छावणीतून निघालेल्या भाविकांची एकूण संख्या १,४४,४३९ वर पोहोचली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही ५७ दिवसांची वार्षिक यात्रा २८ ऑगस्ट रोजी संपन्न होणार आहे.

# बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मजबूत करण्यावर चर्चा

## सुनेत्रा पवार-प्रशांत किशोर यांच्या भेटीवर एनसीपीची माहिती

**मुंबई, ७ ऑगस्ट**

जन सुराज पक्षाचे प्रमुख व राजकीय रणनीतीकार-राजकारणी प्रशांत किशोर यांनी गुरुवारी दक्षिण मुंबईतील देवगिरी या शासकीय निवासस्थानी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली.या भेटीवरून राजकीय चर्चेला उधाण आले होते. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने या बैठकीत केवळ पक्ष संघटना मजबूत करण्यावर चर्चा झाली, अशी माहिती दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रवक्ते सूरज चव्हाण म्हणाले, या बैठकीत किशोर यांनी पक्षाच्या संघटनात्मक पुनर्रचनेवर सल्ला दिला. या बैठकीला सुनेत्रा पवार, त्यांचे खासदार पुत्र पार्थ पवार आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. पक्ष कसा मजबूत करायचा आणि सरकारचे विकास कार्यक्रम तळागाळापर्यंत कसे पोहोचवायचे यावर चर्चा करण्यासाठी ही एक अंतर्गत बैठक होती, असेही ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त करत त्यांना पदावरून हटवावे, अशी सूचना किशोर यांनी दिल्याची अटकळही चव्हाण यांनी फेटाळून लावली.



**राजकीय काहीही नाही, ही सदिच्छा भेट**

या बैठकीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, राजकीय काहीही नाही, ही सदिच्छा भेट आहे. नरेंद्र मोदी आणि ममता बॅनर्जी यांच्यापासून ते अरविंद केजरीवाल यांच्यापर्यंतच्या नेत्यांना निवडणुकीत विजय मिळवून देणाऱ्या किशोर यांनी बारामती विमान अपघातात तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांची दुसऱ्यांदा भेट घेतली आहे. पहिल्या भेटीनंतर पार्थ पवार म्हणाले होते की, किशोर त्यांच्या कुटुंबाला परिचित होते. ◂ (वृत्तसंस्था)

# माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर 'सैनिक दरबार'

**मुंबई, ७ ऑगस्ट**

राज्यातील माजी सैनिक, युद्धात हुतात्मा झालेल्या जवानांचे कुटुंबीय आणि वीरमातांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध असून, प्रत्येक जिल्ह्यात 'सैनिक दरबार' प्रभावीपणे आयोजित करून माजी सैनिकांच्या अडचणींवर त्वरित निर्णय घ्यावेत, असे निर्देश माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्रालयात माजी सैनिक कल्याण विभागाच्या वतीने आयोजित बैठकीत राज्यातील माजी सैनिक संघटनांनी मांडलेल्या विविध प्रलंबित मागण्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीला माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत, अपर मुख्य सचिव संतोष कुमार, उपसचिव गणेश पवार, सैनिक कल्याण संचालक दीपक ठोंगे, एसपीआयचे संचालक मकरंद देशमुख तसेच विविध माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री देसाई यांनी सांगितले की, जिल्हास्तरावर नियमितपणे सैनिक दरबार भरविल्यास माजी सैनिकांच्या प्रश्नांचा स्थानिक पातळीवरच जलद निपटारा होईल. शासन माजी सैनिकांच्या न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक असून, विविध विभागांनी परस्पर समन्वयातून आवश्यक निर्णय तातडीने घ्यावेत.

महिला बचत गटांना देण्यात येणारे अर्थसहाय्य दोन टप्प्यांत देण्याचा प्रस्ताव, बचत गटांमध्ये तीन माजी सैनिक विधवांची अनिवार्य अट शिथिल करण्याचा प्रस्ताव तसेच शिक्षण सेवक, आरोग्य सेवक, कृषी सेवक आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदांसाठी सैनिकी पात्रता ग्राह्य धरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. संबंधित सेवा नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

माजी सैनिक महामंडळातील वेतनवाढ, सुरक्षा रक्षकांचे सेवा लाभ, अधिकाऱ्यांच्या वेतनातील तफावत दूर करणे आणि कंत्राटी नियुक्तीचा कालावधी वाढविण्याबाबतचे प्रस्ताव शासनस्तरावर गतीने निकाली काढण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

याशिवाय माजी सैनिकांसाठी विशेष भरती मोहीम, राज्य राखीव पोलीस दलातील नियुक्त्या, नवी मुंबई येथे विश्रामगृह उभारणी, जिल्हास्तरीय सुविधा केंद्रे, विविध समित्यांवर माजी सैनिकांना प्रतिनिधित्व, टोलमाफी, शहीद जवानांच्या कुटुंबीयांना अनुकंपा नियुक्त्या आदी मागण्यांवर संबंधित विभागांनी नियमांनुसार तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री देसाई यांनी दिले.

बैठकीत माजी सैनिकांच्या पुनर्नियुक्ती, आरक्षण, शिक्षण, रोजगार, निवास, वेतनवाढ आणि इतर कल्याणकारी योजनांशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. माजी सैनिकांच्या न्याय्य मागण्यांचा संवेदनशीलतेने विचार करून त्यांच्या कल्याणासाठी प्रशासकीय प्रक्रिया अधिक गतिमान करण्यावर शासनाचा भर राहील, असेही मंत्री देसाई यांनी स्पष्ट केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### तृतीयपंथीयांसाठी 'स्वयंरोजगाराची वाट'!

**मुंबई, ७ ऑगस्ट**

तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वयंरोजगार आणि व्यवसायाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'तृतीयपंथीयांच्या स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना' राबविण्यास मंजुरी देण्यात आली असून, या योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना २५ हजार रुपयांपासून तब्बल २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य मिळणार आहे.

स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ इच्छिणाऱ्या तृतीयपंथीयांसाठी ही योजना मोठी संधी ठरणार आहे. लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसायांना चालना देण्यासोबतच कौशल्य विकास आणि उद्योजकता प्रशिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत रोजगारनिर्मिती करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत लाभार्थींच्या गरजेनुसार तीन प्रकारच्या कर्ज योजनांचा समावेश करण्यात आला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)



पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी कोलकातामधील भवानीपूर येथून 'हर घर तिरंगा' अभियानाचा शुभारंभ केला, यावेळी त्यांनी रॅलीत प्रत्यक्ष सहभाग घेत पदयात्रा केली, त्यांच्यासोबत राज्याचे मंत्री आणि भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# नाशिकमध्ये साकारणार देशातील पहिले 'ज्ञान-तंत्रज्ञान संगम केंद्र'

## केंद्रीय संस्कृत विद्यापीठासाठी १६.८० हेक्टर जमीन सुपूर्द

**मुंबई, ७ ऑगस्ट**

भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाची अनोखी सांगड घालणारा देशातील अग्रगण्य शैक्षणिक प्रकल्प आता नाशिकमध्ये उभारला जाणार आहे. केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या प्रस्तावित नाशिक परिसरासाठी आरक्षित सुमारे ४१.५१ एकर जमिनीचा ७/१२ उतारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रतिनिधींना अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आला आहे.

शिलापूर गावात रिंगरोडलगत ही जमीन हस्तांतरित झाल्यामुळे विद्यापीठाच्या उभारणीची प्रशासकीय प्रक्रिया आता गतिमान झाली आहे. सांस्कृतिक वारसा जपत नाशिकला उच्च शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

४०० कोटींचा प्रकल्प आणि आधुनिक अभ्यासक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या या विद्यापीठाचा सुमारे ४०० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आला असून तो केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. या अत्याधुनिक, बहुविद्याशाखीय परिसरात संस्कृत माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स यासारख्या आधुनिक विषयांचे बी. टेक. अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या अभिनव उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### १,५०० विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

**या आधुनिक कॅम्पसमध्ये तब्बल १,५०० विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळणार आहे. पारंपरिक संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा हा संगम देशाच्या शैक्षणिक विकासातील एक ऐतिहासिक मैलाचा दगड ठरणार आहे. जमीन हस्तांतरण कार्यक्रमास कुलसचिव प्रा. आर. जी. मुरलीकृष्ण, मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश इंदापवार, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद उपस्थित होते.**

# 'विदर्भाचे पंढरपूर' शेगावच्या विकासाला गती

## गजानन भक्तांसाठी राज्य सरकारची मोठी भेट

**मुंबई, ७ ऑगस्ट**

शेगाव म्हणजे विदर्भाचे पंढरपूर! श्री गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत वर्षभर लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या भक्तांना चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात आणि या 'विदर्भाच्या पंढरपुरा'चा विकास अधिक वेगाने व्हावा, यासाठी राज्य सरकारने एक अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शासनाने विकासकामांच्या निधीला मुदतवाढ दिल्याने शेगावच्या विकासातील मोठा अडथळा आता दूर झाला आहे. राज्य शासनाच्या नियोजन विभागाने ७ ऑगस्ट २०२६ रोजी हा शासन निर्णय जारी करून या विकास आराखड्याला गती दिली आहे.

श्री गजानन महाराज समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त शेगाव येथे मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी एक विशेष विकास आराखडा राबवला जात आहे. सरकारी कामांसाठी आलेला निधी वेळेत खर्च न झाल्यास तो अनेकदा सरकारकडे परत जातो. मात्र, शासनाने या आराखड्यासाठी विभागीय आयुक्त (अमरावती) यांच्या नावे असलेल्या 'स्वीय प्रपंजी खात्याला' थेट ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या महत्त्वपूर्ण मुदतवाढीमुळे ३१ मार्च २०२५ पर्यंत खात्यात शिल्लक राहिलेली अखर्चित रक्कम आता सरकारला परत (सरेंडर) करावी लागणार नाही. हा उरलेला निधी चालू आर्थिक वर्षात म्हणजेच २०२६-२७ मध्ये शेगावमधील विविध सोयी-सुविधांसाठीच खर्च करण्यास सरकारने अधिकृत मान्यता दिली आहे. विकासकामे करताना आधी हाच शिल्लक राहिलेला निधी प्रथम खर्च करावा, असे स्पष्ट निर्देशही या निर्णयात देण्यात आले आहेत.

महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेनुसार, तीर्थक्षेत्राच्या विकासात कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून सरकारने याला 'विशेष बाब' म्हणून मंजुरी दिली आहे. विदर्भाचे पंढरपूर असलेल्या शेगावमध्ये भक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत असून राहण्याची सोय, पिण्याचे पाणी, रस्ते आणि दर्शन रांगांचे व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा अधिक दर्जेदार असणे गरजेचे आहे. सरकारच्या या सोप्या पण महत्त्वाच्या निर्णयामुळे पैशांअभावी किंवा तांत्रिक अडचणींमुळे कोणतीही विकासकामे आता थांबणार नाहीत. त्यामुळे आगामी काळात शेगावात येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला आणि गजानन भक्ताला अधिक चांगल्या आणि सुखकर सुविधा मिळण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# संसदेत अभ्यासू चर्चा करा

## पंतप्रधान मोदींचे रालोआच्या खासदारांना आवाहन



**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

लोकसभेत सुरू असलेल्या कोंडीच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी महायुतीमधील खासदारांची बैठक घेतली. त्यांनी खासदारांशी संवाद साधत चर्चेत सहभागी होण्याचे आवाहन केले. संसद लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर आहे, असे ते यावेळी म्हणाले. संसदेच्या दोन्ही सभागृहात सध्या सुरू असणाऱ्या गोंधळामुळे नव्या खासदारांनी बोलण्याची संधी मिळत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

संसदेचे कामकाज सुरळीत चालावे, असे सांगत मोदी म्हणाले, खासदारांनी वाचन आणि अभ्यास करावा. शिवाय संसदेचा इतिहास समजून घ्यावा. संसदेत ऐतिहासिक गोष्टींचा खजिना आहे. त्याचा चर्चा करण्यासाठी वापर करा. आपल्या राज्याचा विकास करण्यासाठी काम करा, असे आवाहन करत राज्याचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**उबाठा-तृणमूल बंडखोर खासदारांची हजेरी**

पंतप्रधान मोदींनी साधलेल्या संवादात एकूण ४५ खासदारांनी सहभाग घेतला होता. यावेळी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ७, राष्ट्रीय सिटिझन पार्टीचे २० आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या दोन खासदारही उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून सहा खासदारांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. तर, तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी एनसीपीमध्ये प्रवेश केला आहे. हे खासदारही यावेळी उपस्थित होते.

**काळजी करू नका, मी सोबत आहे**

काळजी करू नका, मी तुमच्या सोबत आहे, असा विश्वास देत शिवसेना व तृणमूलच्या बंडखोर खासदारांशी संवाद साधताना मोदी पुढे म्हणाले, एनडीए हे एक कुटुंब आहे, छोट्या मोठ्या पक्षांनी एकत्र घेऊन ही युती झाली आहे. प्रत्येकाचा आदर राखला जाईल आणि संधी दिली जाईल. मी युतीमधील प्रत्येक खासदारासोबत आहे. तुम्हाला कोणाबद्दल काळजी करण्याची गरज नाही.मतदारसंघात कामे करण्यासाठी अधिकारांचा योग्य वापर करा, अशी सूचनाही त्यांनी खासदारांना केली. ◂ (वृत्तसंस्था)

### 'एआय इन्व्हेस्टिगेशन प्लॅटफॉर्म'साठी १९ लाखांचा निधी

**मुंबई, ७ ऑगस्ट**

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने नागपूर (ग्रामीण) पोलिस अधीक्षकांमार्फत राबवण्यात येणाऱ्या 'एआय इन्व्हेस्टिगेशन प्लॅटफॉर्म पायलट' प्रकल्पासाठी १९.६० लाख रुपयांच्या निधीला शासनाने अधिकृत मान्यता दिली आहे. गृह विभागाने यापूर्वी १७ जुलै २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयामध्ये काही तांत्रिक बदल करून ही नवी मंजुरी दिली आहे. पूर्वीच्या निर्णयानुसार, 'एआय पॉवर्ड इन्व्हेस्टिगेशन प्लॅटफॉर्म सॉफ्टवेअर'साठी मंजूर करण्यात आलेल्या १ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून १९.६० लाख रुपये हे हार्डवेअर खरेदीसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली होती. ◂ (तभा वृत्तसेवा)

## अग्रलेख

# सरसंघचालकांच्या संवादाचा आशय

'नीट' परीक्षेतील पेपरफुटीनंतर राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू झालेल्या आंदोलनानंतर जेन-झी हा शब्द चर्चेत आला. आपल्या घरातील आपली मुले-मुली ही जेन-झी आहे, हे अनेक पालकांनाही या आंदोलनानंतर प्रथमच समजले असावे. नवीन पिढीच्या वागण्या-बोलण्यात आणि विचार करण्याच्या पद्धतीत फरक पडलेला आहे, हे त्यांच्या पालकांना जाणवत होते, पण त्याचे कारण जेन-झीची वेगळी मानसिकता आहे, हे आतापर्यंत बहुतेकांच्या लक्षात आले नसावे, असे म्हणण्यास वाव आहे. दर बारा कोसावर भाषा आणि पाणी बदलत असते, असे म्हणतात, तसेच दर पंधरा-वीस वर्षांनी पिढीही बदलत असते. प्रत्येक पिढी वेगळी असते. पहिल्या पिढीपेक्षा दुसरी पिढी अधिक तंत्रज्ञानस्नेही, सक्षम आणि कर्तबगार मानली जाते. प्रत्येक पिढीचे काही गुण-दोषही असतात. प्रत्येक पिढीला तिच्या गुण-दोषांसह स्वीकारले पाहिजे. आमची पिढी अतिशय चांगली आणि संस्कारी तर आताची पिढी बेजबाबदार आणि संस्कारशून्य असे सरसकट म्हणता येत नाही. प्रत्येक पिढीची एक भाषा असते, वर्तन असते, आचरण असते. प्रत्येक पिढीची व्यक्त होण्याची, प्रतिसाद देण्याची शैली वेगळी असते. ती समजून घेण्यासाठी त्या पिढीशी संवाद साधला पाहिजे.

हाच विचार घेऊन रा. स्व. संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मुंबईत कार्यक्रमात जेन-झीशी संवाद सांधताना जी भावना व्यक्त केली, ती अतिशय योग्य आहे. झेन-झी असा थेट संवाद देशातील कोणत्याही ज्येष्ठ अधिकारी व्यक्तीने आतापर्यंत साधला नाही. घराघरातील संवाद कमी झाला आहे. एकाच घरात राहूनही पालकांचा मुलांशी आणि मुलांचा पालकांशी संवाद होत नाही. बोलणे-चालणे होते, ते फक्त कामापुरते. त्याला संवाद म्हणता येत नाही. सामाजिक स्तरावर तर असा संवाद ही दुर्मिळ बाब झाली आहे. त्यामुळे प. पू. सरसंघचालकांनी जेन-झीशी साधलेला संवाद ही ऐतिहासिक आणि नवी सुरुवात म्हटली पाहिजे. जेन-झी ही प्रामाणिक आणि देशभक्त असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. एखाद्या ज्येष्ठाने घरातल्या लहानग्यांशी लडिवाळ गप्पा कराव्यात, असे या संवादाचे स्वरूप होते. समाजातील आणि देशातील अनेक ज्वलंत मुद्यांवर डॉ. मोहनजी भागवत यांनी आपले मत मांडले. पण त्यांच्या प्रत्येक मुद्याचा केंद्रबिंदू देशातील तरुण पिढीच होती. प. पू. सरसंघचालकांनी मांडलेली भूमिका ही संवादाच्या अभावामुळे सर्वत्र निर्माण झालेल्या स्थितीच्या संदर्भात समजून घेतली पाहिजे. समाजाच्या सर्व क्षेत्रांतील संवाद जवळजवळ हरवला आहे. त्यामुळेच अनेक समस्या उद्भवल्या आहेत. घरामध्ये पालकांत आणि मुलांत संवाद नाही, तर बाहेर सरकार आणि विरोधक यांच्यातही संवादाचा अभाव आहे. जागतिक पातळीवरही अनेक देशांत संवाद नसल्यामुळे संकटे उद्भवली आहेत. मग ते रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध असो की अमेरिका आणि इस्त्रायल यांची इराणविरुद्धची लढाई असो. संवादाचा अभाव विनाशाकडेच नेत असतो, असेच या घटना सांगतात.

प्रत्येक पिढीला काळानुरूप जसे काही फायदे मिळतात, त्याचप्रमाणे बदलत्या काळामुळे काही नव्या आणि वेगळ्या समस्यांनाही सामोरे जावे लागते. जेन-झी त्याला अपवाद नाही. तिच्या समस्या आणि ताणतणाव वेगळे आहेत. जंतरमंतरवरील आंदोलनानंतर जेन-झीला बरीच दूषणे दिली गेली. तरुणांनी काही मागण्यांसाठी आंदोलन केले. त्यात गैर नाही. आंदोलन करणे हा लोकशाहीने दिलेला अधिकार आहे. ते आंदोलन जेन-झीच्या पद्धतीने झाले हा मोठा फरक होता. त्यातही काही तरुणांकडून अतिशय अश्लाघ्य आणि आक्षेपार्ह भाषा वापरली गेली आणि शिव्यांचा मुक्तहस्ते वापर करण्यात आला. विशिष्ट आणि घटनात्मक पदांवरील व्यक्तींबाबत भाषा वापरताना संयम आणि सभ्यता पाळलीच पाहिजे. जेन-झी म्हणून आपल्याला कुणाचाही अपमानाचा किंवा खिल्ली उडवण्याचा अधिकार मिळत नाही, हे सर्वांनी लक्षात घ्यायला हवे. जेन-झी ने हे देखील हे समजून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे साऱ्या ज्येष्ठांनी जेन-झी ला समजून घेतले पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनाचा मोठेपणा दाखवत जेन-झीला माफ केले. शिवीगाळ करणाऱ्या विद्यार्थ्यांवरचे गुन्हे मागे घेण्याचे आदेश दिले. घरातील लहान मुलांनी चुका केल्या तर त्यांना जसे आईवडील माफ करतात, समजून घेतात, तसेच मोदींनी केले. डॉ. मोहनजी भागवत यांनीही जेन-झीला माफ करण्याचे आवाहन केले होते. आता जेन-झीच्या मनातील भावनांचा स्फोट का झाला, याचा शोध घेत ती कारणे दूर केली पाहिजेत. जेन-झीचे आंदोलन सुरू असताना सरकारने त्यांच्याशी संवाद साधण्यास उशीर केला हे खरेच आहे. सरकारने सुरुवातीलाच या आंदोलनाची दखल घेत तोडगा काढण्याचा प्रयत्न केला असता तर ते चिघळले नसते आणि पुढचा सर्व अनुचित प्रकार टाळता आला असता. तसे झाले नाही. त्यातच काही राजकीय पक्षांनी तसेच असामाजिक आणि देशविघातक तत्त्वांनी आंदोलनातील तरुणांची माथी भडकवण्याचा प्रयत्न केला. मुळात जेन- झीचे आंदोलन देशाच्या सरकारविरुद्ध नव्हे तर आपल्या समस्यांच्या सोडवणुकीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी होते. सरकारात जे बसलेले असतात, त्यांचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करणे ही जगभरातील पद्धत आहे. पण, या आंदोलनाला थेट सरकारविरोधी रंग देण्याचा प्रयत्न झाला. तो अपयशी ठरला हा भाग वेगळा. जेन-झी हे देशाचे भविष्य आहे. त्यांच्याकडून झालेल्या चुकांसाठी त्यांना सरसकट देशविरोधी ठरवणे अन्यायकारक आहे. समाज आणि देशाच्या दृष्टीनेही ते धोकादायक आहे. संपूर्ण पिढीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे कोणत्याही देशाच्या हिताचे नसते. जंतरमंतरवर काही हजार जेन-झी एकत्र आले होते आणि त्यातलेही मोजके अश्लाघ्य वागले, पण देशातील जेन-झींची संख्या काही कोटींच्या घरात आहे. त्या साऱ्यांना एकाच मापात तोलणे योग्य नाही. डॉ. मोहनजी भागवत यांच्या संबोधनाकडे याच दृष्टीने पाहावे लागेल. जेन-झीशी संवाद साधताना त्यांच्या समस्या जशा समजून घेतल्या, तसेच त्यांच्या दुःखावर हळुवार फुंकर घालण्याचाही प्रयत्न केला. त्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काही मौलिक सूचनाही सरकारला केल्या. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींकडे डॉ. मोहनजी भागवत यांनी लक्ष वेधले. शिक्षणावरचा खर्च वाढवण्याची सूचनाही त्यांनी केली. उच्चशिक्षण अतिशय महागडे झाले आहे. महागडे शिक्षण घेऊनही रोजगार मिळेल, याची कोणतीही खात्री नाही. एका जागेसाठी जाहिरात आली तर शे-पाचशे-हजार जण अर्ज करतात. समस्त तरुणाई अशा अनेक मुद्यांमुळे अस्वस्थ आहे हे कुणालाच नाकारता येणार नाही. नीट परीक्षेतील पेपरफूट हे आंदोलनासाठीचे एक तात्कालिक निमित्त होते. म्हणूनच समस्या आहेत आणि समस्या असतीलच तर त्या सोडवण्याचे माध्यम फक्त संवादच असू शकते, हेच प. पू. सरसंघचालकांनी सांगितले. एखादी समस्या तत्काळ सोडवता येत नसली तरी संवाद साधलाच पाहिजे. आजची तरुण पिढी व्यवहारी आहे. ती आधीच्या पिढ्यांसारखी भावनिक नाही. प्रश्न विचारण्याची हिंमत या पिढीत आहे. आपल्या प्रश्नाला तर्कसंगत उत्तर मिळावे, अशी त्यांची अपेक्षा असते. मिळणारे उत्तर तर्कसंगत आणि प्रामाणिक आहे की नाही हे त्यांना तत्काळ समजते. त्यांची दिशाभूल करता येत नाही. भविष्यात या पिढीवर रस्त्यावर उतरण्याची वेळ येणार नाही, याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. ज्येष्ठ म्हणून आपला जेन-झीला सल्ले देण्याचा अधिकार असेल तर त्यांच्याप्रति समाज व सरकारची असलेली जबाबदारी ओळखणे व त्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली जाणे आवश्यक आहे, हाच डॉ. मोहनजी भागवत यांच्या जेन-झीशी झालेल्या संवादाचा खरा आशय आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआयचे कार्बन फूटप्रिंट...

पर्यावरणाचे रक्षण हा आजच्या काळातील महत्त्वाचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे आणि याचे दुष्परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. शेती, पर्यावरण व व्यावसायिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांवर मात करण्याचे अभिनव मार्ग आपल्याला शोधावे लागणार आहेत. तंत्रज्ञान आणि पर्यावरणाची सांगड घालून पारंपरिक ऊर्जास्रोतांचा कमीत कमी वापर कसा करता येईल, याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. आज कृत्रिम बुद्धिमत्तेची चर्चा जगभर सुरू आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, बँकिंग, वाहतूक, शासन, संशोधन अशा जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कामाचा वेग वाढला आहे. मात्र, या तंत्रज्ञानाच्या कमी चर्चिला जाणारा एक पैलू म्हणजे पर्यावरणावर होणारा परिणाम. कृत्रिम बुद्धिमत्ता चालवण्यासाठी प्रचंड प्रमाणात संगणकीय क्षमता, वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो- कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःचे कार्बन फूटप्रिंट कमी करू शकते का? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता. याचा अर्थ असा की, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास, प्रशिक्षण आणि वापर अशा पद्धतीने करणे की, किमान ऊर्जा वापरली जाईल, नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय टळेल आणि पर्यावरणावर होणारा परिणाम कमीत कमी राहील.

**कार्बन फूटप्रिंट म्हणजे काय?** : एखादी व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा तंत्रज्ञान आपल्या कामकाजातून वातावरणात जितके हरितगृह वायू निर्माण करते, त्याला कार्बन फूटप्रिंट म्हणतात. संगणक, माहिती केंद्रे, भ्रमणध्वनी, जालसेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी चालणाऱ्या मोठ्या संगणकीय प्रक्रियांना मोठ्या प्रमाणावर वीज लागते. ही वीज प्रदूषण करणाऱ्या इंधनांपासून तयार होत असेल, तर कार्बन फूटप्रिंट वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर पर्यावरणासमोर एक नवे आव्हान निर्माण करत आहे. परंतु, याच तंत्रज्ञानात या समस्येचे उत्तरही दडले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःच ऊर्जा बचतीचे मार्ग शोधू शकते. कोणती प्रक्रिया आवश्यक आहे, कोणती टाळता येईल, कोणती माहिती पुन्हा वापरता येईल आणि कोणत्या पद्धतीने कमी ऊर्जेमध्ये अधिक काम करता येईल, याचा अभ्यास ती करू शकते. त्यामुळे कमी ऊर्जा वापरून अधिक परिणामकारक काम करणे शक्य होते आणि कार्बन फूटप्रिंट कमी होते. शेतीमध्ये आवश्यक तेवढेच पाणी वापरण्याचा सल्ला दिला जातो. शहरांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवून इंधनाचा अपव्यय कमी केला जातो. घरांमध्ये वीजवापराचे नियोजन अधिक कार्यक्षम बनवले जाते. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतः ऊर्जा वापरत असली, तरी ती अनेकपटींनी ऊर्जा वाचवण्याची क्षमता ठेवते.



भारतासाठी हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. आपला देश वेगाने डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. शासन, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करीत आहेत. त्याच वेळी भारताने पर्यावरण संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत विकासाची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे स्वीकारली आहेत. त्यामुळे तांत्रिक प्रगती आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. भारताकडे सूर्य ऊर्जा, पवन ऊर्जा आणि इतर स्वच्छ ऊर्जेचे विपुल स्रोत आहेत. भविष्यात माहिती केंद्रे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची संगणकीय यंत्रणा या स्वच्छ ऊर्जेवर चालू लागल्या, तर कार्बन फूटप्रिंट मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. त्यामुळे ऊर्जा खर्च कमी होईल, प्रदूषण घटेल आणि पर्यावरण संरक्षणालाही मोठी मदत मिळेल. शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी माहिती केंद्रांची रचनाही बदलावी लागेल. कमी वीज वापरणारे संगणक, ऊर्जा बचत करणाऱ्या यंत्रणा, नैसर्गिक थंडावा, पाण्याचा मर्यादित वापर आणि पुनर्वापरयोग्य साधनसामग्री यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान जितके बुद्धिमान असेल तितकेच ते पर्यावरणपूरक असले पाहिजे. यामध्ये माहिती तंत्रज्ञान वापरणाऱ्या प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची भूमिका आहे. आपण अनेकदा गरज नसताना कृत्रिम बुद्धिमत्तेकडून एकाच प्रकारची उत्तरे पुन्हा पुन्हा मागतो, अनावश्यक चित्रे तयार करतो, निरुपयोगी माहिती साठवून ठेवतो किंवा मोठ्या प्रमाणात माहितीची देवाणघेवाण करतो. या प्रत्येक कृतीसाठी ऊर्जा खर्च होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा विवेकपूर्ण आणि जबाबदारीने वापर करणे ही काळाची गरज आहे.

संगणक, भ्रमणध्वनी आणि इतर साधने वापरताना ऊर्जा बचतीची काळजी घ्यायला हवी. आवश्यक तेव्हाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा, नको असलेली माहिती नियमितपणे हटवावी. जुनी उपकरणे अधिकृत पुनर्वापरासाठी द्यावीत. नवीन उपकरणे खरेदी करताना ऊर्जा बचत करणाऱ्या साधनांना प्राधान्य द्यावे. या छोट्या सवयींमुळे कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी मोठे योगदान देता येते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची जबाबदारी आणखी मोठी आहे. कमी ऊर्जा वापरणारी कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणे, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढविणे, पर्यावरणपूरक माहिती केंद्रे उभारणे, पाण्याचा अपव्यय कमी करणे, जुन्या उपकरणांचा पुनर्वापर करणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरणपूरक कार्यसंस्कृती निर्माण करणे ही त्यांची सामाजिक जबाबदारी आहे. प्रत्येक नव्या प्रकल्पाची कार्बन फूटप्रिंट मोजणे आणि ती कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे हे आता प्रत्येक संस्थेचे धोरण असले पाहिजे. केवळ अधिक वेगवान कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणे पुरेसे नाही; ती ऊर्जा बचत करणारी, संसाधनांचा कार्यक्षम वापर करणारी आणि पर्यावरणपूरक असली पाहिजे. भविष्यात स्पर्धा केवळ अधिक शक्तिशाली कृत्रिम बुद्धिमत्तेची नसेल, तर अधिक शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्याची असेल. शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पर्यावरणपूरक आणि जबाबदार वापराचेही शिक्षण दिले पाहिजे.

शासनानेही ऊर्जा बचत करणाऱ्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन, पर्यावरणपूरक माहिती केंद्रांसाठी धोरणे, संशोधनासाठी सहाय्य आणि जनजागृती यावर भर दिला पाहिजे. शासन, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ संकल्पना न राहता वास्तव बनेल. यासाठी सर्व स्तरांवर प्रबोधन होणे गरजेचे आहे, तरच आपण पुढच्या पिढीला अधिक चांगल्या अवस्थेत आपल्या पृथ्वीला सादर करू शकू. अन्यथा, आगामी पिढ्या आपल्याला माफ करणार नाही. आपण बेलाशक चंगळवादात पर्यावरणाचा ऱ्हास केला, असा ठपका नको असेल तर सर्व घटकांनी जागे झाले पाहिजे. आज प्रश्न कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायची की नाही हा नाही. प्रश्न असा आहे की ती अधिक जबाबदारीने, अधिक कार्यक्षमतेने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने कशी वापरायची हा. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समन्वय असू शकतो, हे शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता सिद्ध करते. भविष्यात खऱ्या अर्थाने तोच प्रगत देश ठरेल, जो कमी ऊर्जा वापरून अधिक परिणामकारक तंत्रज्ञान विकसित करेल. भारताकडे ज्ञान, संशोधन, कुशल मनुष्यबळ आणि नवकल्पनांची मोठी ताकद आहे. या सामर्थ्याचा योग्य उपयोग करून भारत शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करू शकतो. तंत्रज्ञानाचा प्रत्येक टप्पा निसर्गाशी मैत्री करणारा असेल, तरच विकासाचा प्रवास खऱ्या अर्थाने शाश्वत ठरेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**हेमंत सालोडकर**

# आपली 'असह्य' महानगरे

भारत वेगाने विकसित होत आहे, अशी घोषणा आपण रोज ऐकतो. जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये आपला समावेश झाल्याचेही सांगतात. अब्जावधी रुपयांची गुंतवणूक, प्रचंड शहरीकरण व त्यासाठी मेट्रो, फ्लायओव्हर, स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया अशा अनेक योजना राबवल्या जात आहेत. पण या सर्व विकासाच्या दाव्यांमध्ये एक प्रश्न विचारला पाहिजे आणि तो असा की- आपली महानगरे खरोखर राहण्यायोग्य आहेत काय?... कोणतेही महानगर घ्या. मुंबई, पुणे, नागपूर किंवा बंगळुरू आणि चेन्नईचा विचार करा. परिस्थिती फार बिकट आहे. शहरांचा विस्तार झाला, पण नागरी जबाबदारीची संस्कृती आणि नागरी प्रशासन यांच्या मानसिकतेचा विकास मात्र त्या वेगाने झाला नाही. परिणामी, महानगरे विकासाची प्रतीके कमी आणि अव्यवस्थेची स्मारके अधिक वाटू लागली आहेत.

आज मोठ्या शहरांतील नागरिकाला दिवसाची सुरुवातच संघर्षाने करावी लागते. घराबाहेर पडल्यापासून वाहतूक कोंडी, खड्डे, धूळ, कचरा, अतिक्रमणे, अव्यवस्थित पार्किंग, उघड्या गटारी, साचलेले पाणी आणि प्रदूषण यांचा सामना करावा लागतो. या समस्यांना आपण इतके सरावलो आहोत, की त्या आता समस्या वाटेनाशा झाल्या आहेत. हीच सर्वांत धोकादायक बाब आहे. शहरांमध्ये स्वच्छतेवर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होतात. स्वच्छतेच्या मोहिमा चालतात. पुरस्कार दिले जातात. रँकिंग जाहीर होतात. वास्तवात अनेक भागांत कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ नाले आणि दुर्गंधी कायम असते. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया आणि गॅस्ट्रोसारखे आजार दरवर्षी हजारो कुटुंबांना त्रस्त करतात. पदपथ हा शहरातील सर्वांत उपेक्षित घटक बनला आहे. तो पादचाऱ्यांसाठी बांधला जातो, पण त्यावर फेरीवाल्यांचा ताबा, दुकानदारांचे अतिक्रमण, वाहनांचे पार्किंग किंवा बांधकाम साहित्य यापैकी काही ना काही निश्चितच आढळते. त्यामुळे पादचाऱ्यांच्या वाट्याला अपघात येतात. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि शालेय विद्यार्थी यांच्यासाठी तर शहरातील पदपथ म्हणजे सुविधा नव्हे, तर संकट बनले आहेत. सर्वत्र बांधकामे सुरू आहेत आणि त्यासाठीचे साहित्य रस्त्यांवर ठेवणे हेही आपल्या शहरांचे नवे वास्तव झाले आहे. वाळू, खडी, विटा आणि लोखंडी सळ्या महिनोनमहिने रस्त्यांवर पडून असतात. वाहतूक विस्कळीत होते, धुळीचे प्रदूषण वाढते, अपघात घडतात; पण कारवाई क्वचितच होताना दिसते. नियम आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी करण्याची इच्छाशक्ती दिसत नाही. पार्किंग हा तर गंभीर विषय. शहरांच्या विकास आराखड्यांमध्ये वाहनतळांसाठी जागा राखीव ठेवली जाते; पण त्या जागांवरच अवैध बांधकामे उभी राहतात किंवा त्यांचा अन्य व्यावसायिक वापर सुरू होतो. वाहने रस्त्यावर उभी राहतात आणि वाहतूक कोंडी वाढते. त्यावर उपाय म्हणून पुन्हा नवे रस्ते बांधले जातात. म्हणजे नियोजनातील चुकांवर खर्चाचा मुलामा दिला जातो. या सर्व समस्यांचे मूळ दोन शब्दांत सांगता येते- नियोजनशून्यता आणि भ्रष्टाचार. अनेक महापालिका कार्यालयांमध्ये नियमांपेक्षा तेथील 'व्यवस्था' अधिक प्रभावी असते. चिरीमिरी दिल्याशिवाय फाईल हलत नाही आणि ती दिली की कुणाचे काहीच बिघडत नाही. अतिक्रमण टिकवायचे असेल, परवानग्या मिळवायच्या असतील किंवा कारवाई टाळायची असेल, तर पैशाची भाषा अनेकदा नियमांपेक्षा प्रभावी ठरते. ही व्यवस्था सर्वांनाच माहीत आहे. नागरिकांना माहीत आहे, अधिकाऱ्यांना माहीत आहे, लोकप्रतिनिधींना माहीत आहे आणि शासनालाही माहीत आहे. तरीही बदल होत नाही. नियम मोडणाऱ्यांना संरक्षण मिळते आणि नियम पाळणारा किंवा तक्रार करणारा नागरिकच अडचणीत येतो. त्यामुळे कायद्यावरील विश्वास उडतो. कायद्याची भीती संपली की शहरांची शिस्तही संपते. शहरांचा विकास हा केवळ काँक्रीट रस्ते आणि फ्लायओव्हरमध्ये मोजणे थांबवले पाहिजे. शहराचा विकास म्हणजे नागरिकाला मिळणारी जीवनाची गुणवत्ता. स्वच्छ हवा, मोकळे पदपथ, सुरक्षित रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक, पारदर्शक प्रशासन आणि भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था यालाच खरा विकास म्हणतात. भारताला महासत्ता व्हायचे असेल, तर त्याची महानगरे प्रथम सुसंस्कृत, स्वच्छ आणि शिस्तबद्ध झाली पाहिजेत. जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळविण्यापूर्वी जगातील सर्वोत्कृष्ट नागरी व्यवस्थांमध्ये स्थान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा आपण बाळगली पाहिजे. शहरे ही विकासाची इंजिने असतील आणि त्यांचा श्वास गुदमरत असेल तर विकासाचे चाक रुतेल, हे लक्षात ठेवले पाहिजे.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सूर्यावर थुंकण्याचा केविलवाणा प्रयत्न!

सकाळ झाली की उठसूठ राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आणि भाजपवर वाक्बाण सोडल्याशिवाय 'उबाठा' गटाचे पोट भरत नाही. 'उबाठा' म्हणजे काँग्रेसच्या दावणीला बांधलेली आणि वैचारिक दिवाळखोरीची उबळ आलेली एक राजकीय लावणीच झाली आहे. नुकतेच भाजपची आई सध्या काय करते? असा उथळ आणि बालिश सवाल करत, सरसंघचालकांच्या 'जेन-झी' तरुणाईसोबतच्या संवादावर आगपाखड करण्यात आली. पण, ज्यांनी केवळ सत्तेच्या लाचारीसाठी हिंदुत्वाच्या विचारांची राखरांगोळी केली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीच्या चरणी लोटांगण घातले, त्यांनी संघासारख्या राष्ट्रभक्त संस्थेला प्रश्न विचारणे, म्हणजे 'सत्तर उंदीर खाऊन बोका गेला काशीला' असाच हास्यास्पद प्रकार आहे!

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी तरुण पिढीशी, म्हणजेच 'जेन-झी'शी संवाद साधण्याचे ठरवले, तर उबाठा गटाच्या पोटात मळमळ का सुरू झाली? संघ हा सुरुवातीपासूनच समाजातील प्रत्येक घटकाला, विशेषतः तरुणाईला राष्ट्रवादाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. आजची तरुणाई भरकटू नये, 'तुकडे-तुकडे गँग'च्या आणि डाव्यांच्या भूलथापांना बळी पडून त्यांनी देशविघातक कारवायांमध्ये ओढले जाऊ नये, यासाठी जर संघ त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधत असेल, तर त्यात वावगे काय? पण, ज्यांचा पक्षच आता वैचारिक 'केमिकल लोचा'चा शिकार झाला आहे, त्यांना संवादाचे आणि सुसंस्कारांचे महत्त्व कसे समजणार? ज्यांना अर्बन नक्षलवाद्यांचा आणि आंदोलक-अराजकवाद्यांचा उदोउदो करायचा आहे, त्यांना संघाच्या राष्ट्रभक्तीचा विचार झोंबणार हे उघडच आहे.

ज्या जंतरमंतर आंदोलनाचा हवाला देऊन आज हे लोक अश्रू ढाळत आहेत, त्या आंदोलनामागे कोणत्या आंतरराष्ट्रीय आणि डाव्या शक्ती कार्यरत होत्या, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. भारतात लोकशाही मार्गाने निवडणुका जिंकता येत नाहीत म्हणून रस्त्यावर उतरून अराजकता निर्माण करायची, विदेशी फंडिंगच्या जोरावर तरुणांची दिशाभूल करायची आणि देशाची प्रतिमा जागतिक पातळीवर मलिन करायची, हा कट उघडा पडल्यानंतर सरकारने त्यावर नियमानुसार कारवाई केली. जेव्हा एखादा तरुण आंदोलनाच्या आडून देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देतो, तेव्हा तो केवळ विद्यार्थी किंवा तरुण राहत नाही, तर तो कायदा मोडणारा गुन्हेगार ठरतो. बाळासाहेब ठाकरेंनी नेहमीच अशा राष्ट्रविरोधी, हिंसक आणि दंगलखोर प्रवृत्तींवर आपल्या घणाघाती शैलीत प्रहार केला होता. परंतु आज त्यांचेच उत्तराधिकारी म्हणवून घेणारे सत्तेच्या लालसेने इतके आंधळे झाले आहेत की, त्यांना देश तोडणाऱ्या टोळ्यांमध्ये, जंतरमंतरवर अराजकता माजवणाऱ्यांमध्ये आणि डाव्या विचारसरणीच्या हस्तकांमध्ये हुतात्मा दिसू लागले आहेत. हा स्व. बाळासाहेबांच्या प्रखर राष्ट्रवादी विचारांचा आणि हिंदुत्वाचा झालेला गद्दार विचारांनी केलेला घोर विश्वासघात आहे.

खरं तर या लोकांसाठी अवघड विषय आहे. पण एकदा डोळ्यांवरचा द्वेषाचा चष्मा काढून पाहिले तर, संघ नावाची आई देशातील कानाकोपऱ्यात लाखो वंचित, शोषित, वनवासी आणि गरीब बांधवांच्या आयुष्यात प्रकाशाची वात पेटवण्याचे काम करत असल्याचे, वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून हजारो आदिवासी मुलांच्या शिक्षणाची आणि आरोग्याची व्यवस्था करत असल्याचे, सेवा भारतीच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांमध्ये आणि ग्रामीण भागात मोफत दवाखाने, संस्कार वर्ग आणि रोजगार प्रशिक्षण केंद्र चालवत असल्याचे, सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत ठेवून सैनिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आणि जेव्हा संपूर्ण जग कोरोनाच्या भीषण महामारीत घरात बंद होते, तेव्हा तुम्ही वातानुकूलित बंगल्यात बसून फेसबुक लाईव्ह करत असताना, स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून रोज कोट्यवधी लोकांना अन्न, औषधे आणि रक्ताचा पुरवठा करणारे संघाचे स्वयंसेवकच असल्याचे लक्षात येईल.

जंतरमंतर असो वा मुंबईतील रस्ते, आंदोलनाच्या नावाखाली पोलिसांच्या गाड्या अडवणे, त्यांना धक्काबुक्की करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आणि कायद्याची पायमल्ली करणे याला जर 'उबाठा' गट 'क्रांती' समजत असेल, तर त्यांच्या बुद्धीची कीवच करावीशी वाटते. रिया अहिरसारख्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांचे गोडवे गाताना, पोलिसांवर हात उगारणाऱ्या प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचे पाप हे ठाकरे बंधू करत आहेत. खिळे लावलेले दंडुके आणि एके-४७ असे खोटे नॅरेटिव्ह सेट करणाऱ्यांना, याच डाव्या विचारसरणीच्या लोकांनी देशात आणि विद्यापीठांमध्ये घातलेला हैदोस कसा दिसत नाही? 'कावीळ झालेल्याला सगळे जग पिवळे दिसते' म्हणतात, तशीच काहीशी अवस्था मातोश्रीच्या वातानुकूलित खोलीत बसून यांची झाली आहे.

भाजपा आणि संघ यांच्यात तथाकथित 'केमिकल लोचा' शोधणाऱ्या उबाठा गटाने आधी स्वतःच्या घरात डोकावून पाहावे. ज्या काँग्रेसने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना आयुष्यभर विरोध केला, स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पावलोपावली अपमान केला, त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसण्यात तुम्हाला कसलाही 'लोचा' वाटत नाही का? सत्तेसाठी हिंदुत्वाचा भगवा झेंडा गुंडाळून हिरव्या आणि लाल बावट्याशी सलगी करणाऱ्यांनी संघाच्या मातृत्वावर शंका घेऊ नये. संघ ही अशी आई आहे जी देशासाठी निःस्वार्थ आणि सुसंस्कारित पिढी घडवते, तुमची अवस्था मात्र सत्तेच्या हव्यासापोटी 'ना घर का ना घाट का' अशी झाली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, संघावर चिखलफेक करून 'उबाठा' गटाला आपला गमावलेला जनाधार परत मिळवता येणार नाही. 'सूर्याकडे पाहून थुंकले' तर ती थुंकी स्वतःच्याच तोंडावर पडते, हा निसर्गाचा साधा नियम आहे, जो संजय राऊतांनी आणि त्यांच्या पक्षप्रमुखांनी ध्यानात ठेवावा. दुसऱ्यांच्या घरात डोकावून सल्ले देण्यापेक्षा, आपला उरलासुरला पक्ष कसा वाचवता येईल, याकडे लक्ष द्यावे. कारण, आजचा तरुण वर्ग, म्हणजेच तुमची 'जेन-झी' उघड्या डोळ्यांनी पाहतेय की, राष्ट्र उभारणीसाठी अहोरात्र कोण झटतंय आणि केवळ स्वार्थासाठी तत्त्वांची होळी कोण करतंय!

९२७०३३३८८६

### अशैक्षणिक कामांच्या ओझ्याने शिक्षक त्रस्त

संपूर्ण राज्यात सध्या मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजेच एसआयआरची मोहीम सुरू आहे. त्यासाठी शिक्षकांना जबाबदारी देण्यात आली आहे. आणि त्यानुसार त्यासाठी नियुक्त केलेले शिक्षक घरोघरी जाऊन मतदारयाद्यांची पडताळणी करण्याच्या कामात गुंतलेले आहेत. परंतु, या कामामुळे शिक्षकांच्या मुख्य कामाकडे म्हणजेच अध्यापनाकडे दुर्लक्ष होत आहे. शाळा सकाळच्या सत्रात भरवा असे आवाहन शिक्षणाधिकारी करत आहेत. बांगलादेशी घुसखोरांची नावे शोधण्यासाठी पिढ्यानपिढ्या वास्तव्य केलेल्या मूळ नागरिकांना मनस्ताप सुरू आहे. मतदारयाद्यांची पडताळणी करण्याचा मुद्दा देशपातळीवर महत्त्वाचा झाला आहे. त्यासाठीच शिक्षक या कामासाठी नेमला गेला आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ म्हणून शिक्षक नियुक्त आहेत. या मोहिमेअंतर्गत सध्या शासन स्तरावर जनजागृतीची मोहीम सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक प्रभागात मतदारयाद्यांची आणि ओळखपत्रांची पडताळणी सुरू आहे. याकामी शिक्षकांना जबाबदारी दिलेली असल्यामुळे त्यांचे साहजिकच अध्यापनाच्या कामाकडे दुर्लक्ष होत आहे.

काही ठिकाणी सर्वच शिक्षक या कामासाठी नेमण्यात आले नसल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. शाळा प्रमुखांनी याबाबत कामाचे योग्य नियोजन करणे अपेक्षित आहे. याविषयी शिक्षण विभाग आणि इतर विभागांमध्ये योग्य समन्वय साधला जाण्याची गरज आहे. आणि त्यातूनच मतदारयाद्यांच्या पडताळणीचे काम काटेकोरपणे तसेच वेगाने होऊ शकणार आहे. या कामासाठी शिक्षकांनी आपला अधिकाधिक वेळ द्यावा, अशा सूचना केल्या जात आहे. जे शिक्षक याकामी गुंतले आहेत त्या शिक्षकांना शाळेतील इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत पुरेपूर सहकार्य करणे आवश्यक आहे. आगामी काळात या कामामध्ये पावसाचा अडथळा आल्याने विलंब होत आहे. त्याचीही खबरदारी प्रशासनाने घ्यायला पाहिजे. अध्यापनाव्यतिरिक्त या कामाचा ताण शिक्षक साध्य सहन करत आहेत. त्यांचे मानसिक स्वास्थ्य सांभाळणे गरजेचे आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/ ९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### हे देखील 'इन्फ्रास्ट्रक्चर'च! वास्तवदर्शी अग्रलेख

हे देखील 'इन्फ्रास्ट्रक्चर'च! या शीर्षकाचा शिक्षणासंबंधाचा भयाण वास्तव मांडणारा अतिशय मर्मग्राही, गंभीर व वास्तवदर्शी अग्रलेख वाचला. हा अग्रलेख निश्चितच राज्यकर्त्यांनी व प्रशासनानी विशेष नोंद घेऊन व त्याचे चिंतन, मनन करून शीघ्रातिशीघ्र सुधारणा करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करायला अवश्य प्रवृत्त करणारा आहे. असा अतिशय आवश्यक विषयाला हात घालणारा अप्रतिम लेख लिहिल्याबद्दल तरुण भारतचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व संबंधित राज्यकर्ते व प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने नोंद घेऊन उपाययोजना करावी अशी एक संवेदनशील नागरिक या नात्याने कळकळीची विनंती करतो.

**शरद देशपांडे**/हनुमाननगर, नागपूर

### संभाव्य दुर्घटनांपासून स्वतःला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग, शहरी भाग व अति दुर्गम भाग जलमय झाल्याचे दिसून येते. सोबतच मानवीय, वित्तीय



व पशूंची हान मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरिता प्रत्येकाने सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले, तलाव, डोह, रस्त्यावरील खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमय होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव, पशुपक्षी व वित्तीय हानच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागतात. याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय. आज जंगलतोडीमुळे हवामानात आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे. परंतु मानवाच्या आरोग्यावर सुद्धा मोठा आघात करीत आहे. उत्तराखंड, छत्तीसगड, केरळ, कर्नाटक, ओडिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत. राज्यासह देशात अति पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम खड्ड्यांची दुरुस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रस्त्याच्या वळणावर आवश्यक ते फलक लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे. त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पाहता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले, तलाव, डोह, धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरित केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी - संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharat@gmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# हिमांशु व्हनगावडे यास आंतरराष्ट्रीय मानांकन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

येथील सेंट जोसेफ स्कूलचा हिमांशु व्हनगावडे याने विद्युतगती स्पर्धेत १४६१ आंतरराष्ट्रीय फिडे मानांकन प्राप्त केले. या कामगिरीवर त्याने जागतिक बुद्धिबळ संघटनेकडून अरेना कँडिडेट मास्टर होण्याचा बहुमान पटकावला आहे. संगमेश्वर महाविद्यालयातील लिपीक भारत व्हनगावडे यांचा तो मुलगा आहे. तो येथील पी आर चेस वर्ल्ड अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेत आहे.

# प्राचार्य, ग्रंथपाल व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७व्या वेतन आयोगानुसार अर्जित रजेचे रोखीकरण मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

राज्य शासनाने केंद्र शासनाच्या ७व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार १ जानेवारी, २०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू केली आहे. त्या अनुषंगाने, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासन अनुदानित अभिमत विद्यापीठे, उच्च शिक्षण संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालया/संस्था, तसेच सामाजिक न्याय विभागाकडून हस्तांतरित झालेली अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमधील दीर्घ सुट्टी अनुज्ञेय नसलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार अर्जित रजेचे रोखीकरण देण्यासंदर्भात वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार ६ ऑगस्ट २०२६ रोजी मान्यता दिली आहे. त्यात महाविद्यालयातील प्राचार्य व ग्रंथपाल यांचाही समावेश आहे.

दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त किंवा निधन झालेल्या/होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठीचे वेतन हे मॅट्रिक्समधील वेतन स्तरानुसार ग्राह्य धरण्याबाबत वित्त विभागाच्या २४ मे, २०१९ च्या शासन निर्णयानुसार हे स्पष्ट करण्यात आले आहे.

''दीर्घ सुट्टी कार्यरत नसलेल्या प्राचार्य, ग्रंथपाल व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण अनुज्ञेय आहे. सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनानुसार अर्जित रजेचे रोखीकरण करण्यास मान्यता दिली आहे. यास्तव विभागाने उक्त टिप्पणीत नमूद केलेले संवर्ग हे शिक्षकेत्तर संवर्गात आहेत किंवा कसे यांची त्यांच्या स्तरावरून तपासणी करून योग्य ती कार्यवाही करावी,'' असा अभिप्राय वित्त विभागाने दिला आहे.

### रक्कम थेट खात्यात जमा करा



५ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेशजी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीची बैठक मंत्रालयात पार पडली. त्यानंतर तातडीने याचे परिपत्रक काढण्यात आले. महाराष्ट्र राज्य महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघ व सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन यांच्या पाठपुराव्याचे हे यश आहे. निवृत्तीनंतरच ही रक्कम मिळत असल्यामुळे संबंधित विभागीय सहसंचालकानी ही रक्कम महाविद्यालयाच्या खात्यात जमा न करता थेट संबंधितांच्या पेन्शन खात्यातच जमा करावी

**- दत्ता भोसले, अध्यक्ष**
**सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन**


**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**विविध अभियांत्रिकी कामे**

मंडळ रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 22-2026-SrDENS कामाचे नाव: सहाय्यक मंडळ अभियंता/सोलापूर यांच्या अंतर्गत वाडी-दुधनी विभागात अतिक्रमाणासाठी संवेदनशील असलेल्या शहरांच्या पोचमार्गांवर सीमा भिंतीची तरतूद कामाची अंदाजित किंमत: रु. 6,28,43,290.02 बयाणा रक्कम: रु. 12,56,900.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: 12 महिने निविदा उघडण्याची तारीख: 31/08/2026 निविदा सूचना क्रमांक: 26-2026-SrDENS कामाचे नाव: i) सोलापूर मंडळातील सहाय्यक मंडळ अभियंता/कलबुर्गी उप-विभागांतर्गत सोलापूर-वाडी विभागात किमी 584.8 ते किमी 593.6 दरम्यान एकूण 8.8 किमी टीडब्ल्यूआर काम आणि ii) वरिष्ठ मंडळ अभियंता/दक्षिण/सोलापूर विभागांतर्गत विविध ठिकाणी एमएफडब्ल्यूपीद्वारे 52 किलो आणि 60 किलो रेल्वेचे फ्लॅश बट वेल्डिंग अंमलबजावणी काम ाची अंदाजित किंमत: रु. 5,12,61,705.37 बयाणा रक्कम: रु. 10,25,200.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: लागू नाही निविदा उघडण्याची तारीख: 27/08/2026 निविदा सूचना क्रमांक: 27-2026-SrDENS कामाचे नाव: 1. सहाय्यक मंडळ अभियंता/दक्षिण/सोलापूर यांच्या अंतर्गत टिकेवाडी, तिलटी, अकलकोट रोड, नागान्सूर, बोरोटी, दुधनी येथे सेवा इमारती, फिरते क्षेत्र, प्लॅटफॉर्म पृष्ठभाग, फूट ओव्हर ब्रिज, कव्हर ओव्हर प्लॅटफॉर्म यांची सुधारणा व दुरुस्ती आणि रंगकाम. 2. सहाय्यक मंडळ अभियंता/कलबुर्गी उप-विभागांतर्गत कुईवाडी विभागात (ताजमुलक सुलतानासह) सेवा इमारतींची सुधारणा व दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: रु. 4,79,30,512.15 बयाणा रक्कम: रु. 9,58,600.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 12 महिने निविदा उघडण्याची तारीख: 28/08/2026 संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी प्रसिद्ध केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक नोंदवण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाईटला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. वेबसाईट: www.ireps.gov.in.

**मंडळ रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्य), सोलापूर**

ANJ-29

**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा**


# शौर्य रंगापुरे व दूर्वा महिंद्रकर प्रथम

## रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट शालेय मराठी वक्तृत्व स्पर्धा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटतर्फे आंतरशालेय मराठी वक्तृत्व स्पर्धेत लहान गटात शौर्य रंगापुरे व मोठ्या गटात दूर्वा महिंद्रकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

लहान व मोठ्या गटातील तब्बल ६० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपल्या वक्तृत्वाची प्रभावी छाप उमटवली. 'प्लास्टिकमुक्ती', 'प्रत्येक मुलाने शाळेत जायलाच हवे', 'एक विद्यार्थी एक झाड', 'वाचन संस्कृतीचे महत्त्व', 'जलसंधारण भविष्याची हमी', 'स्वच्छता आणि आरोग्य', 'आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक' आणि 'वृक्षसंवर्धन सामाजिक जबाबदारी' अशा वर्तमानाशी निगडित आणि सामाजिक भान जागविणाऱ्या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. या स्पर्धेचे परीक्षण मराठी भाषेचे अभ्यासक व साहित्यप्रेमी केदार केसकर आणि संध्या रघोजी यांनी केले. या स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा रोटरी ई क्लब इलाईटचे पदाधिकारी संदीप कुलकर्णी अध्यक्ष, सेक्रेटरी डॉ. सौरभ ढोपरे, सचिन तोष्णीवाल, मनिष लोया, अभिजित छत्रबंद, आणि परीक्षकांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला.

**या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव**

**लहान गट (प्रथम तीन व उत्तेजनार्थ) :** शौर्य रंगापुरे, शुभदा कुलकर्णी, मधुरा घाडगे, ओवी तडवळकर.

**मोठा गट :** दूर्वा महिंद्रकर, श्रुती स्वामी, अवनी सामल, सई वाघचवरे

# कौशल्याच्या धाग्यांनी विणली स्वावलंबनाची नवी स्वप्ने

## एलबीपीएम महाविद्यालयात फॅशन डिझाईन कोर्स प्रमाणपत्र वितरण समारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

कल्पकता, कौशल्य आणि आत्मविश्वासाला उद्योजकतेची दिशा मिळाली तर सामान्य हातही असामान्य भविष्य घडवू शकतात. याच विचाराची प्रचिती सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आयोजित फॅशन डिझाईन कोर्सच्या प्रमाणपत्र वितरण समारंभात आली.

यावेळी स्व. जयकुमारजी पाटील कौशल्य विकास केंद्रातील यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे होते. डॉ. देवराव मुंडे, प्रशिक्षक आफरीन शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रशिक्षक आफरीन शेख यांनी फॅशन डिझायनिंगमधील संधींबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रदीप जगताप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुकेशिनी कांबळे यांनी केले, तर प्रा. दीपाली सातपुते यांनी आभार मानले. यावेळी प्रा. निलोफर तांबोळी, डॉ. संतोष मारकवाड, प्रा. ऐश्वर्या मेटे, प्रा. अमृता उदगिरी आदी उपस्थित होते.

**गृहिणींसाठीही स्वप्नांना 'दुसरी संधी'**

यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे म्हणाले की, हा कोर्स केवळ महाविद्यालयीन विद्यार्थिनींपुरता मर्यादित नाही. गृहिणी तसेच विविध कारणांनी औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या महिलांनाही या कोर्समध्ये प्रवेश घेता येतो. त्यामुळे शिक्षण अर्धवट राहिले म्हणून करिअरची दारे बंद झाली, या समजुतीला हा उपक्रम छेद देत आहे. वय अथवा शैक्षणिक प्रवासातील खंड यापेक्षा शिकण्याची इच्छा आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द महत्त्वाची असल्याचा संदेश यातून दिला जात आहे.


**जाहीर नोटीस**

रे.मु.नं. ५७/२०१३
नि. ३१२

**माळशिरस येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

**श्री. अविनाश देविदास जेऊरकर** - **वादी**
**श्री. विजयसिंग बाळुसिंग रजपुत**
विरूध्द
**महाराष्ट्र सरकार वगैरे** - **प्रतिवादी**

तमांत लोकांना विशेषतः जि. सोलापूर, ता. माळशिरस पैकी मौजे पिलीव व परिसरातील लोकाना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी यातील वादी श्री. अविनाश देविदास जेऊरकर व श्री. विजयसिंग बाळुसिंग रजपुत दोघे रा. पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी सार्वजनिक हितासाठी प्राथनिक स्वरूपात जि. सोलापूर असून ता. माळशिरस पैकी मौजे पिलीव येथील सिटी सर्व्हे नंबर ८४८ या मिळकतीच्या पूर्व अंगास दक्षिण उत्तर चालीचा असणारा रस्ता जो सातारा पंढरपूर रस्त्यास दक्षिणेस मिळतो व उत्तरेकडे सरकारी दवाखान्याकडे जातो हा गाव रस्ता गेल्या ४० वर्षापासून असून त्यांचेवर सन २००७ साली जिल्हा परिषद सोलापूर मार्फत सिमेंट काँकीटीकरण झाले असून सदरील सार्वजनिक रस्त्यावर यातील प्रतिवादी नं.४, ६ व ७ यांनी अतिक्रमण करून कसलेही कच्चा अगर पक्क्या स्वरूपाचे बांधकाम करू नये अगर सार्वजनिक रस्त्याच्या वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशा निरंतर ताकीदीसाठी सदरचा दावा या मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी आता यातील वादी प्रतिवादी नं.४, ६ व ७ याचे दरम्यान तडजोड झालेली आहे. यातील वादी यांनी सदरचा दावा हा सार्वजनिक हितासाठी दाखल केलेला असलेने यातील वादी व प्रतिवादी नं. ४, ६ व ७ यांचे दरम्यान झालेल्या तडजोडीप्रमाणे यातील प्रतिवादी नं. ४, ६ व ७ यांनी ग्रामपंचायत पिलीव यांना सदरचा रस्ता १४.६ (साडे चौदा) फूट देऊन ते खुला केलेला आहे. त्याप्रमाणे तसे तडजोड पुरसिसमध्ये नमूद करून तशी तउजोड पुरसिस ही वर नमूद केलेल्या दाव्याकामी दिलेली आहे. तथापी यातील वादी यांनी सदरचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक हितासाठी प्राथनिक स्वरूपात दाखल केलेला असलेने ही जीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत किंवा सदर दाव्याकामी नेमलेली ता. १०/०९/२०२६ या दिवशी कोणाची कसलीही हरकत असल्यास ती हरकत दयावी अन्यथा तशी कोणाची कसलीही हरकत मुदतीत न आल्यास यातील वादी व प्रतिवादी नं. ४, ६ व ७ यांना तडजोड करण्यास परवानगी देऊन पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

आज ता. ०७/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय न्यायालय**
**व. स्तर माळशिरस**



**जाहीर समन्स**

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**महेश अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
**पत्ता : सोहम प्लाझा, सैफुल एरिया, सोलापूर**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १३०३/२०२५-२६ | २,६७,६६४.५०/- | २ | **महेश सुरेश टेकाळे** रा. ७४५, शुक्रवार पेठ उत्तर सोलापूर ४१३००२ |

या कामी अर्जदार बैंक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने शुक्रवार दि. २१/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अमर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रह समजण्यात येईल.

आज दि. ०७/०८/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्देसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



**श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित**

**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**

**रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर**

**Programmes Accredited by NBA, New Delhi.**

**डिप्लोम इंजिनिअरींग प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश २०२६-२७**

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था स्तरावरील रिक्त जागांसाठी व केंदिभूत फेरीच्या शिल्लक प्रवेशाकरीता विद्यार्थिनींनी कॉलेजमध्ये प्रत्यक्ष येऊन प्रवेश अर्ज जमा करावेत.

| Courses | |
|---|---|
| Artificial Intelligence and Machine Learning (Women) | |
| Civil Engineering (Women) | Information Technology (Women) |
| Computer Engineering (Women) | Electrical Engineering (Women) |
| Electronics & Telecommunication Engineering (Women) | |

सर्व इच्छूक विदयार्थिनींनी आवश्यक कागदपत्रे व प्रवेश शुल्कासह खालील तारखेपर्यंत कॉलेजमध्ये प्रवेश अर्ज जमा करावे. पात्रतेचे निकष व इतर माहितीसाठी कॉलेजच्या www.siddheshwarwomenspoly.org या संकेतस्थळाला भेट दया.

प्रथम व थेट व्दितीय वर्षाकरीता प्रवेश अर्ज करण्याची अंतिम तारीख १०/०८/२०२६

कार्यालय स. १० ते सा. ०६ वाजेपर्यंत खुले राहील.

प्रवेशासाठी संपर्क प्रा. **श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५, प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६**



**महाराष्ट्र शासन**

**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे**

**पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती जाहिरात-२०२६**

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्या आस्थापनेवरील शासकीय आश्रमशाळेतील पेसा/नॉनपेसा क्षेत्रातील रिक्त असलेली प्राथमिक शिक्षक (शिक्षण सेवक), माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) व उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) या संवर्गातील पदे पवित्र पोर्टलद्वारे १०० टक्के भरणेकरिता खालील नमूद केलेल्या पदापैकी शैक्षणिक व व्यावसायिक अहर्ता धारण करीत असलेल्या पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | विषय | ठाणे (पेसा) | पुणे (पेसा) | पालघर (पेसा) | ठाणे विभाग (नॉन पेसा) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) | एच.एस.सी. डी.एड | सर्व विषय | २६ | ९ | ८९ | १८४ | ३०८ |
| २ | प्राथमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) | एच.एस.सी. डी.एड | सर्व विषय | ७ | ० | २ | २१ | ३० |
| ३ | माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) | बी.ए.बी.एड बी.एस्सी बी.एड. | मराठी व इतर, गणित, विज्ञान, इंग्रजी | ८ | २ | ४४ | ९७ | १५१ |
| ४ | माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) | बी.ए.बी.एड बी.एस्सी बी.एड. | मराठी व इतर, गणित, विज्ञान, इंग्रजी | २ | ० | ० | ६ | ८ |
| ५ | उच्च माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) | एम.ए.बी.एड एम.एस्सी. बी.एड | मराठी, इंग्रजी, इतिहास/राज्यशास्त्र, भूगोल / अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र | १० | १ | १३ | ५२ | ११६ |
| **एकूण** | | | | **५३** | **१२** | **१८८** | **३६०** | **६१३** |

वरील जागा हया अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विमाप्र, इमाव, ई.डब्ल्यू.एस, एसईबीसी, अराखीव यानुसार समांतर व सामाजिक आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नोंद करावी.

उमेदवारांना प्राधान्यक्रम Generate करण्याची सुविधा दिनांक ०६/०८/२०२६ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच प्राधान्यक्रम डेलज्ञ करण्यासाठी दिनांक ०६/०८/२०२६ ते ११/०८/२०२६ असा कालावधी देण्यात येत आहे.

आदिवासी विकास विभागातील अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षक (शिक्षण सेवक), माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) व उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) संवर्गाची सविस्तर जाहिरात आदिवासी विकास विभागाच्या https://tribal.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**ठिकाण :- ठाणे**
**दिनांक :- ०७/०८/२०२६**

**(स्वाक्षरी/-)**
**(गोपिचंद कदम, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे.**

**विमाका/पुणे/जाहि./१२०/२०२५-२६**



**करमाळा नगरपरिषद**

**करमाळा, जि. सोलापूर ४१३००३**

**दूरध्वनी क्रमांक (०२१८२) २२०३१५** **E-Mail : comckarmala@gmail.com**

**जावक क्रमांक : विद्युत विभाग/१२५९/२०२६** **दिनांक ०७/०८/२०२६**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

| अ. न. | विभागाचे नाव | निविदा/कामाचे नाव | अंदाजे परिमाण | टेंडर फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्युत विभाग | ९ मीटरचा हायमास्ट दिव्याचा पोल, पोल फिटींग साहित्य, एलईडी १०० वॅट दिव्यासह फाऊंडेशन करुन चालू करुन देणे | अंदाजपत्रक नुसार | ५००/- | २,०००/- |

वरीलप्रमाणे हाती घेण्यात आलेल्या बंद लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. त्याकरिता टेंडर फॉर्म तसेच सदर निविदेकरिता अटी व शर्ती विद्युत विभागाकडे दि. ०८/०८/२०२६ ते दि. १७/०८/२०२६ या कालावधीत सुट्टी खेरीज उपलब्ध आहेत. तरी इच्छुक निविदा धारकांनी दि. १८/०८/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यन्त द्विलिफाफा पध्दतीत आपली निविदा सादर करण्यात यावे. तसेच विहीत मुदतीनंतर आलेले निविदांचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**



**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**

**जय जगदंबा बहुउद्देशीय संस्था, सर्जापूर**

**ता. बार्शी, जि. सोलापूर**

संस्थेच्या (273002SC028) जय जगदंबा बहुउद्देशीय संस्था, सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर संचलित मराठी माध्यमाच्या सोलापूर व रायगड जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयात पवित्र पोर्टलमार्फत ऑनलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे शिक्षक नेमणे आहे.

| अ. क्र. | माध्यम | पद | मानधन प्रकार वेतनश्रेणी / अनुदानवर | विषय व पदसंख्या | संभाव्य पदे | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | शिक्षणसेवक (इयत्ता ५ वी) | एकत्रित अनुदान १६,०००/- अनुदानित | सर्व विषय ०१ | ०१ | अ.जा.- ०३ अ.ज.- ०३ वि.जा.(अ) - ०१ इ.मा.व. - ०६ वि.मा.प्र. - ०१ (एस.इ.बी.सी) (समांतर आरक्षण नियमाप्रमाणे राहील) |
| २ | मराठी | शिक्षणसेवक (इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी) | एकत्रित अनुदान १६,०००/- अनुदानित | इंग्रजी - १ गणित - २ विज्ञान - २ | ०५ | |
| ३ | मराठी | माध्य. शिक्षक (इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी) | वेतनश्रेणी ५-१४ : ३८६००/- १२२८००/- (८०% अनुदानित) | विज्ञान-०१ | ०१ | |
| ४ | मराठी | शिक्षणसेवक इयत्ता ९ वी ते इयत्ता १० वी | एकत्रित अनुदान १८०००/- अनुदानित | इंग्रजी - २ गणित - ३ विज्ञान - २ | ०७ | |
| | | | | एकूण | १४ | |

अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT, TET / CTET) दिलेल्या उमेदवारापैकी ज्यानी पवित्र प्रणालीवर वैयक्तिक माहिती (५वी, ६वी ते ८वी, ९वी ते १०वी) स्वप्रमाणीत केलेली आहे. तसेच उमेदवार जाहिरातीनुसार अर्ज करु शकतात.

इच्छुक व अर्हताधारक करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीच्या अनुषंगाने पदासाठी पसंतीक्रम नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरावेत. संकेतस्थळ https://mahateacherrecruitment.org.in

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी.१, दि ०७ फेब्रुवारी २०१९ व शालेय शिक्षण क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७४/टीएनटी.१, दि. २१ जुन २०२३ नुसार शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आवश्यक आहे.

**टिप -** १) वरील रिक्त पदांसाठी पवित्र प्रणालीमार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करु नयेत.

२) उमेदवाराने पवित्र प्रणालीमार्फत दि. ०६/०८/२०२६ पासून प्राधान्यक्रम ऑनलाईन भरावा.

**सही/-**
**डॉ. कपील बाळासाहेब कोरके**
**अध्यक्ष**

**सही/-**
**डॉ. अमिता बाळासाहेब कोरके**
**जनरल सेक्रेटरी**

**जय जगदंबा बहुउद्देशीय संस्था, सर्जापूर, ता. बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### एरोबिक जिम्नॅस्टिक्स अरिहा पांगमबामला सुवर्ण



**नवी दिल्ली :** आशियाई एरोबिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत वरिष्ठ महिलांच्या वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारी अरिहा पांगमबाम ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. या भारतीय जिम्नॅस्टने अंतिम फेरीत १९.१०० गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले आणि आशियाई स्पर्धेत भारतासाठी या प्रकारातील पहिले सुवर्णपदक जिंकले. अरिहाने कलात्मकतेसाठी ८.६५०, सादरीकरणासाठी ७.६०० आणि कठीणतेसाठी २.८५० गुण मिळवित हे विजेतेपद निश्चित केले. ही आमच्यासाठी एक मोठी कामगिरी आहे. तिने उत्कृष्ट कामगिरी केली. तिचे आणि तिच्या प्रशिक्षकाचे अभिनंदन, असे जिम्नॅस्टिक फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुधीर मित्तल यांनी म्हटले.

### कमी निधी असूनही पॅरा-क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी

**नवी दिल्ली :** तुलनेने कमी निधी असूनही देशातील पॅरा-खेळाडू पॅरा-क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करीत आहे व अभूतपूर्व यश संपादन करीत आहे, असे पॅरिस पॅरालिम्पिक्समध्ये उंच उडी प्रकारात रौप्यपदक जिंकणारा शरद कुमार म्हणाला. शरद कुमारने 'पॅरा एलन - सबका मैदान' या भारत-फ्रान्स संयुक्त उपक्रमादरम्यान सांगितले. हा उपक्रम राष्ट्रीय राजधानीत फ्रेंच भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थ्यांशी संवाद साधणारा कार्यक्रम होता. शरद कुमारने अलीकडेच ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पॅरा खेळाडूंच्या सर्वोत्तम कामगिरीचे कौतुक केले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी पॅरा-मोहिमेअंतर्गत भारताच्या पॅरा-क्रीडा पथकाने सात पदके (तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य) जिंकली. इतर खेळांच्या तुलनेत पॅरा-क्रीडा प्रकारांवर खर्च केला जाणारा निधी कमी आहे, तरीही आम्ही जबरदस्त कामगिरी करीत आहोत. जेव्हा पॅरा-खेळाडू मैदानात उतरतात, तेव्हा खेळ हे सिद्ध करतो की कोणीही जिंकू शकते, असे तो म्हणाला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पॅरा-क्रीडा प्रकारांत सुवर्णपदके जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळेच आमचे मानांकन २३ व्या स्थानावरून चौथ्या स्थानावर पोहोचले. एकूण ३९ पदके जिंकल्यानंतर भारताच्या अंतिम स्थानाबाबत बोलायचे तर, शेवटच्या दोन सुवर्णपदकांमुळेच आम्हाला पहिल्या चारमध्ये स्थान मिळवता आले, असे तो म्हणाला.

### जम्मू-काश्मीर गोल्फमध्ये खालिन जोशी विजेता

**श्रीनगर :** येथील निसर्गरम्य 'रॉयल स्प्रिंग्स गोल्फ कोर्स'वर शुक्रवारी पार पडलेल्या १ कोटी रुपये बक्षीस रकमेच्या 'जम्मू अँड काश्मीर ओपन गोल्फ' स्पर्धेत खालिन जोशीने 'पाच-अंडर ६६' असा दमदार खेळ करीत नऊ शॉट्सच्या मोठ्या फरकाने विजय मिळविला. बेंगळुरूच्या ३३ वर्षीय गोल्फपटूने (६३-६६-६५-६६) स्पर्धेत एकूण '२४-अंडर २६०' अशी गुणसंख्या नोंदवित आपले आठवे व्यावसायिक विजेतेपद आणि २०२६ च्या 'डीपी वर्ल्ड पीजीटीआय' हंगामातील दुसरा विजय साकारला. जोशीने विजेतेपदाचा १५ लाख रुपयांचा धनादेश स्वीकारला आणि 'डीपी वर्ल्ड पीजीटीआय' क्रमवारीत १३ व्या स्थानावरून आठव्या स्थानावर झेप घेतली. आशियन टूर'मध्ये दोनदा विजेतेपद मिळविणाऱ्या दिल्लीच्या रशीद खानने '१५-अंडर २६९' गुणांसह उपविजेतेपद पटकावले. 'पानिपतच्या शुभम जगलानने '१४-अंडर २७०' गुणांसह तिसरे स्थान मिळवत या हंगामातील आपली सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. विशेषतः पहिल्या फेअरवेवर शॉट हुकल्यामुळे सुरुवातीला मला नक्कीच अस्वस्थता वाटत होती, मात्र तिसऱ्या व चौथ्या होलवरील बर्डीजमुळे माझा आत्मविश्वास वाढला. संपूर्ण आठवडाभर मी ज्या प्रकारे खेळलो आणि माझी एकूण कामगिरी जशी झाली, त्याबद्दल मी खूप आनंदी आहे, असे खालिन जोशी म्हणाला.

# जडेजा, सुथार, कुलदीपने टिपले प्रत्येकी दोन बळी

## श्रीलंका एकादश ८ बाद ३६३

**कोलंबो, ७ ऑगस्ट**

येथील 'नॉनडिस्क्रिप्ट्स क्रिकेट क्लब'च्या मैदानावर सुरू असलेल्या तीन दिवसीय सराव क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी श्रीलंकेच्या 'एसएलसी एकादश'ने ९० षटकांत ८ बाद ३६३ धावा केल्या. भारताच्या फिरकी गोलंदाजांच्या फळीतील रवींद्र जडेजा, मानव सुथार व कुलदीप यादवने प्रत्येकी दोन बळी मिळविले. नियमित कर्णधार शुभमन गिल याला उजव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाल्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत के.एल. राहुलने संघाचे नेतृत्व केले.


कुलदीप यादव


मानव सुथार

दिवसाच्या सुरुवातीला वेगवान गोलंदाजांना फारशी मदत न करणाऱ्या सपाट खेळपट्टीवरही जडेजा (२-६४), सुथार (२-४८) व कुलदीप (२-७६) या त्रिकुटाने चेंडूला चांगले वळण दिले. उंचपुरा वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारने एक बळी मिळविला, तर मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाला मात्र एकही बळी मिळाला नाही.नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर यजमान संघाला दमदार सुरुवात मिळाली. सलामीवीर निशान मदुष्का आणि रविंदू रसांथाने पहिल्या गड्यासाठी शतकी भागीदारी करीत सकाळच्या सत्रावर वर्चस्व गाजविले. आक्रमक पवित्रा घेत खेळणाऱ्या मदुष्काने उत्कृष्ट लयीत फलंदाजी केली व भारतीय वेगवान गोलंदाजांची मैदानावर सर्वत्र धुलाई केली; मात्र दुर्दैवी गैरसमजामुळे तो ६६ धावांवर धावबाद झाला.

नाममात्र हिरवळ असलेल्या खेळपट्टीवर सिराज व कृष्णाने सुरुवातीच्या काळात अचूक शिस्त राखता आली नाही. आयपीएल २०२६ नंतर पहिल्यांदाच मैदानात उतरलेल्या जडेजाने दुपारच्या जेवणानंतर दुसऱ्या भागीदारीसाठीची भागीदारी तोडली; त्याने पासिंदू सुरीयाबंदाराला एका वेगाने सरळ स्टम्पवर आदळणाऱ्या चेंडूवर त्रिफळाचीत केले.

त्यानंतर सुथारने चेंडू हवेत फिरवण्याची व वळवण्याची कला दाखवली. त्याने रसांथाला पुढे येऊन फटका मारण्याच्या घाईत चूक करण्यास भाग पाडले आणि आणखी एक धोकादायक भागीदारी संपुष्टात आणली. ब्रारने वेगवान आणि उसळी घेणाऱ्या चेंडूंचा प्रभावी मारा केला आणि चहापानाच्या विश्रांतीपूर्वी पवन रत्नानायकेला बाद केले. अखेरच्या सत्रात खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना मदत करू लागल्याने भारताने सामन्यावर अधिक पकड मिळविली. कुलदीपने अहान विक्रमसिंघेला बाद केले; अहानने 'स्वीप' फटका मारण्याचा प्रयत्न केला असता चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून 'डीप'मध्ये उभा असलेल्या ब्रारच्या हातात गेला. त्यानंतर कुलदीपने अंजला बांदाराला पायचीत करीत श्रीलंकेच्या मधल्या फळीची कंबर मोडली.

कर्णधार सोनल दिनुशाने आक्रमक पवित्रा घेत सुरेख अर्धशतक झळकावले आणि यजमान संघाला ३०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. मात्र, त्यानंतर जडेजाच्या सरळ चेंडूवर रमेश मेंडिस पायचीत झाला, तर सुथारने दिनुशाची ५२ धावांची खेळी संपुष्टात आणली.

उशिरा संघात आलेला ऑफ-स्पिनर सारांश जैनने बराच वेळ गोलंदाजी केली पण त्याला यश मिळाले नाही. १५ ऑगस्टपासून गॅले येथे श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय गोलंदाजांना भरपूर सराव मिळाला, तरीही सराव सामन्याच्या पहिल्याच दिवशी ३६० हून अधिक धावा दिल्या गेल्याची त्यांना नक्कीच चिंता वाटत असेल. ◂ (वृत्तसंस्था)

# अस्मिता, रक्षिता उपांत्य फेरीत

## कोरिया मास्टर्स बॅडमिंटन : तन्वी शर्माचे आव्हान संपुष्टात


रक्षिता श्री


अस्मिता चलिहा

**आसान, ७ ऑगस्ट**

शुक्रवारी येथे झालेल्या 'कोरिया मास्टर्स सुपर ३००' बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत संघर्षपूर्ण विजय मिळवल्यानंतर, भारताच्या अस्मिता चालिहा आणि रक्षिता रामराज आता महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत एकमेकींशी भिडणार आहेत.

जागतिक क्रमवारीत ५० व्या स्थानावर असलेल्या अस्मिताने स्पर्धेतील आतापर्यंतचा सर्वात मोठा उलटफेर घडवून आणला. तिने 'आसान यी सन-सिन जिम्नॅशियम'मध्ये झालेल्या रोमांचक उपांत्यपूर्व सामन्यात जपानच्या अव्वल मानांकित व जागतिक क्रमवारीत २२ व्या स्थानावर असलेल्या हिना अकेचीचा २०-२२, २१-१५, २१-१९ असा पराभव केला. या विजयामुळे भारतीय खेळाडूला गत वर्षी 'मलेशिया सुपर १००' स्पर्धेत झालेल्या एकमेव मागील सामन्यातील पराभवाचा बदला घेता आला.

दुसरीकडे, रक्षिताने एका गेमने पिछाडीवर पडल्यानंतर जोरदार मुसंडी मारली व तिसऱ्या मानांकित व सहकारी भारतीय खेळाडू तन्वी शर्माचा १८-२१, २१-१९, २१-१८ असा पराभव केला. हा सामना एका तासापेक्षा जास्त काळ चालला. तन्वीविरुद्धचा तिचा हा चौथा विजय होता; तन्वीने गत आठवड्यातच 'तैपेई ओपन'मध्ये आपले पहिले 'बीडब्ल्यूएफ' विजेतेपद पटकावले होते.

मात्र, भारताच्या कृष्णा प्रसाद गरागा व पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय या जोडीला मलेशियाच्या मॅन वेई चोंग आणि सोह वूई यिक या जोडीकडून ७-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागल्याने स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

### अस्मिताचा हिनावर विजय

दोन डावखुऱ्या खेळाडूंमधील या लढतीत, हिनाने अस्मिताविरुद्ध मध्यंतराच्या वेळी ११-९ अशी आघाडी मिळविली. हिनाचा फटका नेटला लागल्यामुळे अस्मिताला २०-१९ असा 'गेम पॉइंट' मिळाला, परंतु तिला त्याचे रूपांतर विजयात करता आले नाही. त्यानंतर हिनाने बरोबरी साधली, पण त्यानंतर अस्मिताचा फटका कोर्टाबाहेर गेल्याने हिनाने 'क्रॉस-कोर्ट विनर' मारत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये अस्मिताने जोरदार खेळ केला, तिने संयम राखत सहापैकी पाच गुण जिंकत सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. निर्णायक गेममध्येही अस्मिताने ९-३ अशी आघाडी घेतली, मात्र त्यानंतर हिनाने जिद्दीने पुनरागमन करत सलग सहा गुण जिंकले आणि अंतर १७-१८ असे कमी केले. तरीही, अस्मिताने अंतिम टप्प्यात आपला संयम राखला व अविस्मरणीय विजय मिळविला. ◂ (वृत्तसंस्था)

### रक्षिताकडून तन्वीचा पराभव

पहिल्या गेममध्ये रक्षिताने १३-८ अशी आघाडी घेतली होती, परंतु तन्वीने जबरदस्त पुनरागमन केले. तिने पुढील नऊपैकी आठ गुण जिंकत ८-१३ वरून १६-१४ अशी मजल मारली आणि गेम जिंकला. दुसरा गेमही अत्यंत चुरशीचा ठरला. मध्यंतराच्या वेळी रक्षिताकडे दोन गुणांची निसटती आघाडी होती आणि तन्वीचा फटका नेटला लागल्यामुळे तिला दोन 'गेम पॉइंट्स' मिळाले. तिने पहिला 'गेम पॉइंट' वाया घालवला, पण तन्वीचा परतीचा फटका कोर्टाबाहेर गेल्याने दुसऱ्या संधीचे विजयात रूपांतर केले. निर्णायक गेममध्येही तशीच स्थिती होती; रक्षिताने दोन गुणांची निसटती आघाडी घेऊन विश्रांती गाठली. गुणसंख्या १४-१४ अशी बरोबरीत असताना तन्वीने निर्णायक क्षणी चुका केल्या; त्यामुळे रक्षिताला १९-१६ अशी आघाडी मिळाली.तन्वीचा आणखी एक चुकीचा 'क्रॉस-कोर्ट स्मॅश' रक्षिताला चार 'मॅच पॉइंट्स' देऊन गेला आणि तन्वीचा फटका पुन्हा एकदा नेटला लागताच रक्षिताने विजय निश्चित केला. ■

# श्रीलंकेच्या फिरकीपटूंविरुद्ध बचावात्मक नव्हे, आक्रमक पवित्रा घ्या

## भारतीय फलंदाजांना रहाणेचा सल्ला

**बेंगळुरू, ७ ऑगस्ट**

आगामी १५ ऑगस्टपासून गॅले येथे सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत श्रीलंकेच्या फिरकीपटूंविरुद्ध भारतीय फलंदाजांनी बचावात्मक पवित्रा न घेता 'आक्रमक पवित्रा' ठेवावा,. श्रीलंकेच्या संघात दर्जेदार फिरकीपटू असल्याने भारतीय फलंदाजांनी वर्चस्व गाजवणारी खेळी करणे आवश्यक आहे, असा सल्ला माजी कर्णधार अजिंक्य रहाणेने दिला आहे.

२०१७ मध्ये श्रीलंकेच्या दौऱ्यावर भारताने ३-० असा मालिका विजय मिळविला होता; त्या मालिकेत रहाणेने एक शतक आणि एका अर्धशतकासह २०० हून अधिक धावा करीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

मला वाटते की श्रीलंकेत पहिल्या दिवशी खेळपट्टी सहसा खूप चांगली असते. पण फलंदाज म्हणून गोलंदाजावर वर्चस्व गाजविणे खूप महत्त्वाचे असते. श्रीलंकेत खेळताना मी हेच शिकलो आहे. तुम्ही तिथे खूप जास्त बचावात्मक राहू शकत नाही, असे नुकतीच निवृत्ती जाहीर केलेल्या रहाणेने एका मुलाखतीत सांगितले.

तुम्हाला कदाचित अधिक आक्रमक पवित्रा घ्यावा लागेल कारण तिथल्या खेळपट्ट्या फिरकीला अनुकूल असतील आणि श्रीलंकेकडे चांगले फिरकीपटू आहेत.



शिवाय, यजमान संघाचा पराभव करणे नेहमीच कठीण असते. इतकी वर्षे क्रिकेट खेळताना मी जे काही शिकलो आहे, त्यावरून हेच समजते की तुम्ही कोणालाही कमी लेखू शकत नाही. त्यामुळे मला वाटते की, वैयक्तिक पातळीवर स्वतःची रणनीती असणे व आक्रमक पवित्रा ठेवणे महत्त्वाचे आहे. कसोटी क्रिकेटमध्येही हीच गोष्ट निर्णायक ठरेल, असेही तो म्हणाला.

अलीकडच्या काळात, विशेषतः टी-२० प्रकाराची लोकप्रियता वाढल्यामुळे कसोटी क्रिकेटमधील फलंदाजीचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. खेळात प्रचंड बदल झाले आहेत. कसोटी क्रिकेटबद्दल बोलायचे तर आता अनेक टी-२० खेळाडू कसोटी क्रिकेटमध्येही खेळताना दिसतात. 'स्कूप', 'लॅप', 'स्विच हिट' आणि 'रिव्हर्स स्वीप' यांसारखे फटके सातत्याने खेळले जात आहेत. मला वाटते ही खूप चांगली गोष्ट आहे. आधुनिक क्रिकेटमध्ये परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे, असे तो म्हणाला.अजिंक्य रहाणे हा एकेकाळी भारतासाठी तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये खेळला.

खेळाडूंना वेगवेगळ्या प्रकारच्या क्रिकेटशी खूप लवकर जुळवून घ्यावे लागेल, कारण सध्या तशीच मानसिकता असणे गरजेचे आहे. कसोटी सामना संपताच - कदाचित एका आठवड्याच्या आतच - तुम्हाला टी-२० किंवा एकदिवसीय सामने खेळावे लागतात, किंवा टी-२० नंतर थेट कसोटी क्रिकेटमध्ये उतरावे लागते. त्यामुळे तशी मानसिकता असणे व परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत खेळाचा दर्जा प्रचंड उंचावला आहे, असेही त्याने नमूद केले.

त्याचप्रमाणे, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी गोलंदाजांमध्येही नवनवीन प्रयोग करण्याची वृत्ती दिसून येत असल्याचे रहाणेने सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# ११ व्या वर्षी शर्वानिका 'महिला फिडे मास्टर'

## हम्पी, हरिकापेक्षा वेगाने गाठला २२०० रेटिंगचा टप्पा

**चेन्नई, ७ ऑगस्ट**

तमिळनाडूच्या ११ वर्षे व चार महिने वयाच्या ए.एस. शर्वानिकाने २२३९ चे 'लाइव्ह क्लासिकल रेटिंग' गाठणारी सर्वात तरुण भारतीय मुलगी होण्याचा मान मिळवला आहे. या कामगिरीसह तिने आपल्या वेगाने वाढणाऱ्या यशाच्या यादीत 'महिला फिडे मास्टर' (डब्ल्यूएफएम) या किताबची भर घातली आहे.

अरियालूर जिल्ह्यातील या युवा खेळाडूने 'जलद बुद्धिबळ'मध्ये २०८४ रेटिंगसह १८ वर्षांखालील मुलींच्या गटात भारतात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, देशातील २३ वर्षांखालील सक्रिय महिला खेळाडूंमध्ये ती दिव्या देशमुख, सविता श्री बी. आणि रक्षिता रवी यांच्यापाठोपाठ चौथ्या स्थानावर आहे.तमिळनाडूच्या या युवा खेळाडूने आतापर्यंतच्या कोणत्याही भारतीय मुलीच्या तुलनेत सर्वात जलद गतीने २२३९ चे 'लाइव्ह क्लासिकल रेटिंग' गाठले आहे; तसेच देशातील '२३ वर्षांखालील' वयोगटातील सक्रिय महिला खेळाडूंमध्ये 'रॅपिड' प्रकारात ती चौथ्या स्थानावर आहे.

भारताच्या अत्यंत यशस्वी महिला खेळाडूंपैकी एक असलेल्या हरिका द्रोणावल्लीने वयाच्या साधारण ११ वर्षे आणि नऊ महिन्यांत अशाच प्रकारचे रेटिंग गाठले होते; तर कोनेरू हम्पीने वयाची १२ वर्षे पूर्ण केल्यानंतरच हा टप्पा ओलांडला होता.


ए.एस. शर्वानिका

शर्वानिकाची ही अलीकडील प्रगती युरोपमधील एका आव्हानात्मक दौऱ्यानंतर दिसून आली, त्याची सांगता पार्दुबिसे येथील 'झेक ओपन' स्पर्धेत झाली. 'ग्रँडमास्टर' दर्जाच्या तगड्या स्पर्धकांचा सहभाग असलेल्या या 'ओपन' स्पर्धेत तिने नऊ फेऱ्यांत पाच गुण मिळविले व तिला केवळ एकाच पराभवाचा सामना करावा लागला. तिने शर्वानिकाला जगातील बुद्धिबळातील सर्वात आश्वासक प्रतिभावान खेळाडूंपैकी एक म्हणून प्रस्थापित केले आहे. २०२५ मध्ये, तिने ११ फेऱ्यांत नऊ गुण मिळवून 'जागतिक १० वर्षांखालील मुलींच्या गटाचे क्लासिकल' विजेतेपद पटकावले होते. या वर्षाच्या सुरुवातीला सर्बियामध्ये तिने 'जागतिक १२ वर्षांखालील मुलींच्या गटाचे रॅपिड बुद्धिबळ' विजेतेपद जिंकताना अपराजित राहण्याची कामगिरी केली. ◂ (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंदला 'जीसीटी सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ'चे विजेतेपद

**सेंट लुईस, ७ ऑगस्ट**

भारताच्या २० वर्षीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने 'जीसीटी सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ' बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.



पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत प्रज्ञानंदने सुरुवातीपासूनच आघाडी कायम राखली होती. उझबेकिस्तानच्या ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव्हने त्याला जोरदार टक्कर दिली, परंतु तो प्रज्ञानंदपेक्षा १.५ गुणांनी मागे राहिला. प्रज्ञानंदने एक फेरी शिल्लक असतानाच आपले विजेतेपद निश्चित केले. सिंदारोव्ह या स्पर्धेत दुसऱ्या स्थानावर राहिला. जेव्हा तुम्ही गुणफलक पाहता... तेव्हा सर्व काही सहज वाटू शकते, पण प्रत्यक्षात तसे नव्हते. परिस्थिती खूपच आव्हानात्मक होती. जावोखिरचे कौतुक करायला हवे, त्याने शेवटपर्यंत झुंज दिली, असे प्रज्ञानंदने अंतिम फेरीनंतर सांगितले. हे विजेतेपद जिंकल्यामुळे प्रज्ञानंदला ५० हजार डॉलर्सचे बक्षीस व १३ जीसीटी गुण मिळाले. या कामगिरीमुळे २०२६ च्या हंगामातील गुणतालिकेत तो अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनानंतर दुसऱ्या स्थानावर पोहोचला.दरम्यान, मी सर्वोत्तम प्रयत्न केले, पण प्रज्ञानंद खूप चांगला खेळला. कधीकधी केवळ चांगला खेळ पुरेसा नसतो; नशिबाचीही साथ लागते, अशा शब्दांत सिंदारोव्हने खंत व्यक्त केली. जीसीटी हंगामाची सांगता 'सिंकफील्ड चषका'ने होईल. ही स्पर्धा १० ऑगस्टपासून सुरू होणार असून, यात प्रज्ञानंदसह सेंट लुईस स्पर्धेतील बहुतांश खेळाडू सहभागी होणार आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## सबालेन्का, पेगुला उप-उपांत्यपूर्व फेरीत

**टोरोंटो :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या बेलारूसच्या आर्यना सबालेंकाने शुआई झांगचा ६-३, ६-४ असा सरळ सेटमध्ये पराभव करून कॅनेडियन टोरंटो मास्टर्स ओपन टेनिस स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सबालेंकाचा पुढील सामना रशियाच्या १६ व्या मानांकित एकातेरिना अलेक्झांड्रोव्हा हिच्याशी होईल. अलेक्झांड्रोव्हाने ऑस्ट्रेलियाच्या तालिया गिब्सनचा ५-७, ६-१, ६-३ असा पराभव केला होता. जेसिका पेगुलाने उझबेकिस्तानच्या कामिला राखिमोव्हाचा ६८ मिनिटांत ६-४, ६-० असा पराभव केला. ■

# अशफाक विक्रमासह ४०० मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीत

## जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स

**युजीन, ७ ऑगस्ट**

भारताच्या मोहम्मद अशफाकने 'जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या ४०० मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरताना राष्ट्रीय विक्रम मोडला.

१९ वर्षीय अशफाकने 'हीट ५' मध्ये ४५.८१ सेकंदांची वेळ नोंदवून दुसरे स्थान मिळविले आणि उपांत्य फेरीसाठी पात्रता निश्चित केली. या कामगिरीसह त्याने एप्रिलमध्ये बेंगळुरू येथे झालेल्या २० वर्षांखालील फेडरेशन चषकामध्ये स्वतःच प्रस्थापित केलेला ४६.०५ सेकंदांचा विक्रम मोडीत काढला. उपांत्य फेरीच्या 'हीट ३' मध्ये अशफाकने ४६.०० सेकंदांची वेळ नोंदवून तिसरे स्थान पटकावले आणि अंतिम फेरी गाठली.



त्याचा सहकारी पियुष राज याने 'हीट ६' मध्ये ४७.७८ सेकंदांची वेळ नोंदवून पाचवे स्थान मिळविले, मात्र त्याला अंतिम फेरीत प्रवेश करता आला नाही.

### बसंत उंच उडीच्या अंतिम फेरीत

पुरुषांच्या उंच उडी प्रकारात, बसंतने २.१४ मीटरची उडी मारून अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली; पात्रता फेरीच्या 'गट अ' मध्ये तो पाचव्या स्थानावर राहिला.

के. अंब्रिशने २.०५ मीटरची सर्वोत्तम उडी मारली, परंतु पात्रता फेरीच्या 'गट ब' मध्ये १२ व्या स्थानावर राहिल्यामुळे तो पात्र ठरू शकला नाही. विशेष म्हणजे, दोन्ही गटांतील एकाही खेळाडूला २.२१ मीटरचे थेट पात्रतेसाठी आवश्यक अंतर गाठता आले नाही.

### अमानत कंबोजला सहावे स्थान

दुसरीकडे, महिलांच्या थाळीफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत अमानत कंबोजने ५३.२४ मीटर अशी आपली वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदवित सहावे स्थान मिळवले. महिलांच्या गोळाफेक प्रकारात, अंशूला अंतिम फेरीत स्थान मिळविता आले नाही. तिने १५.२४ मीटरचा सर्वोत्तम थ्रो नोंदविला; अंतिम फेरीच्या पात्रतेसाठी आवश्यक अंतरापेक्षा ती २१ सेंटीमीटरने मागे राहिली. ती 'गट अ' मध्ये नवव्या आणि पात्रता फेरीत एकूण १४ व्या स्थानावर राहिली. महिलांच्या ४०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या 'हीट्स'मध्ये भारताच्या तानू चौधरीला निराशाजनक कामगिरीचा सामना करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

# जंगी स्वागतामुळे अरुंधती भावुक

**कोटा, ७ ऑगस्ट**

ग्लासगोमधील स्पर्धेत दमदार कामगिरी केल्यानंतर आपल्या 'कोटा' या शहरात जेव्हा अरुंधती चौधरीचे (७० किलो वजनी गट) जंगी स्वागत झाले, तेव्हा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ही बॉक्सर भावुक झाली.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील अंतिम फेरीत अरुंधतीने जागतिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेती चँटेल रीड हिच्यावर शानदार विजय मिळविला. तसेच, उपांत्य फेरीत तिने गतविजेती रोजी एक्लेस हिचा पराभव केला. जयपूर ते कोटा असा २५० किमीचा प्रवास करून आल्यामुळे अरुंधती थकलेली असली तरी ती खूप भावूक झाली होती; मायदेशी पोहोचल्यावर तिने आपले पदक आई सुनीता यांना अर्पण केले.



मला आधी वाटायचे की खेळांसाठी असे उत्साही आणि प्रोत्साहन देणारे वातावरण केवळ हरयाणामध्येच असते, पण आता तसे नाही; राजस्थानमध्येही असे वातावरण आहे. राजस्थानमध्ये जनता आणि सरकार अशा दोघांकडूनही मला मिळालेले हे स्वागत पहिल्यांदाच घडले आहे, असे अरुंधती म्हणाली.

यावेळी माध्यमांशी बोलताना अरुंधती व तिचे वडील सुरेश चौधरी यांनी शारीरिक, आर्थिक आणि सामाजिक आव्हानांनी भरलेल्या प्रवासाची माहिती दिली. सुरेश चौधरी हे कोटा मुष्टियुद्ध संघटनेचे अध्यक्षही आहेत.

स्पर्धेदरम्यान वजन कमी करणे हे एक सततचे आव्हान होते, असे तिने नमूद केले. आगामी ऑलिम्पिक स्पर्धेत स्थान मिळवणे ही तिची सध्याची प्राथमिकता आहे. लॉस एंजेलिसमधील स्पर्धेसाठी दोन वर्षांपेक्षा कमी कालावधी उरला असताना, माझे मुख्य उद्दिष्ट पुढील एप्रिलमध्ये होणाऱ्या जागतिक स्पर्धेत पात्रतेचे स्थान मिळविणे हे आहे, असे , असे ती म्हणाली.

बॉक्सिंगसाठी योग्य रिंग व व्यावसायिक प्रशिक्षकाची गरज असते, पण सुरुवातीच्या काळात अरुंधतीकडे या दोन्ही गोष्टींचा अभाव होता, असे सुरेश यांनी सांगितले. कोटा स्टेडियममधील डांबरी पृष्ठभागावर तिने अशा प्रशिक्षकाकडे सराव केला ज्यांची सुरुवातीला बॉक्सिंगची कोणतीही पृष्ठभूमी नव्हती. तिला प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी स्वतःच यूट्यूब व्हिडीओंच्या माध्यमातून तंत्रे आत्मसात केली होती, असे त्यांनी नमूद केले.

आमच्या समाजात स्त्रियांची भूमिका ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत पारंपरिक राहिली आहे आणि त्या क्वचितच एकट्या बाहेर पडत असत. जेव्हा अरुंधतीने वयाच्या १५-१६ व्या वर्षी सरावासाठी पहिल्यांदा 'स्पोर्ट्स शॉर्ट्स' (खेळांचे छोटे कपडे) परिधान केले, तेव्हा कोटा आणि बुंदीमधील नातेवाईक व स्थानिकांकडून त्याला तीव्र विरोध झाला, अशी आठवण त्यांनी सांगितली. माझ्या मुलीचे केस लहान कापायला आणि तिला शॉर्ट्स घालून सराव करू देण्याला लोकांनी 'मूर्खपणा' ठरवून माझ्यावर टीका केली. मला त्या सामाजिक दृष्टिकोनांशी सतत लढा द्यावा लागला, असे त्यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### विवाहितेचा विनयभंग, मारहाण; मंगळवेढा पोलिसांत तिघांवर गुन्हा

**मंगळवेढा, दि.७ ऑगस्ट -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका ४० वर्षीय विवाहित महिलेस मला खूप आवडतेस म्हणून तिला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी करण मस्के,अजय मस्के, लता मस्के या तिघांविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी ही ४० वर्षीय विवाहिता असून दि.६ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता तिच्या घरासमोर आरोपी करण मस्के याने येवून फिर्यादी शौचालयास जात असताना तुझा नवरा आजारी आहे, मला तू खूप आवडतेस. माझ्या सोबत चल असे म्हणून पिडीतेच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले. प्रतिकार करत असताना वरील आरोपींनी फिर्यादीस लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत तेथे पडलेला दगड घेवून फिर्यादीच्या डोक्यावर मारुन गंभीर जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार शिंदे हे करीत आहेत.

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

परदेशी घेऊन जातो म्हणून लग्न करून, लग्नातील दागिने परस्पर विकून एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश बाळु सुरवसे - पती, रा.मनामा- देश बहरीन, सासू - संगिता बाळु सुरवसे, सासरे- बाळु सुरवसे, (रा. आंबे चिंचोली,ता. पंढरपुर), रेश्मा संतोष चौधरी, संतोष चौधरी( रा. मु.पो. दहिटणे) आणि वृषाली अविनाश सुरवसे( रा. हडपसर, पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत जयमाला दयानंद सोनवणे ( जयमाला गणेश सुरवसे ) वय- २९, रा. घर नं. ए २०३, हुडको कॉलनी, कुमठा नाका, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि. १२ फेब्रुवारी २०२३ ते दि.७ डिसेंबर २०२५ दरम्यान पंढरपूर येथे सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन फिर्यादीस लग्नानंतर परदेशात बहरीन येथे स्थायिक होण्याचे स्वप्न दाखवून मानसिक, शारिरिक अत्याचार केला. आई वडिलांनी लग्नात दिलेले दागिने फिर्यादीने सासु, सासऱ्यांजवळ दिले असता त्यांनी ते दागिने फिर्यादीचे संमतीशिवाय विक्री केले व दहा लाख रुपयांची मागणी करुन फिर्यादीस मारहाण, शिवीगाळ करुन घरातुन हाकलून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार इनामदार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### बार्शीत विनापरवाना डीजेवर कारवाई; एकावर गुन्हा

**बार्शी, दि. ७ ऑगस्ट -**

बार्शी शहरातील सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना ध्वनीक्षेपकाचा वापर करुन मोठ्या आवाजात डीजे वाजविणे तसेच असभ्य हावभाव करत नृत्य करण्याच्या प्रकाराविरोधात बार्शी शहर पोलिसांनी कारवाई केली. एकावर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी पोकॉ. कादर तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन डीजे ऑपरेटर आकाश नागनाथ मस्के (रा. नवीन रेल्वे स्टेशन रोड, बार्शी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ६ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ९ वाजता बार्शी शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी शहरात गस्त घालत असताना सोमवार पेठेतील तीन कंदील चौक येथे विनापरवाना ध्वनीक्षेपक सुरु होता. पाचपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र जमून डीजेवर गाणी लावत असभ्य हावभाव करत नृत्य करत होते. याबाबत डीजे ऑपरेटर आकाश मस्के याच्याकडे ध्वनीक्षेपक वापरण्याची सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी आहे का, याची चौकशी केली असता त्याने परवाना घेतला नसल्याचे पोलिसांना सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी ३ ऑगस्ट रोजी आदेश जारी करुन ५ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट या कालावधीत कलम ३७(१)(३) अन्वये आदेश लागू केला आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

#### बेशिस्तांवर कारवाई करणार

बार्शी शहरातील सार्वजनिक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्याच्या नावाखाली रस्त्यावर दुचाकी आडव्या लावणे, दुचाकीवर केक कापणे, फटाके उडविणे तसेच सार्वजनिक शांतता व वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारचे गैरकृत्य आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करुन गुन्हे दाखल करण्यात येतील.

**- पोलीस निरीक्षक गणेश कुंभार.**

### सोलापुरात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन

**टेंभुर्णी, दि. ७ ऑगस्ट -**

संयुक्त राष्ट्र संघाच्या संकल्पनेतून दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक अ0ादिवासी दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सोलापूर येथील एमआयटी कॉलेजजवळील धनश्री फंक्शन हॉल येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटना व ट्रायबल आथारी फाउंडेशन यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, इतिहास आणि सामाजिक योगदान यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि सर्वांगीण विकास या विषयांवर जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून समाजहिताच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. आदिवासी बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटनेचे संस्थापक सुरेश पवार, ट्रायबल आथारी फाउंडेशनचे संस्थापक विश्वनाथ धुमाळे यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### विजय चोप्रा



**बार्शी, दि. ७ ऑगस्ट -**

बार्शीतील हॉटेल पंजाबचे मालक विजय श्रीराम चोप्रा यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पहिल्या यादीत ७ हजार ६९४ शेतकरी

## शेतकरी कर्जमाफीची जिल्ह्यातील पहिली यादी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्या यादीत ७ हजार ६९४ शेतकऱ्यांची नावे आहेत.

0१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या अल्पमुदत पीककर्जासाठी ही योजना लागू केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकबाकी असलेली आणि ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली पीककर्ज खाती मुद्दल व व्याजासह २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती मिळणार आहे. तर कर्ज रक्कम २ लाखांपेक्षा अधिक असल्यास शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२७ पर्यंत उर्वरित रक्कम भरल्यास शासनाकडून २ लाख रुपयांचा लाभ मिळणार आहे.

#### आधार प्रमाणीकरणाची गती वाढविण्यासाठी विशेष मोहीम

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वृत्तपत्रांद्वारे आवाहन, फ्लेक्स बोर्डद्वारे माहिती प्रसार आणि सोलापूर वाहिनीवर चित्रफीत प्रसिद्ध केली आहे. जिल्हा बँक व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये समन्वयासाठी एकूण ८२ समन्वयक अधिकारी नियुक्त केले आहेत. प्रशासनाने आधार प्रमाणीकरणाची गती वाढविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून, पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

#### आधार प्रमाणीकरणाची स्थिती (दि. ६ ऑगस्ट अखेर)

- **अपलोड केलेली खाती: ५९ हजार ८५१**
- **आधार प्रमाणीकरण पूर्ण: १९ हजार २५७**
- **प्रलंबित खाती: ६ हजार ६९०**
- **एकूण प्रमाणीकरण टक्केवारी: ७३.३५ टक्के**

२०२२-२३, २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षे वेळेत कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर



लाभ मिळणार आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील आकडेवारी** : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील ९२६ संस्था व ७ हजार ५६७ सभासद तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया, माळीनगर शाखेतील ९८ शेतकरी असे एकूण ७ हजार ६९४ शेतकरी लाभार्थी म्हणून पात्र ठरले आहेत. २४ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील ११ तालुक्यातील १ हजार ७८ गावांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. सदर यादी संबंधित ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय व बँक शाखांमध्ये प्रसिद्ध केली आहे.

#### ८५५ शेतकरी मयत

प्रमाणीकरण प्रलंबित राहण्याची प्रमुख कारणे म्हणजे ॲग्रीस्टक क्रमांक नसणे ३ हजार ८५६, शेतकरी मयत ८५५, देवस्थान भोगवटादार वर्ग २,३ खंडकरी शेतकरी इत्यादी ४९, स्थलांतरित ८६१ बायोमॅट्रिक कॅप्चर न होणे १३८, जमीन नावावर नसणे १३५ व इतर कारणे ८१ आहेत.

# रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांना दणका

## बार्शीत मोठी कारवाई; १९ हजार ३०० किलो धान्य जप्त

### ३१ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ७ ऑगस्ट -**

सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत गोरगरीबांना वितरित करण्यात येणाऱ्या धान्याचा काळा बाजार करणाऱ्यांना मोठा दणका बसला आहे. बार्शी तालुका पोलिसांनी महसूल व पुरवठा विभागाच्या संयुक्त पथकासह फपाळवाडी शिवारात मोठी कारवाई केली. कारवाईत १९ हजार ३०० किलो धान्य जप्त केले आहे. तब्बल ३१ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेत चौघांवर गुन्हा नोंदवला आहे.

१० हजार ६५० किलो गहू, ८ हजार ४५० किलो तांदूळ आणि २०० किलो उडीद, तसेच एक ट्रक व एक पिकअप असा एकूण ३१ लाख १५ हजार ९८१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास तहसीलदार एफ.आर. शेख तसेच बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अक्षय सोनवणे यांना याबाबत माहिती मिळाली होती. माहितीनूसार फपाळवाडी (ता. बार्शी) गावच्या शिवारात रेल्वे स्टेशनसमोर,



अरणगावकडे जाणाऱ्या रस्त्यालगत मंगडे यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीतील रेशनच्या धान्याचा साठा केला होता. हा माल ट्रक व पिकअप वाहनामध्ये भरुन विक्रीसाठी नेण्याची तयारी सुरु होती. मात्र पोलीस व पुरवठा विभागाच्या पथकाने संबंधित ठिकाणी धाड टाकली.

सायंकाळी सुमारे ७.२० वाजता पथक घटनास्थळी पोहोचले असता पत्राशेडसमोर टाटा ट्रक क्र. एमएच ११ एम ६४९२ आणि महिंद्रा पिकअप क्र. एमएच १० ए क्यू ८११२ उभे होते. या वाहनांमध्ये पत्राशेडमधून गहू व तांदळाची पोती भरली जात होती. यावेळी धनाजी अर्जुन मांगडे, गजेंद्र अरुण मांगडे, ट्रक चालक चांगदेव पिराजी दळवी व क्लिनर गणेश श्रीहरी कदम हे तेथे होते. पंचांच्या उपस्थितीत वाहनांची व पत्राशेडची पाहणी केली असता ट्रकमध्ये १९५ पोती गहू, पिकअपमध्ये १५ पोती गहू व ४९ पोती तांदूळ आढळले. पत्राशेडमध्ये १२० पोती तांदूळ, ३ पोती गहू, खराब गव्हाची ३ पोती व ४ पोती खराब उडीद आढळून आला. तसेच मध्य प्रदेश स्टेट सिव्हिल सप्लाईज कार्पोरेशन लि.' असे छापलेले पोते आणि दोन खाकी रंगाची पोतीही आढळली.

सदर धान्याबाबत संबंधितांकडे पावत्या, परवाने अथवा अन्य कोणतीही कागदपत्रे नव्हती. तसेच धनाजी मांगडे यांनी पत्राशेड व शेतजमीन आपली असल्याचे सांगितले. पंचनामा करुन सर्व वर नमूद धान्यसाठा, ट्रक व पिकअप असा मुद्देमाल जप्त केला. जप्त धान्याची एकूण किंमत ७ लाख १५ हजार ९८१ रुपये, तर दोन्ही वाहनांची अंदाजे किंमत अनुक्रमे १६ लाख व ८ लाख रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

या प्रकरणी पुरवठा निरीक्षक ज्ञानेश कुंटलवाड यांच्या फिर्यादीवरुन धनाजी अर्जुन मांगडे, गजेंद्र अरुण मांगडे, चांगदेव पिराजी दळवी आणि गणेश श्रीहरी कदम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. जप्त धान्य रेशनचे असल्याचा संशय असून, त्याचा नेमका स्रोत आणि तो कुठे विक्रीसाठी नेला जाणार होता, याबाबत पोलीस तपास करत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुहास जगताप, तहसीलदार एफ. आर.शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, गोविंद बचूटे तसेच पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपीस सशर्त जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ ऑगस्ट -**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप असलेल्या पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर) येथील गुन्ह्यातील आरोपी अतिश रमेश तवटे याला पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीविरुद्ध करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता.

संपूर्ण प्रकरण हे मयत तरुणीने दिलेल्या दोन जबाबावरच आधारित असून जबाब दिल्यानंतर अनेक दिवसांनी तरुणीचा मृत्यू झाल्याने त्या जबाबास कायद्याच्या भाषेत 'मृत्यूपूर्व जबाब' मानता येणार नाही. विष प्राशन केल्यानंतर दीड महिन्यांनी पिडीतेचा मृत्यू झाला. परिणामी चिथावणी आणि परिणाम' यात मोठे अंतर असल्याने आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप ग्राह्य धरता येत नाही असा युक्तिवाद बचाव पक्षाचे वकील ॲड. ज्ञानेश्वर मोरे यांनी केला. सरकारी पक्ष व मुळ फिर्यादींनी पुराव्याशी छेडछाड होण्याची शक्यता व्यक्त केली. युक्तिवादानंतर ओ. आर. देशमुख याच्या न्यायालयाने, 'तपास पूर्ण होवून दोषारोपपत्र दाखल केले आहे, त्यामुळे आरोपीची पुढील कोठडी आवश्यक नाही, असे नमूद केले.तसेच आरोपी अतिश तावटे याची एक लाख रुपयांच्या जामीनदारांच्या हमीवर नियमित जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले. आरोपीने कोणत्याही साक्षीदारावर दबाव टाकू नये, खटल्याच्या काम काजात अडथळा निर्माण करू नये आणि न्यायालयीन सुनावणीस नियमित हजर राहण्याची अटही घातली. आरोपीतर्फे ॲड. ज्ञानेश्वर मोरे, ॲड. शिवराज पाटील, ॲड. संतोष नाईकनवरे, ॲड. गणेश चव्हाण, ॲड. शुभांगी मोरे यांनी काम पाहिले.

# १३०९ किलो गांजासह ट्रक ताब्यात

## पुणे कस्टम्सची मोठी कारवाई; साडेसहा कोटींचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

पुणे कस्टम्सच्या नार्कोटिक्स सेलने मोठी कारवाई करत ओडिशाहून सोलापूरकडे तस्करी केला जाणारा तब्बल १३०९.0२ किलो गांजा जप्त केला आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून, जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे ६.५४ कोटी रुपये असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पुणे कस्टम्सच्या नार्कोटिक्स सेलच्या अधिकाऱ्यांनी ६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री पुणे-सोलापूर महामार्गावर सापळा रचला होता. यावेळी एमएच १६डीके ५५५६ क्रमांकाचा एक महिंद्रा ट्रक संशयास्पद स्थितीत आढळल्याने सोलापूरजवळ अडवण्यात आला. प्राथमिक तपासणीत गांजा प्लास्टिक क्रेट्सखाली लपवून ठेवल्याचे दिसून आले. सुरक्षिततेच्या कारणास्तव ट्रक, चालक आणि पंच साक्षीदारांना कस्टम्सच्या सोलापूर येथील सीएफआर कार्यालयात नेण्यात आले.

तेथे एनडीपीएस अधिनियम, १९८५ च्या तरतुदींनुसार वाहनाची कसून तपासणी केली असता, प्लास्टिक क्रेट्सखाली लपवलेल्या ४६ गोण्यांमधून गांजाची ६३६ पाकिटे सापडली.

नार्कोटिक ड्रग फील्ड टेस्टिंग किटद्वारे केलेल्या तपासणीत हा अमली पदार्थ गांजा असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत १३०९.0२ किलो गांजा आणि तस्करीसाठी वापरलेला महिंद्रा ट्रक जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी एका आरोपीला



अटक करण्यात आली असून, त्याला कोठडीत पाठवण्यात आले आहे. कस्टम्स विभाग या तस्करीमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेत असून पुढील तपास सुरू आहे. सीमा शुल्क आयुक्तालय, पुणेचे अपर आयुक्त शिवकुमार साळुंखे यांनी या कारवाईची माहिती दिली आहे.

# कृष्णाचा हौद परिसरातील भाजी मंडई ठरतेय त्रासदायक

## दुसऱ्या ठिकाणी हलवण्याची मागणी; पावसाळ्यात ग्राहकांची मोठी गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ७ ऑगस्ट -**

शहरातील कृष्णाचा हौद परिसरातील भाजीमंडईचे स्वरुप दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ही मंडई बाजारपेठेतील रहदारीच्या दृष्टीने महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रस्त्यांवरही भरत आहे. परिणामी या ग्राहक , विक्रेते तसेच या भागातील कायमस्वरुपी दुकानदारांचीही मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्यात तर येथील मंडईचे अक्षरश हाल,बेहाल होतात. परिणामी या मंडईचे स्थलांतर पालिकेने शहरातील अन्य ठिकाणी करावे अशी मागणी कायमस्वरुपी दुकानदारांकडून होत आहे.

पंढरपूर शहरात इंदिरा गांधी भाजी मंडई व कृष्णाच्या हौदापाशी भरणारी भाजी मंडई या नागरिकांच्या दृष्टीने सोयीच्या समजल्या जात होत्या. मात्र कृष्णाचा हौद परिसरातील मंडईचे दिवसेंदिवस स्वरुप बदलत चालले आहे. येथील मंडईचा परिसर हा शहरातील बाजारपेठेचा परिसर म्हणूनही ओळखला जात असतो. या मंडईत ग्रामीण भागातून आलेल्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मंडईसाठीची जागा सध्या



#### मंडईसाठी पर्यायी जागा

शहरातील जुन्या एसटी स्टँण्डसमोरील पार्किंगसाठी आरक्षिम जागा, भक्ती मार्गावरील खादी ग्रामोद्योगाची जागा, जिजामाता उद्यानाची पिछाडी, टिळक स्मारक मंदिराच्या मैदानाची जागा, चंद्रभागा बसस्थानकाबाजूची मोकळी जागा, महावीर नगर पाण्याच्या टाकी परिसरातील खुली जागा आदी ठिकाणी मंडईचे स्थलांतर करता येऊ शकेल का याचा पालिकेने विचार केला पाहिजे.

अपुरी पडू लागलेली आहे. त्यामुळे अगदी बोहरी पेट्रोलपंपापर्यंत भाजी विक्रेते बसू लागले आहेत. मंडईत कुठेही भाजी विक्रेत्यासाठी दगडी कट्टे बांधलेले नाहीत. त्यामुळे रस्त्यावरच बसून भाजी विक्री करावी लागत आहे. परिणामी रस्त्यावरील धुळ अक्षरशः भाजीवर बसत असते. पावसाळ्यात चिखलात बसून भाजी विक्री करावी लागते. कायमस्वरुपी दुकान असलेल्यांनाही अडचण होते. व्यापारी आणि भाजीविक्रेते यांच्यात दररोज भांडणे होतात.

ग्रामीण भागातून आम्ही दररोज ताजी भाजी घेऊन येथे येतो. पालिका आम च्याकडून रस्त्यावर बसण्यासाठीची पावती फाडून फी वसुल करते. मात्र त्या मानाने सुविधा नसतात. नाईलाजाने आम्हाला रस्त्यावर बसूनच भाजी विक्री करावी लागते.

**- भीमा गावंधरे, भाजी विक्रेता.**

मंडई भागात आमची कायमस्वरुपी दुकाने आहेत. आमच्या दुकानासमोरच ग्रामीण भागातून आलेले शेतकरी भाजी घेऊन बसतात. त्यामुळे त्यांच्यात व आमच्यात दररोज वाद होतात. पालिकेने मंडईसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी.

**-नितीन गांधी, कायमस्वरुपी दुकानदार.**

ग्रामीण भागातून ताजी भाजी येत असल्यामुळे आम्ही भाजी खरेदीसाठी येथे येतो. मात्र रस्त्यावरच भाजी विक्रेते बसत असल्यामुळे या भागात वारंवार वाहतूकीची कोंडी होते. वाहन पार्किंगसाठी येथे खास जागा देखील नाही. पावसाळ्यात चिखलातूनच मार्ग काढावा लागतो. महिलांना खूपच अडचणीचे होते.

**- मालती माने, ग्राहक.**

**सण, उत्सवाला मोठी गर्दी, चोरट्यांची चंगळ**

बाजारपेठेचा भाग असल्यामुळे वर्षभरातील महत्वाच्या सण आणि उत्सवादिवशी तर भाजी मंडइत खरेदीदार तसेच विक्रेत्यांची तोबा गर्दी असते. गर्दीचा फायदा घेत चोरट्यांकडून ग्राहकांचे मोबाईल, पैसे, पाकिट चोरीच्या घटना घडतात.

**वाहतूकीची कोंडी**

कृष्णाचा हौद परिसर हा संपुर्ण मुख्य बाजारपेठेचा महत्वाचा परिसर आहे. भाजी विक्रेते, फळविक्रेत्यांचे हातगाडे रस्त्यावरच ठाण मांडून उभे असतात.


परिणामी दररोज या ठिकाणच्या शिवाजी महाराज चौक ते अर्बन बँक, अर्बन बँक ते कर्नल भोसले चौक, भादुले चौक ते बोहरी पेट्रोलपंप, प्रिन्स गांधी दुकानासमोरील रस्ता अशा वाहतूकीच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांवर वाहतूकीची कोंडी सातत्याने होते.




दादांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटी चे रिजनल मॅनेजर सुदत्त पाठक सुभाष मोरे सुभाष भडगावकर आनंद देशपांडे.



















सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


# सोलापूरच्या 'हातमाग साडी' चा पारंपरिक वस्त्रोद्योगात समावेश

- मुख्यमंत्री फडणवीस, वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांच्या सूचना
- आमदार देवेंद्र कोठे यांचा पाठपुराव्याला आले यश
- हातमाग दिनी विणकर बांधवांच्या दृष्टीने गुड न्युज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

सोलापूरच्या हातमाग साडीला पारंपरिक वस्त्रोद्योगात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी प्रशासनाला दिल्या. याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी पाठपुरावा केला होता. दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय हातमाग दिन' म्हणून साजरा केला जातो. यादिवशी जाहीर करण्यात आलेला निर्णय विणकर बांधवांच्या दृष्टीने गुड न्यूज मानला जात आहे

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये पारंपारिक वस्त्रोद्योग म्हणून पैठणी साडी, हिमरु, करवतकाठी, विदर्भ घोंगडी, पश्चिम महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील खण फॅब्रिक या वस्त्रोद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. परंतु सोलापुरी सिल्क साडी या उत्कृष्ट पारंपारिक वारशाला शासनाच्या अधिकृत पारंपारिक वस्त्रोद्योग यादीत हक्काचे स्थान मिळालेले नव्हते.

दरम्यान, एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सोलापूर सिल्क साडीचा पारंपारिक वस्त्रोद्योग म्हणून समावेश करुन हातमाग कामगारांना सवलती व आर्थिक सहाय्य मिळावे, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्याकडे ३० जुलै रोजी पावसाळी अधिवेशनादरम्यान केली होती. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला.

### विकसित महाराष्ट्रात सोलापूरचे अधिक योगदान



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला दिलेल्या विकसित भारत २०४७ या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र २०४७ हे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल सुरु ठेवली आहे. याचाच एक भाग म्हणून सोलापूरच्या हातमाग साडीला पारंपरिक वस्त्रोद्योगात समावेश करण्याचा निर्णय मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला आहे. यामुळे विकसित महाराष्ट्रात सोलापूरचे योगदान अधिक ठळकपणे देणे शक्य होणार आहे, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.



### जटिल व सूक्ष्म कलाकृती

सोलापूर शहर हे ऐतिहासिक काळापासून वस्त्रोद्योगासाठी देश-विदेशात प्रसिध्द आहे. याठिकाणी हातमाग कामगार अर्थात विणकरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. साडी निर्मिती करताना जटिल व सूक्ष्म कलाकृतीचे, अंगावर ताण येणारे आणि उच्च कौशल्याचे काम करावे लागते. येथील हातमागधारकांकडून जगप्रसिध्द सोलापूर सिल्क साडी अत्यंत परिश्रमाने तयार केली जाते.

# शहर हद्दीतील ५० जि. प. शाळांचे भवितव्य शासनाच्या निर्णयावर अवलंबून

## प्राथमिक शिक्षण विभागाने मागितले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट -**

सोलापूर शहर हद्दीतील जिल्हा परिषदेच्या ५० हून अधिक प्राथमिक शाळा महापालिकेकडे वर्ग करण्याच्या प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट अद्यापही कायम आहे. महापालिका आयुक्तांनी शहरातील शाळांच्या वर्गीकरणासंदर्भात निर्णय घेतला असला, तरी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने या विषयावर राज्य शासनाकडे मार्गदर्शन मागविल्याने अंतिम निर्णय आता शासनाच्या आदेशावर अवलंबून राहिला आहे.

शहर हद्दीतील प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांचा यू-डायस महापालिकेशी जोडण्यात आला आहे. मात्र, केवळ यू-डायस जोडल्यामुळे शाळांचे प्रशासकीय नियंत्रण बदलत नसल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत तपासणी, शिक्षकांचे वेतन, प्रशासकीय कामकाज, इतर अधिकार प्राथमिक शिक्षण विभागाकडेच राहणार आहेत.



विशेष म्हणजे, राज्यातील बहुतांश महापालिका क्षेत्रांमध्येही जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांचे प्रशासकीय नियंत्रण अद्याप प्राथमिक शिक्षण विभागाकडेच आहे. त्यामुळे सोलापूरमधील प्रस्तावाबाबत शासन कोणती भूमिका घेते? याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### अतिक्रमणाचा धोका; संरक्षक भिंती बांधणार

शहरातील अनेक जिल्हा परिषद शाळा मोक्याच्या ठिकाणी असल्याने त्यांच्या जागांवर अतिक्रमण होण्याचा धोका वाढत आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन सर्व शाळांना संरक्षक भिंती उभारण्याचा निर्णय जिल्हा परिषद प्रशासनाने घेतला आहे. शाळांच्या जागांचे संरक्षण आणि भविष्यातील विकासाला प्राधान्य दिले जाणार आहे, असे जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी सांगितले.

### शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त झाल्यानंतरच...

प्राथमिक शिक्षण विभागाने दि.१३ जुलै २०२६ रोजी शासनाकडे अधिकृत मार्गदर्शन मागवले असून, शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त झाल्यानंतरच पुढील प्रशासकीय कार्यवाही केली जाणार आहे, असे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.



## खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांना सोलापुरी चादर भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

राष्ट्रीय हातमाग दिनाचे औचित्य साधून खा.प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान निवासस्थानी भेट घेऊन सोलापूरचे वैभव मानली जाणारी आणि पंतप्रधान मोदींची प्रतिमा विणलेली विशेष 'सोलापुरी चादर' भेट दिली. एनडीएच्या नवनिर्वाचित राज्यसभा आणि लोकसभा खासदारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयोजित केलेल्या अल्पोपाहार कार्यक्रमात ही भेट सुपूर्द केली. यावेळी डॉ.वाघमारे यांनी आपला खडतर प्रवास पंतप्रधानांसमोर मांडला. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतून मार्ग काढत इंग्रजी विषयात 'पीएच.डी.' पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर शहरात त्या ज्या भागात राहतात, त्या परिसराचे नावही 'मोदी' आहे, हा रंजक योग त्यांनी आवर्जून पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून दिला.डॉ.ज्योती वाघमारे यांच्या संघर्षाचे कौतुक करत पंतप्रधान मोदींनी शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्याप्रति सद्भावना व्यक्त केल्या. यावेळी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन उपस्थित होते.

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतिम टप्प्यात; १७ ऑगस्टपर्यंत नोंदणी प्रक्रिया

### आजतागायत ९७.९० टक्के काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील ३९ लाख ४१ हजार ०९५ मतदारांसाठी ३ हजार ७२३ बीएलओ मार्फत हा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतिम टप्प्यात आले आहे. आजतागायत ९७.९० टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दिली

आजतागायत ३२ लाख ९९ हजार २५२ जणांची ऑनलाईन पोर्टलवर मतदार नोंदणी झाली आहे. यामध्ये ५ लाख ५९ हजार १२४ लोकांचे स्थलांतर, लग्न होवून जाणे, मयत असणे आदीप्रकारे नावे कमी होणार आहे. दि.१७ ऑगस्ट २०२६ पर्यंत नोंदणी प्रक्रिया चालणार आहे. दि.२४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून दि.२३ सप्टेंबर २०२६ पर्यंत नागरिकांना हरकती किंवा दावे नोंदविता येणार आहे.

या कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी, सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया २२ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर सर्व आवश्यक दुरुस्त्या करून २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाणार आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज करताना चुकीची माहिती किंवा खोटी घोषणा केल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### सांगोला, माळशिरस तालुक्यात १०० टक्के काम पूर्ण

सांगोला आणि माळशिरस तालुक्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे फॉर्म १०० टक्के वाटप झाले असून, ते फॉर्मही ऑनलाईन भरून घेतले आहेत. इतर तालुक्यात पुढीलप्रमाणे काम झाले आहे. यामध्ये करमाळा ९८.५७ टक्के, माढा ९८.५६, बार्शी ९७.०३, मोहोळ ९७.२६, उत्तर सोलापूर ९८.९०, सोलापूर मध्य ९७.४९, अक्कलकोट ९७.८७, सोलापूर दक्षिण ९७.१६, पंढरपूर ९४.४५ असे जिल्ह्यात सरासरी ९७.९० टक्के काम पूर्ण झाले असल्याचे सांगण्यात आले.



### सोलापूर राज्यातील पाचवा जिल्हा

सोलापूर जिल्हा हा राज्यात सर्वात जास्त मतदारसंख्या असलेल्या जिल्ह्यात पाचवा जिल्हा आहे. एकूण ११ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३९ लाख ४१ हजार ०९५ मतदार आहेत. दरम्यान, ज्यांचे नाव अद्याप मतदार यादीत नाही किंवा नाव, पत्ता अथवा इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती करायची आहे, त्यांनी या मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# सिध्देश्वर मंदिराजवळ पार्क केलेल्या चारचाकीतील चार लाख रुपये चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिराजवळ पार्क केलेल्या एका चारचाकीची काच फोडून चार लाख रुपये चोरीस गेल्याची घटना दि.२८ जुलै २०२६ रोजी घडली. याप्रकरणी आठ दिवसानंतर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबतचे वृत्त असे की, सचिन धनसिंग पवार (वय-२७, रा.थोरवी, ता.तिकोटी, जि.विजापूर, कर्नाटक) हे एका कामानिमित्त दि.२८ जुलै २०२६ रोजी के.ए.२८ झेड ९७०६ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनद्वारे सोलापुरात आले होते.

यादिवशी सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वरांचे दर्शन घेण्यासाठी ते मंदिरात आले होते. मंदिर परिसरात त्यांनी आपले चारचाकी वाहन वाहन पार्क करुन दर्शनासाठी गेले असता चोरट्याने काच फोडून सीटवरील ४ लाख रुपये रोख, बॅग व एसबीआय बँकेचे एटीएम चोरुन नेले, असे फिर्यादीत नमूद आहे.

## कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांना 'मानद कर्नल' पदवी; सोमवारी प्रदान



**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांना 'मानद कर्नल' (Honorary Rank of Colonel) हा प्रतिष्ठित किताब जाहीर करण्यात आला.उच्च शिक्षणातील त्यांचे नेतृत्व, समर्पण आणि एनसीसीच्या माध्यमातून युवकांमध्ये देशभक्ती व शिस्त रुजवण्याच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सन्मान जाहीर झाला. सोमवार, दि.१० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाच्या नवीन इमारतीमधील अहिल्याभवन सभागृह येथे एनसीसी ग्रुप पुणेचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर एस.पी.एस. रौतेला यांच्या हस्ते कुलगुरु महानवर यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावेत, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी केले आहे.

श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित
**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**
रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर
**Programmes Accredited by NBA, New Delhi.**
**डिप्लोमा इंजिनिअरींग प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश २०२६-२७**

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था स्तरावरील रिक्त जागांसाठी व केंद्रभूत फेरीच्या शिल्लक प्रवेशकरीता विद्यार्थिनींनी कॉलेजमध्ये प्रत्यक्ष येवून प्रवेश अर्ज जमा करावे.

**कन्नड भाषिक अल्पसंख्यांकासाठी ५१% जागा राखीव**

| Courses | |
|---|---|
| Artifical Intelligence & Machine learning (Women) | |
| Civil Engineering (Women) | Information Technology (Women) |
| Computer Engineering (Women) | Electrical Engineering (Women) |
| Electronics & Tele. Engg (Women) | |

सर्व इच्छूक विद्यार्थिनींनी आवश्यक कागदपत्रे व प्रवेश शुल्कासह खालील तारखेपर्यंत कॉलेजमध्ये प्रवेश अर्ज जमा करावे. पात्रतेचे निकष व इतर माहितीसाठी कॉलेजच्या या संकेतस्थळाला भेट द्या.
प्रथम व थेट द्वितीय वर्षाकरीता प्रवेश अर्ज करण्याची अंतिम तारीख १०/०८/२०२६
कार्यालय स. १० ते सा.०६ वाजेपर्यंत खुले राहील.
- प्रवेशासाठी संपर्क -
प्रा. श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५ प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५२६

**मोहोराच्या संगें । सुख नव्हे आगीजोगें ।**

मानव हा निसर्गतः समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याला कोणाच्या ना कोणाच्यातरी सहवासात राहावे वाटत असते. चांगल्यांचा सहवास लाभावा म्हणून अनेकांची धडपड चालू असते. मुळात चांगला कोण याचा शोध लागणे अवघड आहे. केवळ राहणीमान, खाणे पिणे उच्च कोटीचे आहे व त्याच्याकडे सत्ता,पैसा आहे म्हणून तो चांगला आहे असे होत नाही. या सर्व दिखाऊ वस्तू मूळात नाशवंत असल्याने अशांना मोठे, चांगले म्हणण्यात अर्थ नाही. अशांचा सहवास सामान्यामध्ये चांगले परीवर्तन करेलच असे नाही. मात्र बाह्यदेखाव्यापेक्षा अंतर्गत वर्तन, विचार, भाव, वृत्ती चांगली असेल तर असा व्यक्ती खऱ्या अर्थाने चांगला असतो आणि अशा चांगल्या व्यक्तिचा सहवास दुर्जनामध्येही चांगुलपणाच्या निर्मितीला व चांगुलपणाच्या वाढीला खतपाणी घालू शकतो. कठिण काळात चांगल्याचे रक्षण त्याच्या चांगुलपणामुळे आपोआप होते. एवढेच नव्हे तर त्याच्या सहवासात राहणाऱ्या सामान्यांचेही सहज रक्षण होत असते. मोहोराच्या संगतीत असणारे सुत अग्नीचा संग लागला तरी जळत नाही. त्याप्रमाणे सज्जनाच्या संगतीने दुर्जनही संरक्षण पावू शकतो. या अनुषंगाने बोलताना तुकाराम महाराज म्हणतात,



**मोहोराच्या संगे । सुत नव्हे अग्नीजोगें ।**

इकडे-तिकडे पडलेला दगड जेव्हा मंदिराला किंवा मंदिराच्या पायरीला लागतो तेव्हा तो पवित्र होतो. या दगडावर पूर्वी पाय देणारे लोक आता याच दगडापुढे नतमस्तक होतात. हा त्या दगडाला लाभलेल्या मंदिराच्या सहवासाचा परिणाम होय. या दगडाप्रमाणे इकडे-तिकडे भटकणारे, चुकीच्या मार्गावर चालणारे, लोक जेव्हा संत, सज्जनाच्या सहवासात येतात, तेव्हा तेही सज्जनाप्रमाणे कांही प्रमाणात का होईना चांगुलपणास पात्र होतात. एखादा दूर्जन वाईट भावनेने जरी ज्ञानोबा-तुकोबाच्या दिंडीत गेला तरी इतर लोक त्याच्या पाया पडू लागतात. आपण पात्र नसतानाही लोक संताप्रमाणे आपल्यासमोर नतमस्तक होत आहेत, हे लक्षात येऊन तो स्वतःला लाजतो आणि कांही प्रमाणात का होईना सुधारतो. अर्थात कांही प्रमाणात का होईना अशा अपात्रमध्येही पात्रता येऊ लागते. आपल्या दुर्जनत्वाची आठवण होऊन त्याच्यात परिवर्तन होऊ लागते. मूळात कोणी वाईट नसतो. परिस्थितीमुळे किंवा प्रसंगामुळे माणूस चुकीच्या मार्गावर जातो. चुकीच्या मार्गावर जाणाऱ्याला सुधारावेच वाटत नाही, असे नाही. सुधारण्याची इच्छा असूनही मार्ग सापडत नसावा. सुदैवाने मार्ग सापडलाच तर चुकीच्या मार्गावर गेलेला व्यक्ति चांगल्यापेक्षाही चांगला होऊ शकतो. वाटमारी करणारे वाल्याकोळी महर्षी नारदांच्या सहवासाने महर्षि पदाला पोहोचले. राक्षस कुळात जन्मलेले बिभिषण प्रभू रामचंद्राच्या सहवासाने महात्मा झाले. समाजातही असे अनेक लोक आहेत की जे पूर्वाश्रमी अत्यंत वाईट वागत होते. पण पुढे चालून एखाद्या चांगल्या व्यक्तिच्या सहवासाने ते चांगल्यापेक्षाही चांगले बनले. संत श्री ज्ञानोबा-तुकोबांचा सहवास कळत न कळत आपल्या चांगुलपणात भर घालत असल्याचे आपल्या अनुभवाय येतच असेल.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

# सोलापूर जिल्हा परिषदेत ५०० शिक्षकांची भरती

## शिक्षण क्षेत्राला मिळणार नवी बळकटी : सभापती चेतनसिंह केदार-सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ५०० शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती प्रक्रिया 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, सदर भरतीची जाहिरात दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर व्हावी आणि प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व्हावी, यासाठी ही शिक्षक भरती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शिक्षण हा विकासाचा पाया आहे. जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे ही आमची प्राथमिकता असून, शिक्षकांची उपलब्धता वाढवून ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे, असे मत



सोलापूर जि.प.चे शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले.

या भरतीमुळे जिल्ह्यातील शाळांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळणार आहे. पात्र उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेली जाहिरात वाचून आवश्यक पात्रता व अटींची पूर्तता करून भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

**५०० शिक्षक भरतीचा महत्त्वपूर्ण निर्णय**

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ५०० शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू होत आहे. 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून ही भरती पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी भरतीची जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शाळांना आवश्यक शिक्षक उपलब्धता आणि शिक्षण व्यवस्थेला अधिक बळकटी देणे, हा या भरतीमागील प्रमुख उद्देश आहे.

**-चेतनसिंह केदार-सावंत,** सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जि.प.सोलापूर

## ज्या क्षेत्रात जाल, तेथे कर्तृत्वाने देशाचे नाव उज्ज्वल करा : कुलगुरू डॉ. महानवर

**यशवंत शैक्षणिक समितीतर्फे धनगर समाजातील गुणवंतांचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

केवळ परीक्षेत अधिक गुण मिळविणे म्हणजेच गुणवत्ता नव्हे. बदलत्या काळात विविध कौशल्ये, तंत्रज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकास आत्मसात करूनच विद्यार्थी यशाच्या शिखरावर पोहोचू शकतात. ज्या क्षेत्रात जाल, तेथे आपल्या कर्तृत्वाने देशाचे नाव उज्ज्वल करा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. महानवर यांनी केले.

यशवंत शैक्षणिक समितीच्या वतीने धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे होते.

यावेळी सोलापूर जिल्ह्यात



उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या ८० गुणवंत विद्यार्थ्यांचा म न्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शंभर टक्के गुण मिळवणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या सुनंदा बुधनेर आणि अक्कलकोटचे सामाजिक कार्यकर्ते अशोक कोरे यांचाही कुलगुरूंच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक व स्वागत यशवंत शैक्षणिक समितीचे अध्यक्ष प्रा. उत्तमराव हुंडेकर यांनी केले. शंकर कोळेकर यांनी मनोगत व्यक्त केले, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. ललिता पेठकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुनंदा बुधनेर व प्रा. शावरू जडगे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ. नागनाथ धायगोडे, ज्योती देवकाते, वैशाली सलगर आणि नागनाथ गावडे यांनी केले. शशिकांत पैकेकरी यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. सुरेश ढेरे, प्रा. डॉ. मेटकरी, प्रा. देवेंद्र मदने, प्रा. बेडगनूर, कमलाकर पुजारी, आप्पा सलगर, शशिकांत मोटे उपस्थित होते.

## पद्मशाली सखी संघम्‌च्या अध्यक्षपदी भाग्यलक्ष्मी तुम्मा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

पद्मशाली सखी संघम या सामाजिक संस्थेच्या २०२६-२७ या वर्षासाठी नूतन अध्यक्ष म्हणून भाग्यलक्ष्मी तुम्मा यांची तर इतरांची पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आले आहे.

यामध्ये उपाध्यक्षपदी पल्लवी संगा, आरती आडम, मंजुळा दुधगुंडी; सहकार्याध्यक्ष गीता भूदत, संगीता बोडा, कल्पना कैरमकोंडा; सहसचिव वनिता सुरम, उमा गज्जम, वंशिका जक्का; खजिनदार हेमा मैलारी; सहखजिनदार लावण्या मच्छा; समन्वयिका अंबुबाई पोतू, कविता साखरे; सल्लागार कला चन्नापट्टण, सविता येदूर; कार्यकारिणी सदस्य अंबिका म्याकल, रोहिणी संगा, रजनी जिल्ला, लता कुंदारम, प्रिती बोगा, वर्षा चिप्पा, सुनिता कोंकटी, सुरेखा आडम, लक्ष्मी गाजुल यांची निवड संस्थापक गीरीशंकर कोंडा यांनी केली. यासंगी फाउंडेशनचे सल्लागार दयानंद कोंडाबत्तीनी, सम न्वयक किशोर व्यंकटगिरी, सदस्य ओमसी पल्ली उपस्थित होते. पद्मशाली समाजातील महिलांना नवीन सदस्य होण्याची संधी ३१ ऑगस्ट पर्यंत देण्यात येत असून त्यांनी ९०२१५५१४३१ या व्हाटसअॅपवर नाव व पत्ता लिहून पाठवावेत.



भाग्यलक्ष्मी तुम्मा ममता मलकोकूल कल्पना कट्टा

## आंबेडकर चौकातील पान टपरीवर अन्न व औषध प्रशासनाची धाड

**सोलापूर -** अन्न व औषध प्रशासनाने आंबेडकर चौकातील एका पान टपरीवर धाड टाकून १९ हजार रुपये किमतीचा गुटखा, सुगंधी तंबाखू,पान मसाल्याचा साठा जप्त केला. दरम्यान या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजय सिध्दनाथ चव्हाण( वय-३२ वर्षे, रा-सलगवस्ती, सोन्या मारुती मंदिर जवळ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत उत्कर्षा मुकुंद एखंडे (नेमणूक - अन्न व औषध प्रशासन, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. दि.६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अन्न औषध प्रशासन विभागाच्या पथकाने आंबेडकर चौकातील वरील आरोपीच्या पान टपरीवर धाड टाकली. या पान टपरीत १९ हजारांचा साठा मिळवून आला. गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार बागल हे करीत आहेत.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. ८ ऑगस्ट २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - आषाढ कृ. नवमी
ऋतु - वर्षा ।
नक्षत्र- रोहिणी (१६.५१)
योग - ध्रुव (०९.०१)
करण - बव (२४.३३)
राहू काल : शुक्रवार
स. १०.३० ते १२.००
दिनविशेष :
१५०९: सम्राट कृष्णदेवराय यांचा राज्याभिषेक झाला आणि विजयनगर साम्राज्याची स्थापना झाली.
१६४८: छत्रपती शिवाजी महाराजांनी खळत-बेलसरच्या लढाईत फत्तेखानाच्या फौजेचा पराभव केला (स्वराज्याची पहिली लढाई).
१९४२: अखिल भारतीय काँग्रेस समितीने मुंबईत भारत छोडो मोहिमेस सुरुवात केली व करा किंवा मरा हा नारा दिला.
१९४९: भूतान देशाची स्थापना झाली.

## डॉ. शिवाजी शिंदे यांच्या ग्रंथास स्व.राजाराम डाकवे साहित्य पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने वाचन संस्कृतीला चालना मिळावी तसेच नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी साहित्यिकांच्या साहित्यकृतीला दरवर्षी 'राज्यस्तरीय स्व. राजाराम डाकवे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येतात. २०२५ मध्ये प्रकाशित झालेल्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. यावर्षीचा पुरस्कार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सहायक कुलसचिव म्हणून कार्यरत असणारे डॉ. शिवाजी शिंदे यांच्या 'भावगंधित व्यक्तिमत्वे' या ग्रंथास जाहीर झाला आहे. या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परीक्षकांनी परिक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या वतीने स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. संदीप डाकवे, उपाध्यक्ष श्री आप्पासो निवडुंगे व सचिव सौ. रेश्मा डाकवे यांनी या पुरस्काराची घोषणा केली. हे सर्व पुरस्कार एका विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात येतील. कार्यक्रमाची तारीख, वेळ व ठिकाण नंतर कळवले जाईल असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.



## 'भारत लर्न्स एआय'मधून गरजू विद्यार्थ्यांना मोफत एआय शिक्षण

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

**स्वातंत्र्य दिनानिमित्त रॉबिन हूड आर्मीचे दोन उपक्रम**

स्वातंत्र्य दिनानिमित्त रॉबिन हूड आर्मी सोलापूरच्या वतीने सलग दहाव्या वर्षी सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा 'भारत लर्न्स एआय' आणि 'मिशन स्वदेश' हे दोन उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रा हिंदुराव गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारत लर्न्स एआय या देशव्यापी उपक्रमांतर्गत वंचित, झोपडपट्टी परिसरातील तसेच गरजू विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) मोफत शिक्षण देण्यासाठी भारत लर्निंग सेंटर सुरू करण्यात येणार आहेत. सोलापूरमधील विद्यार्थ्यांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळावा, यासाठी ग्लोबल व्हिलेज एज्युकेशनल कॉम्प्लेक्स, बोरामणी येथे तसेच शहरातील झोपडपट्टी परिसरात ही केंद्रे सुरू केली जाणार आहेत. 'मिशन स्वदेश' अंतर्गत ग्रामीण भागातील गरजू व एकल महिला तसेच शेतकरी कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात येणार आहे. एका किटमध्ये पाच किलो गहू, तीन किलो तांदूळ, एक किलो डाळ, एक किलो पोहे आणि एक किलो तेल देण्यात येणार आहे. किराणा किटसाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी १३ ऑगस्ट २०२६ पर्यंत नोंदणी करावी. पूर्वनोंदणी करणाऱ्या दात्यांसाठी किट संकलनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ७७७४०२४९६७, ९५५२६४६९००, ९३२५९७४४७४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी प्रा. अनिकेत चनशेट्टी, करण कलबुर्गी आणि ओंकार अतनुरे उपस्थित होते.



## चित्रकला स्पर्धेत ४८५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**तात्यासाहेब कोठे जयंतीनिमित्त विडी घरकुल येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

शिक्षणमहर्षी स्वर्गीय विष्णुपंत कोठे यांच्या जयंतीनिमित्त संभाजीराव शिंदे प्रशाला, विडी घरकुल येथे शहरस्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सदस्या डॉ. राधिका चिलका उपस्थित होत्या. यावेळी प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक नागेश बंडे, मार्गदर्शिका तनुजा मारपल्ली, कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख नवनाथ व्हटकर तसेच प्रशालेचे माजी चित्रकला शिक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती आणि शिक्षणमहर्षी स्व. विष्णुपंत कोठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. स्पर्धेत पूर्व विभागातील तब्बल ३५ शाळांमधील ४८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण माजी कलाशिक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. विजेत्यांसाठी प्रथम क्रमांकास रु. १,००१, ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास रु. ७५१, ट्रॉफी व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांकास रु. ५०१, ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार असून, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

# सोलापूर, सातारासह सहा जिल्ह्यांचे 'क्रीडा प्रशिक्षण केंद्र' अनुदानापासून वंचित

राज्यातील क्रीडा संस्कृतीला अधिक बळकट करण्यासाठी आणि उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे ३० जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांना २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण २ कोटी ४७ लाख ९९ हजार ५०० रुपयांचे सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात आले आहे. मात्र, शासकीय प्रशिक्षक नसल्यामुळे किंवा संबंधित जिल्ह्याचा प्रस्ताव नसल्यामुळे सोलापूर बरोबरच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सातारा जिल्ह्यासह बीड, हिंगोली, बुलढाणा व गोंदिया हे ६ जिल्हे या अनुदानापासून वंचित राहिले आहेत.



### सोलापुरात दोन प्रशिक्षक कागदावर, पण प्रत्यक्षात एकही नाही!

इतर जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षक नसणे किंवा प्रस्ताव न जाणे ही कारणे असतील, परंतु सोलापूर जिल्ह्याची स्थिती अत्यंत अनाकलनीय आणि चिंताजनक आहे. सोलापूरला सध्या शासकीय मार्गदर्शकाची ३ पदे मंजूर आहेत, मात्र प्रत्यक्ष ग्राउंडवर परिस्थिती पूर्णपणे निराळी आहे.

**वेतन सोलापूरचे, सेवा पुण्याची:** हॉकीच्या प्रशिक्षिका वैशाली सूळ या गेल्या वर्षापासून प्रतिनियुक्तीवर (डेप्युटेशन) पुणे येथे कार्यरत आहेत. प्रतिनियुक्तीचा कालावधीला निश्चित नियम व मर्यादा असतानाही क्रीडा खात्याने या नियमांना हरताळ फासला आहे. संबंधित प्रशिक्षिकेची पुण्यातच गरज असेल, तर क्रीडा खात्याने त्यांची कायमस्वरूपी बदली करणे आवश्यक आहे.


**नावालाच सोलापूरची नियुक्ती :** पुण्याचेच दिव्यांग प्रशिक्षक सुयश जाधव यांची नुकतीच सोलापूरला बदली झाली आहे. परंतु, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत जलतरणातील ५० मीटर फ्रीस्टाईलचे पदक अवघ्या तीन सेकंदांनी हुकल्यामुळे आणि आगामी ऑक्टोबरमधील एशियन गेम्सच्या तयारीसाठी त्यांचे जिम ट्रेनर व मुख्य प्रशिक्षक पुण्यातच असल्यामुळे, ते रुजू होऊनही पुण्यातच सराव करत आहेत. परिणामी, ते ऑक्टोबरपर्यंत सोलापूरला उपलब्ध असणे अशक्य आहे.

### लोकप्रतिनिधींच्या पुढाकाराची गरज

सध्यस्थितीत सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयात कागदावर दोन प्रशिक्षक दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात एकही शासकीय प्रशिक्षक उपलब्ध नाही. अशा बिकट परिस्थितीत सोलापूरच्या ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्यासाठी नेमका कसा सराव करावा, असा गंभीर प्रश्न क्रीडाप्रेमींसमोर उभा ठाकला आहे. यामुळे सोलापूरला हक्काचे शासकीय प्रशिक्षक मिळवून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व क्रीडा संघटकांनी आणि क्रीडाप्रेमींनी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून तातडीने पाठपुरावा करणे गरजेचे आहे. केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी याप्रकरणी लक्ष घालून सोलापूर जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला न्याय मिळवून देणे आणि खडलेले अनुदान व मार्गदर्शक उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे.



**स्ट्रेट ड्राईव्ह**



**अजितकुमार संगवे**
मो.9881133103

**राज्यातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांसाठी गतवर्षीचे प्राप्त अनुदान**

राज्यातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रासाठी २०२५-२६ या वर्षासाठी प्राप्त अनुदान याप्रमाणे आहे. जिल्हा व मंजूर निधीचा तपशील (रक्कम लाखात): नागपूर (१२.९२), भंडारा (१०.५५), गडचिरोली (८.५४), चंद्रपूर (६.५०), वर्धा (४.१८), अमरावती (१२.५२), वाशिम (८.९२), अकोला(६.७२), यवतमाळ (६.२२), ठाणे (८.३९), मुंबई शहर (५.५०), रायगड(८.४२), पालघर (६.२८), मुंबई उपनगर (४.८०), पुणे (८.६९), अहिल्यानगर (११.३५), लातूर (५.५८), नांदेड (१०.६४), धाराशिव (११.३५), नाशिक (११.९४), नंदुरबार (५.४७), जळगाव (९.४१), धुळे (८.३५), कोल्हापूर (७.१९), सांगली (१०.३०), रत्नागिरी (६.२८), सिंधुदुर्ग (६.२०), परभणी (६.४०), जालना (६.५३), छत्रपती संभाजी नगर (११.७५).

## स्वावलंबनात परमोच्च आनंद असतो

जीवनात स्वावलंबी बना. स्वावलंबी बनण्यात जो आनंद आहे तो शब्दात सांगता येत नाही. परावलंबनातले दुःख आणि स्वावलंबी असण्यातला परमोच्च आनंद वेगळाच असतो, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी यांनी केले.




बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात त्या बोलत होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, स्वावलंबी बनण्यासाठी प्रथम आळस झटकून द्या. व्यसनांपासून दूर राहा. वाढती व्यसनाधीनता ही आज समस्या बनलेली आहे. व्यसनांमुळे पैशाचा अपव्यय होतो. शिवाय आपल्या मौल्यवान शरीराचे नुकसान होते. त्यामुळे आपले सर्व नातेवाईक दुरावतात. आज युवा पिढी आधुनिकतेच्या नावाखाली व्यसनाच्या विळख्यात अडकत आहे. त्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. बुद्धी लॉक झाल्यामुळे दुर्बुद्धीमुळे युवक व्यसनाच्या आहारी जातो. आपली बुद्धी जागरूक ठेवा. स्वतःला ओळखा, स्वची जाणीव असू द्या. कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास ढळू देऊ नका. आत्मविश्वास असेल तर जगातील कोणतीच शक्ती आपल्याला हरवू शकत नाही. कर्म आत्म्यावर आरूढ होऊ नये याची काळजी घ्या. आपल्यातील आंतरिक शक्ती, आत्मशक्ती विसरू नका. आत्मविश्वासामुळे आत्म जागरण होते.नोकरी मागणारे नको नोकरी देणारे बना. इतरांना काम देण्याचे सामर्थ्य हवे. आनंद वाटण्याचा प्रयत्न करा.

**-मल्लेश पुरवंत**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### माता बालकच्या सहविचार सोहळ्यात माजी सैनिकांच्या पत्नींचा सन्मान

**सांगोला, दि. ७ ऑगस्ट-**

सांगोला येथील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या महिला सहविचार कार्यक्रमात माजी सैनिकांच्या पत्नी राजश्री साळुंखे, संगीता चौगुले, शालन गयाळी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तींनी आपले भावूक मनोगत व्यक्त करत मने जिंकली. याप्रसंगी संस्थेच्या संस्थापिका डॉ.संजीवनी केळकर, अध्यक्षा नीलिमा कुलकर्णी, कोषाध्यक्षा शालिनी कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, ॲड.केदार उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सहविचार प्रार्थनेने झाली. त्यानंतर देशभक्तीपर समूहगीत गायन सादर करण्यात आले. यावेळी आयोजित रंगभरण स्पर्धेत प्रथम स्नेहल रसाळ, संपदा दौंडे, प्राजक्ता पैलवान, धनलक्ष्मी होनराव, द्वितीय सुवर्णा सपताळ, विद्या म्हेत्रे, श्रद्धा देशपांडे, पूनम भाकरे, तृतीय क्रमांक प्रतिभा सराटे, वैशाली कदम, मिनल कमले, कल्याणी दिवटे यांनी पटकाविला. स्पर्धेनंतर प्रश्नमंजुषा, विविध मनोरंजनात्मक खेळ उत्साहात रंगले. प्रास्ताविक स्नेहा महिमकर, सूत्रसंचालन मोनिका देशमुख, स्पर्धा निकाल वाचन प्राजक्ता पैलवान यांनी केले. तसेच क्रांती दिनाची माहिती प्राजक्ता भाकरे, पारशी दिनाची माहिती रेखा दौंडे, आदिवासी दिनाची माहिती सुवर्णा सपताळ यांनी दिली.




### एमआयटी विश्वशांती शिक्षण समूहाचा स्थापना दिन साजरा

**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

ज्ञान, संस्कार, गुणवत्ता आणि विश्वशांतीचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे ध्येय बाळगणाऱ्या एमआयटी विश्वशांती शिक्षण समूहाचा ४४ वा स्थापना दिन एमआयटी विजय शाळा येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विशेष परिपाठाने झाली. स्थापना दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षकांनी संस्थेच्या मूल्यांचे जतन करण्याची आणि समाजहितासाठी कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतली. संस्थेचे दूरदर्शी संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, विश्वस्त मंडळ आणि व्यवस्थापन यांनी शिक्षणाच्या माध्यमातून घडविलेल्या परिवर्तनकारी कार्याबद्दल अभिवादन करण्यात आले. यावेळी एमआयटी व्हीजीएसचे मार्केटिंग ग्रुप हेड दिपक काळोखे यांचा मुख्याध्यापिका रेखा पाटील यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वरिष्ठ शिक्षिका संध्या खंडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, शिस्त, सामाजिक उत्तरदायित्व आणि उत्कृष्टतेचा ध्यास घेण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या कार्याचा आढावा घेत ज्ञानासोबत संस्कार, चारित्र्य आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधणारे शिक्षणच विद्यार्थ्यांना सक्षम नागरिक बनवते, असे सांगत विद्यार्थ्यांना एमआयटीच्या मूल्यांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.



### हरि ओम संस्थेच्यावतीने हातमाग विणकर दिन साजरा

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बालाजी जंगम हातमाग विणकर दिनानिमित्त विणकर प्रतिकृती पुतळ्यास हार घालून अभिवादन केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी लक्ष्मीकांत दंडी, हिरालाल धुळम, गणेश सिद्धम, जगदीश बोमद्याल, अशोक यज्जा, इराण्णा चंशेट्टी, श्रीधर अंबाल, रुक्मण्सा दौलताबाद, शेखर इराबत्ती, श्रीनिवास रापर्ती, अनिल बिद्री, सदानंद इंदापुरे, राजू कत्तुल, बालाजी नंदल उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त नादरगी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सध्या हातमागावर काम करणारे विणकर श्रीनिवास बंडा यांचा सत्कार हातमाग विणकर दिन औचित्य साधून संस्थेचे अध्यक्ष बालाजी जंगम हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन खजिनदार लक्ष्मीकांत दंडी व व आभार गणेश सिद्धम यांनी मानले.

### मॉर्निंग वॉकला गेलेल्या महिलेच्या गळ्यातील सव्वा लाखांचे गंठण लंपास

**मंगळवेढा, दि. ७ ऑगस्ट-**

मंगळवेढ्यात मॉर्निंग वॉकला जावून घरी परतणाऱ्या एका ७१ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १ लाख १५ हजार रुपये किंमतीचे मिनी गंठण जबरदस्तीने ओढून लांबवण्यात आले. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी शकुंतला रायबान (वय ७१ रा.मंगलनगर,मंगळवेढा) ह्या दि.६ ऑगस्ट रोजी सकाळी ६.३० वाजता मंगळवेढा-पंढरपूर रोडवर बायपास रोडच्या पलीकडे मॉर्निंग वॉक करावयास गेल्या होत्या. घरी परत पायी येत असताना पाठीमागून काळ्या रंगाच्या मोटर सायकलवर हाफ शर्ट घातलेल्या एका इसमाने त्यांच्यासमोर येवून जबरदस्तीने गळ्यातील १ लाख १५ हजार ७५१ रुपये किंमतीचे मिनी गंठण गळ्यातून हिसकावून नेली. याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुमार ढेरे हे करीत आहेत.

# बेकायदेशीर गर्भलिंग निदानाचा पर्दाफाश

### सोनोग्राफी मशिन व मोबाईल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ७ ऑगस्ट-**

गर्भलिंग निदान प्रतिबंधक PCPNDT कायदा, १९९४ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सांगोला तालुक्यात मोठी कारवाई करण्यात आली आहे. वाकी-शिवणे येथे बेकायदेशीररीत्या चालणाऱ्या गर्भलिंग निदान केंद्रावर छापा टाकून सोनोग्राफी मशिन, मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात आले असून, ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुका समुचित प्राधिकारी तथा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरविंद गिराम यांना दि. ५ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. वाकी-शिवणे येथील जिल्हा परिषद शाळेजवळ राहणाऱ्या भास्कर रामचंद्र घाडगे यांच्या घरी पोलीस पथकासह अचानक भेट दिली असता, सुनिल संतोष शिंदे व पूजा सुनिल शिंदे रा. तळसंगी, ता. मंगळवेढा हे दाम्पत्य आढळले.

चौकशीत या ठिकाणी गर्भातील बाळ मुलगा आहे की मुलगी हे सांगून प्रत्येक तपासणीसाठी १५ हजार रुपये घेतले जात असल्याचे समोर आले. तपासणी दरम्यान USG Probe, OPPO मोबाईल, चार्जर व पॅकिंग केस असा साहित्य जप्त करण्यात आले. यासाठी कोणतेही वैध PCPNDT नोंदणी प्रमाणपत्र किंवा कायदेशीर कागदपत्रे सादर करता आली नाहीत.

चौकशीत हे उपकरण प्रवीण पोपटराव देशमुख, रा. बारामती यांचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे भास्कर रामचंद्र घाडगे, प्रवीण पोपटराव देशमुख व बापूराव किसवे या तिघांविरुद्ध सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी डॉ. गिराम यांनी सांगितले की, अवैध गर्भलिंग निदान करणे हा अत्यंत गंभीर व अजामीनपात्र गुन्हा आहे. अशा प्रकारात सहभागी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. नागरिकांनी तालुक्यात कुठेही असे प्रकार सुरू असल्यास तात्काळ माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल. माहितीसाठी टोल फ्री १८००२३३४४७५ / १०४ किंवा http://amchimulgimaha.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा. खरी माहिती दिल्यास खबरी योजनेअंतर्गत एक लाख रुपये बक्षीस देण्यात येईल. असे तपास अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय सांगोला डॉ. अरविंद सुभाषराव गिराम यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## तीर्थ येथे सापडला मेईदेव राजाचा शिलालेख

### इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांचे संशोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तीर्थ येथे इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांना ऐतिहासिक सर्वेक्षण करताना मेईदेव राजाचा शिलालेख आढळून आला आहे. त्यामुळे तीर्थ गावाच्या इतिहासावर नव्याने प्रकाश पडला आहे.

शिलालेखातील मजकूर अवघ्या दोन ओळींचा असून शिलालेख मराठी भाषेत आहे. शिळेवर डाव्या भागात खालच्या बाजूस गंडभेरुंडासारखी दिसणारी दोन तोंडांची मानवी आकृती कोरलेली आहे. अक्षरवटिकेवरून शिलालेखाचा काळ साधारणतः चौदावे शतकातील आहे. अणवेकर यांनी शिलालेखाचे ठसे घेऊन पुण्यातील इतिहास अभ्यासक अथर्व पिंगळे यांच्याकडे वाचनासाठी पाठविले. शिलालेखात उल्लेख केलेला मेईदेव या शासकाचे नाव पहिल्यांदाच समोर आले आहे तो कुंभारी विभागातील ६० गावाचा शासक होता. देवगिरीच्या यादवांनंतर म



हाराष्ट्रावर दिल्ली सुलतानाची सत्ता आली. मुहम्मद तुघलकाच्या अखेरच्या काळात दक्षिणेतील सुलतानाचे शासन कमकुवत झाले. त्याचा फायदा घेऊन स्थानिक सामंत स्वतंत्र झाले. मेईदेव याने देखील याच संधीचा फायदा घेऊन कुंभारीच्या साठ गावावर सत्ता प्रस्थापित केली. मेईदेवाने केलेल्या भूमिदानाचा उल्लेखही प्रस्तुत शिलालेखात आला आहे.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये रवींद्रनाथ टागोर यांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ७ ऑगस्ट-**

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोला विद्यामंदिर ज्यु. कॉलेज येथे गीतगायन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षिका शुभांगी घोंगडे आणि वाङ्मय विभाग प्रमुख प्रा.धनाजी चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रतिमेस प्रदीप धुकटे व कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास चारुदत्त जगताप जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत भावगीत प्रकारात दिशा गायकवाड प्रथम, अनुजा खडतरे द्वितीय, स्वप्नाली इंगोले तृतीय, भक्तीगीत प्रकारात प्रमिला मिसाळ प्रथम, संस्कृती शिंदे द्वितीय, तेजस्विनी केंगार तृतीय, देशभक्तीपर गीत प्रकारात धानेश्वरी उकळे प्रथम, पल्लवी येलपले द्वितीय, ऋतुजा रोंगे तृतीय तसेच लोकगीत प्रकारात साक्षी जगधने व दिशा गायकवाड प्रथम, तेजस्विनी केंगार द्वितीय, तर आरती शिनगारे हिने तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड. विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेचे परीक्षण प्रा.इसाक मुल्ला, प्रा.गीतांजली साखरे, प्रा.माधुरी केदार यांनी पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शिवशंकर तटाळे, सूत्रसंचालन प्रा.राधा रिंटे यांनी केले. प्रा.निलेश नागणे यांनी आभार मानले.

### इम्तियाज नावाच्या व्यक्तींना ५ लिटर मोफत पेट्रोल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

सोलापूर : एमआयएम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दिनांक १० ऑगस्ट रोजी सात रस्ता येथील कारीगर पेट्रोल पंप येथे इम्तियाज नावाच्या व्यक्तींना मोफत ५ लिटर पेट्रोल देण्यात येणार आहे. रक्षा बंधन सणानिमित्त १०१ लाडक्या बहिणींचासुद्धा ५०० रुपयांचे मोफत पेट्रोल देऊन विशेष सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शौकत पठाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

> १०१ लाडक्या बहिणींचा राखी पौर्णिमेनिमित्त मोफत पेट्रोल देऊन होणार सन्मान

प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांचा वाढदिवस १० ऑगस्ट रोजी आहे. तसेच याच महिन्यात शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी राखी पौर्णिमा सण असल्याने महिलांचादेखील सन्मान करून अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'इम्तियाज' नावाच्या व्यक्तींसाठी वाहनाचे लायसन तसेच आधार कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. ज्यांच्याकडे वाहन नाही, परंतु नाव मात्र इम्तियाज जलील आहे. अशा व्यक्तींनाही ५ लिटर मोफत पेट्रोलचा लाभ मिळणार आहे. सकाळी ९ ते ११ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. या पत्रकार परिषदेला तौफिक हत्तूरे, सोहेल पठाण, वहिदा शेख, रियाज शेख आदी उपस्थित होते.



### स्वकुळसाळी समाजाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

स्वकुळसाळी समाज ज्ञातीच्या वतीने आयोजित भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, नामसप्ताह, पालखी व भव्य रथ मिरवणुकीसह विविध उपक्रमांचा वार्षिक अहवालाचे प्रकाशन महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते विणकर बाग येथे करण्यात आले.

यावेळी श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, नगरसेवक विनोद भोसले, माजी नगरसेवक शशिकांत कैची तसेच स्वकुळसाळी समाज ज्ञातीचे विठ्ठल मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष परमेश्वर गदगे, उपाध्यक्ष प्रवीण कापसे, सचिव ॲड. ज्ञानेश्वर डिंगणे, सहसचिव आनंद कंगे, खजिनदार अंबादास सरवदे, विश्वस्त जयहरी साखरे, ज्ञानेश्वर एडके, अमरनाथ सपार, यशवंत एकबोटे, नलिनी शेंद्रे आणि रत्नप्रभा वि. चिल्लाळ आदी समाजबांधव उपस्थित होते.

### मेहता प्राथमिक शाळेत पालक-शिक्षक संघ सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत पालक-शिक्षक संघ सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या सभेस कार्यकमाचे प्रमुख अतिथी लालसिंग रजपूत (निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक, शिवाजी अध्यापक विद्यालय,नेहरू नगर, सोलापूर), नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर, रेखा हेरलगे उपस्थित होते. शाला समितीचे अध्यक्ष, अनिल बरवे यांनी सभेस शुभेच्छा दिल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर



यांनी आपल्या प्रास्ताविक केले. योगेश सरवदे यांनी बदललेल्या नवीन अभ्यासक्रमाविषयी माहिती सांगितली. श्रुती कुलकर्णी यांनी संस्कार गीत गायले. पाहुण्यांचा परिचय सुनेत्रा मोहोळकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते लालसिंग रजपूत यांनी आदर्श पालकत्व कसे असावे, यावर सखोल असे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शीतल जालिमिंचे यांनी केले तर आभार स्वाती मोहरे यांनी मानले.

### 'इश्क का पर्चा'ने नाट्यमहोत्सवाचा पहिला दिवस गाजविला

**हास्याच्या पावसात नाट्यरसिक चिंब; किरण लोंढे यांच्या दिग्दर्शनासह अभिनयाला दाद**


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

अस्तित्व मेकर्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित कै. प्रमोद खांडेकर सांस्कृतिक नाट्य महोत्सवाला गुरुवारी हुतात्मा स्मृती मंदिर येथे सुरुवात झाली. कै. प्रमोद खांडेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन महोत्सवाचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे आणि युवा उद्योजक ज्योतिबा गुंड यांच्या हस्ते झाले.

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी आनंद जाधव लिखित आणि किरण लोंढे दिग्दर्शित 'इश्क का पर्चा' या दोन अंकी नाटकाने नाट्यरसिकांना तीन तास हास्याच्या पावसात चिंब केले. उत्तम मांडणी, प्रकाशयोजना, संगीतसाथ आणि कलावंतांच्या अभिनयामुळे नाटकाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. किरण लोंढे यांनी दिग्दर्शनासह दमदार अभिनय केला. अभिजित दुपारगुडे, अक्षय कोरडे आणि समृद्धी भोसले यांच्या सहज अभिनयाला टाळ्यांची दाद मिळाली. प्रमुख भूमिकांमध्ये यश क्षिरसागर, आदित्य पांडे आणि मीनल चव्हाण यांनी भूमिका साकारल्या. प्रत्येक विनोदी प्रसंगाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळत असल्याने नाटकाने रसिकांना खिळवून ठेवले. नाटकाचे नेपथ्य सोमनाथ लोखंडे, प्रकाशयोजना कृतार्थ कनसारा आणि संगीतसाथ आयुष लोकरे यांनी केली. यावेळी महोत्सवाचे प्रमुख संयोजक ॲड. बसवराज सलगर, संजय सावंत, विजय साळुंखे, अस्तित्व मेकर्स फाउंडेशनचे अध्यक्ष किरण लोंढे, सचिन जगताप, आशुतोष नाटकर, दीपक काळे, अशपाक नदाफ, सागर देवकुळे आणि ओंकार साठे उपस्थित होते.



### शिवसेनेच्या युवासेना जिल्हाप्रमुखपदी रमेश चौगुले यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे व युवसेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने तसेच शिवसेना युवासेना सचिव वरुण सरदेसाई व राज्य विस्तारक सिध्दाराम शिलवंत यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या वतीने रमेश गंगाराम चौगुले यांची युवासेना जिल्हाप्रमुख (दक्षिण व अक्कलकोट विधानसभा) पदी निवड झाली आहे. शिवसेना सोलापूर लोकसभा प्रमुख संजय पौळ, शिवसेना जिल्हाप्रमुख शरणराज केंगनाळकर, जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर यांनी या निवडीबद्दल त्यांचा सत्कार केला.

## माळशिरस तालुक्यासाठी पंढरपूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सोयीचे

### नागरिकांमधून समाधान; वेळ व आर्थिक बचत होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर येथे नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर झाले आहे. पंढरपूर येथील हे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय खरेतर माळशिरस, सांगोला, पंढरपूर, माढा या तालुक्यासाठी अतिशय सोयीस्कर आहे.

माळशिरस हा सोलापूर जिल्ह्यातील पश्चिम भागातील शेवटचा तालुका. माळशिरसपासून सोलापूर जवळपास १२० ते १३० किलोमीटर आहे. पंढरपूर फक्त ४० ते ५० किलोमीटर आहे. यामुळेच तर पंढरपूर येथे होणारे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय माळशिरस तालुक्यासाठी अतिशय सोयीस्कर आहे. यामुळे वेळ तर वाचणार आहेच, शिवाय आर्थिक बचत सुद्धा होणार आहे. माळशिरस तालुक्यातील नागरिकांसाठी हे कार्यालय अतिशय सोयीस्कर होणार आहे. माळशिरस तालुक्यात दहा महसुली मंडळे आहेत. माळशिरस येथे तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगरपंचायत आहे तर अकलूज येथे उपविभागीय कार्यालय आहे. अकलूज ही नगरपरिषद आहे. याठिकाणी सर्वच कार्यालयातील कामकाजासाठी नागरिकांना व अधिकाऱ्यांना सध्या सोलापूर येथेच जावे लागते. तालुक्यातील पश्चिम भागातील शिंदेवाडी व सुळेवाडी ही शेवटच्या टोकाची गावे आहेत. पुर्व भागातील गावे ही फक्त पंढरपूर पासून ३० ते ३५ किलोमीटर आहेत. त्यांना पंढरपूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अतिशय जवळ व सोयीस्कर आहे. माळशिरस हा सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका आहे. सर्वात जास्त पंचायत समिती , जिल्हा परिषद सदस्य, १०३ ग्राम पंचायती, ११२ महसुली गावे, माळशिरस, नातेपुते, महाळुंग येथे नगरपंचायती तर अकलूज येथे नगरपरिषद आहे. तालुक्याची लोकसंख्या चार लाख ८५ हजार ६४५ एवढी आहे. भौगोलिक दृष्ट्या माळशिरस तालुका सर्वात मोठा आहे. माळशिरस तालुक्याचे क्षेत्र एक लाख साठ हजार ८०२ हेक्टर एवढे आहे. अशा या सर्वात मोठ्या माळशिरस तालुक्यासाठी पंढरपूर येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय खरेतर तर सर्व सामान्यांसाठी अत्यंत सोयीस्कर व जवळचे ठरणार आहे. यामुळे नागरिकांची कामे वेळेतच मार्गी लागणार आहेत. यामुळेच माळशिरस तालुक्यासाठी पंढरपूर येथेच अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय व्हावे अशी माळशिरस तालुकावासियांची अपेक्षा आहे.

> **कार्यालय पंढरपूर येथेच व्हावे**
> पंढरपूर येथे होणारे नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय हे माळशिरस तालुक्यातील जनतेसाठी अत्यंत सोयीस्कर आहे. यामुळे ते कार्यालय पंढरपूर येथेच व्हावे.
> **- शिवराज पुकळे,** जिल्हाध्यक्ष, भाजप सोलापूर (पश्चिम विभाग).

### बार्शीच्या श्री भगवंत मंदिरात १३ ऑगस्टपासून श्रावणमास प्रवचनमाला

**हभप डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांचे महिनाभर निरुपण**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट, बार्शी व श्री सद्गुरु बोधराज भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री भगवंत मंदिरात श्रावणमासानिमित्त विशेष प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ पासून दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत ही प्रवचनमाला होणार आहे.



यावर्षी हभप डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्या अमृतवाणीतून श्रीमद्भागवत कथा चिंतन - भाग २ या विषयावर संपूर्ण श्रावण महिनाभर निरुपण होणार आहे. डॉ. जयवंत महाराज बोधले हे बार्शी तालुक्यातील धामणगांव येथील असून, श्री संत माणकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज आहेत. सन २००३ पासून श्री भगवंत मंदिरात श्रावणमास प्रवचनमालेत त्यांनी विविध आध्यात्मिक विषयांवर निरुपण केले आहे. यावर्षी ही प्रवचनमाला सलग २२ व्या वर्षात पदार्पण करत आहे. यापूर्वी त्यांनी श्री संत नामदेव महाराज चरित्र, हरिपाठ, श्रीकृष्ण चरित्र, विष्णुसहस्रनाम, श्री संत माणकोजी महाराज चरित्र, चांगदेव पासष्टी, श्री संत तुकाराम महाराज चरित्र व तत्त्वज्ञान, श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र व तत्त्वज्ञान तसेच श्री संत एकनाथ महाराज चरित्र व तत्त्वज्ञान अशा अनेक आध्यात्मिक विषयांवर महिनाभर निरुपण केले आहे. श्रावण महिन्यात नवीन आध्यात्मिक विषयावर होणारी ही प्रवचनमाला बार्शी शहर व पंचक्रोशीमध्ये लोकप्रिय ठरली असून यंदाच्या श्रीमद्भागवत कथा चिंतन-भाग २ या प्रवचनमालेचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन भगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच दिलीप बुडूख तसेच श्री सद्गुरु बोधराज भक्त मंडळाचे प्रा. विलास जगदाळे यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उजनी धरणात २५ हजार क्युसेक पाण्याची आवक

**टेंभुर्णी, दि. ७ ऑगस्ट -**

उजनी धरणात शुक्रवार (दि. ७ ऑगस्ट ) सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपयुक्त पाणीसाठा ९९.७८ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणाची पाणीपातळी ४९६.८२० मीटर इतकी नोंदवली आहे. धरणात ३३१६.६६ दशलक्ष घनमीटर (११७.११ टीएमसी) इतका पाणीसाठा आहे. त्यापैकी १५१३.८५ दशलक्ष घनमीटर (५३.४६ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

उजनी धरणाच्या सांडव्यातून ४० हजार क्युसेक, वीजगृहातून १,६०० क्युसेक असा एकूण ४१,६०० क्युसेक पाण्याचा विसर्ग भीमा नदीपात्रात सुरू आहे. धरणात दौंड नदी मापन केंद्रातून २५,७२६ क्युसेक्स पाण्याची आवक सुरू आहे. धरणातून मुख्य कालव्यात २,५५० क्युसेक, टनलद्वारे ९०० क्युसेक, सीना-माढा उपसा सिंचन योजनेत २१० क्युसेक आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेत ९० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. रिव्हर स्लुईसमधून सध्या कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही. उजनी धरण जवळपास पूर्ण क्षमतेने भरलेले असल्यामुळे भीमा नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



# वैज्ञानिक पध्दतीने मूर्ती संवर्धनास मंजुरी

## श्री विठ्ठल-रुक्मिणी माता मूर्ती संवर्धनप्रकरणी उच्च न्यायालयाचा निर्णय

### विरोधातील याचिका फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ ऑगस्ट -**

श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने मंदिर समितीने घेतलेल्या भूमिकेला उच्च न्यायालय, मुंबई, कोल्हापूर खंडपीठाने ७ ऑगस्ट रोजी वैज्ञानिक पद्धतीने संवर्धनास मंजुरी दिली आहे. याबाबत विरोधी याचिका फेटाळल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींची होणारी झीज व नुकसान रोखण्यासाठी पुरातत्व विभागाच्या शिफारशीनुसार आवश्यक संवर्धनात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीने घेतला होता. या कार्यवाहीस आक्षेप घेऊन गणेश लंके व इतरांनी उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. या प्रकरणात उच्च न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे, तज्ज्ञांचे अहवाल तसेच संबंधित कायदेशीर तरतुदींचा विचार करून आज अंतिम आदेश पारित केला. पंढरपूर मंदिरे अधिनियम,१९७३ मधील कलम ३२ च्या तरतुदींचा विचार करताना मंदिर समितीवर मंदिराची संपत्ती, देवता व मूर्ती यांचे संरक्षण, योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याची वैधानिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले आहे.

देवता व मूर्तींचे जतन, संरक्षण व योग्य व्यवस्थापन करणे हे मंदिर प्रशासनाच्या मूलभूत कर्तव्यांपैकी एक आहे. मूर्तींची झीज अथवा नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक त्या संवर्धनात्मक उपाययोजना करणे ही समितीची जबाबदारी असल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे. मूर्तींच्या संवर्धनाबाबत मंदिर समितीने कोणताही निर्णय मनमानी पद्धतीने घेतलेला नसून, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या येथील तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे कार्यवाही प्रस्तावित केली होती, असे न्यायालयाने महत्वपूर्ण निरीक्षण नोंदविले आहे.



याचिकाकर्त्यांकडून मूर्तींवर रासायनिक संरक्षक लेप न करता पारंपरिक वज्रलेप पद्धतीचा अवलंब करण्याची भूमिका मांडली होती. पारंपरिक वज्रलेपाची विशिष्ट पद्धत, त्यातील घटक, त्याचे वैज्ञानिक परिणाम किंवा संबंधित शास्त्र/आगम याबाबत याचिकाकर्त्यांकडून ठोस वैज्ञानिक किंवा तांत्रिक सामग्री सादर केली नसल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले. याउलट मंदिर समितीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या तज्ज्ञांचा अहवाल न्यायालयासमोर सादर केला होता. त्यामुळे मूर्तींच्या संरक्षणासाठी तज्ज्ञांच्या शिफारशीवर आधारित वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करण्याची समितीची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी घेतलेल्या आक्षेपांमध्ये ठोस आधार नसल्याचे सांगत याचिका फेटाळून लावली आहे. दिवाणी न्यायालय, पंढरपूर येथे ॲड. जाधव व ॲड. शिंदे, जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे ॲड. शेंडे, तसेच उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठ येथे ॲड. चौधरी, ॲड. डाकेफळकर व ॲड. गायकवाड यांनी मंदिर समितीची बाज मांडली. मंदिर समितीच्या सदस्य ॲड. माधवी निगडे, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार, सहाय्यक विभाग प्रमुख अरुण सरगर तसेच लिपिक पृथ्वीराज पोळ यांनी संबंधित विधिज्ञांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देणे, न्यायालयीन काम काजाचा पाठपुरावा करणे, आवश्यक त्या तारखांना उपस्थित राहणे आणि समितीची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी समन्वय साधला.

### पुढील संवर्धन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली होणार

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींच्या पुढील संवर्धनाची कार्यवाही संबंधित तज्ज्ञ संस्था व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमध्ये मूर्तींच्या विद्यमान स्थितीचे तांत्रिक दस्तऐवजीकरण, आवश्यक वैज्ञानिक परीक्षण, तज्ज्ञांच्या शिफारशींचे पालन, योग्यची प्रक्रिया आणि संवर्धनानंतर नियमित निरीक्षण यांना प्राधान्य देण्यात येईल. मूर्ती संवर्धनाची तारीख मंदिर समितीच्या आगामी सभेत ठरवण्यात येईल.

# शेलगाव (मा) येथे शेतकऱ्यांचा रस्ता रोको

## थकीत पीक विम्याबाबत आक्रमक; रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ७ ऑगस्ट -**

पंतप्रधान पीक विमा योजना २०२५ चा थकीत पीक विमा तात्काळ मिळावा आणि शेतकरी कर्जमाफी जाहीर केलेली असतानाही बँकांकडून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सक्तीच्या वसुली नोटिसा थांबवाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी आज शुक्रवारी शेलगाव (मा) येथे शेतकऱ्यांच्यावतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी मंडळ अधिकारी व तालुका कृषी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांनी शासन आणि प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शेतकरी विकास बारबोले यांनी कर्जमाफी झाली असतानाही बँकांकडून शेतकऱ्यांना नोटिसा पाठवून मानसिक त्रास दिला जात आहे. हक्काचा २०२५ चा पीक विमा देण्यास टाळाटाळ करत आहे. हा अन्याय सहन केला जाणार नाही, असा



इशारा दिला.

मुसा मुलाणी, हनुमंत भोसले, पांडुरंग घोलप यांनीही मनोगत व्यक्त केले. पुढील काळात तीव्र आंदोलनासह कृषीमंत्र्यांच्या घरावर रुंगणे मोर्चा काढण्याचा इशारा दिला. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. प्रशासनाने मागण्यांची दखल घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्र येण्याचे आवाहन यावेळी हनुमंत भोसले यांनी केले. यावेळी युवासेनेचे जिल्हाप्रमुख पांडुरंग घोलप, मुसा मुलानी, विकास बारबोले, विनोद होनकळस, ज्योतीराम शिंदे, प्रवीण मारकड, सुरज बारबोले, आतिश लोंढे, हनुमंत भोसले, अरुण व्हनकलस, दादा शिंदे, राम माळी, सागर वाघमोडे, कार्तिक बरगुळे, गणेश शिंदे, स्वप्नील मारकड, उमेश मारकड, समाधान रोडे, बंटी रोडे, कृष्णा मारकड, भाऊ काटे, रणजीत बारंगुळे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अरणमध्ये श्री संत सावता महाराज ७३१ व्या पुण्यतिथी सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचा ७३१ वा पुण्यतिथी सोहळा श्री क्षेत्र अरण (ता. माढा) येथे साजरा करण्यात येत आहे. श्री विठ्ठलाची पालखी पंढरपूरहून अरण येथे येणार आहे. श्री विठ्ठलाची पालखी प्रत्यक्ष संतांच्या भेटीसाठी जाण्याचे महाराष्ट्रातील हे एकमेव उदाहरण असल्याचे देवस्थान ट्रस्टचे सचिव ॲड. विजय शिंदे यांनी सांगितले.

सोहळ्याची सुरुवात ६ ऑगस्टपासून झाली आहे. श्री विठ्ठलाच्या पालखीचे पंढरपूरहून शनिवार, ८ ऑगस्ट रोजी प्रस्थान आहे. पहिला मुक्काम रोपळे येथे, तर ९ ऑगस्ट रोजी आष्टी येथे मुक्काम राहणार आहे. सोमवार, १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता पालखी अरण येथे पोहोचेल. रात्री ८ वाजता पालखीचे स्वागत व मिरवणूक निघेल. ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत संत सावता महाराजांच्या समाधीवर फुले अर्पण होतील. बाळासाहेब महाराज देहुकर यांचे कीर्तन होईल..

बुधवार, १२ ऑगस्ट रोजी श्रीफळ हंडी सोहळा होईल. गुरुवार, १३ ऑगस्ट रोजी श्री विठ्ठल पालखी व संत सावता महाराज पालखी यांची गावप्रदक्षिणा, तसेच कीर्तन व भारुड होतील. १४ ऑगस्ट रोजी श्री विठ्ठल पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थानाने सोहळ्याची सांगता होईल. भाविकांनी सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन श्री संत सावता बुवा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे, सचिव विजय शिंदे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस सावता रणदिवे, गणेश शिंदे उपस्थित होते.

## नीलम नगर भागात ४९ वर्षीय इसमाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

अज्ञात करण्यावरून एका इसमाने घरातील पत्र्याच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना नीलमनगर भागात जमादार वस्ती येथे आज शुक्रवारी दुपारी तीन वाजता उघडकीस आली. शरणाप्पा झंपले (वय ४९, रा. जमादार वस्ती, नीलम नगर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. आज शुक्रवारी दुपारी शरणप्पा यांनी घरामध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. ही खबर एमआयडीसी पोलिसांना समजली असता पोलिस हवालदार ए. एन. शेख यांनी घटनास्थळी पोहोचून नातेवाईकांच्या सहाय्याने मृतदेह खाली उतरून येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# भीमाशंकर वाघमोडे यांना मान्यवरांकडून श्रध्दांजली

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ ऑगस्ट -**

अक्कलकोट तालुक्यातील स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक भीमाशंकर वाघमोडे यांच्या निधनानंतर शोकसभा पार पडली.

एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य शंकर व्हनमाने, जगद्गुरु पंचाचार्य हायस्कूलचे प्राचार्य कल्याणी देशेट्टी, प्रा. चिदानंद मठपती, सिद्राम वाघमोडे, ईश्वर माशाळकर, रोहिणी वाघमोडे, सुजाता खानापुरे, शशिकांत कळसगोंडा, राजकुमार साळुंखे, सोलापूर बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष संतोष पाटील, पंचायत समिती सदस्य वैष्णवी सलगरे, सिद्धेश्वर साखर कारखाना संचालक शंकर पाटील, माजी सरपंच सिद्धाराम म्हेत्रे आदींनी श्रद्धांजली वाहिली. अक्कलकोट स्टेशन कडबगाव, नाविंदगी, गुरववाडी, तोळनूर, गौडगाव, नागणसूर, उमरगा, गुद्देवाडी आदी गावातील नागरिक उपस्थित होते.

वाघमोडे यांचे काम उल्लेखनीय होते. कल्याणशेट्टी वाघमोडे परिवाराचे एकनिष्ठ संबंध होते, अशी भावना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली. माजी उपसभापती महिबूब मुल्ला यांनी वाघमोडे यांच्या निधनाने गौडगाव व कडबगाव परिसराचे नुकसान झाल्याचे सांगितले. वाघमोडे यांचे सर्व क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे.आमचे आधारवड गेल्याची भावना त्यांचे लहान बंधू. माजी गटविकास अधिकारी उत्तम वाघमोडे यांनी व्यक केली.

# करकंब नगरपंचायत प्रस्तावावर तीन महिन्यांत निर्णय घ्या

### मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.७ ऑगस्ट -**

करकंब येथील ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याबाबतचा २०१७ पासून शासनाकडे प्रलंबित प्रस्तावाबाबत कायद्यानुसार तीन महिन्यांत अंतिम निर्णय घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना दिले आहेत.

बाळासाहेब देशमुख, अमोल शेळके, पांडुरंग शेटे, लक्ष्मण वंजारी यांच्या जनहित याचिकेवर सुनावणीप्रसंगी न्यायमूर्ती मिलिंद जाधव व न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.याचिकेत करकंब हे तालुक्यातील सर्वाधिक विकसित गावांपैकी एक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १७,४५६ लोकसंख्या, आसपासच्या सुमारे २६ गावांचे सेवा केंद्र तसेच शिक्षण, आरोग्य, बँकिंग, कृषी, व्यापार, व शासकीय सेवांचे प्रमुख केंद्र असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. उच्च न्यायालयानेही या बाबींची नोंद घेतली आहे.




याचिकाकर्त्यांच्या वतीने ग्रामसभेच्या ठरावापासून सुरू झालेली संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगररचना विभाग, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, उपविभागीय अधिकारी आदी सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालांनंतर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दि. ९.४.२०२५ रोजी नगर विकास विभागाकडे अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव पाठविला. तरीही शासनाकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नसल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रस्तावाची शिफारस करून शासनाकडे पाठविल्यानंतरही दीर्घकाळ कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अशा परिस्थितीत ग्रामस्थांना जनहित याचिका दाखल करावी लागली.




करकंबच्या वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयी-सुविधा, सार्वजनिक विकास आणि स्थानिक प्रशासनाच्या दृष्टीने प्रस्तावावर विलंब न करता निर्णय होणे आवश्यक आहे. जिल्हा प्रशासनाने प्रस्तावाची शिफारस केल्यानंतर तो अनिश्चित काळ प्रलंबित ठेवण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही असेही न्यायालयाने स्पष्ट केले. काही त्रुटी असल्यास त्या तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांकडून पूर्ण करून घ्याव्यात. मात्र न्यायालयाने निश्चित केलेली तीन महिन्यांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढविता येणार नाही, असेही स्पष्ट केले आहे. शासनास अधिक वेळ आवश्यक असल्यास कारणे नमूद करून न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचेही आदेशात नमूद आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. उमाकांत व्ही.वाघमारे व ॲड. मिलिंद देशमुख यांनी बाजू मांडली.




### दैनिक तरुण भारतने केला होता पाठपुरावा

करकंब ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर व्हावे यासाठी दैनिक तरुण भारतने दि.४ जानेवारी २०२५ व २ फेब्रुवारी २०२५ च्या अंकांमध्ये करकंब ग्रामपंचायतचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर व्हावे यासाठी आवाज उठविला होता. त्या प्रयत्नांना यश येत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना दि. ९ एप्रिल २०२५ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर तीन महिन्यांत अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.

## महत्त्वाचे...



### फॅबटेक फार्मसीच्या विनायक बंडगर यांना पीएच.डी प्रदान

**सांगोला, दि. ७ ऑगस्ट -**

फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोलामध्ये कार्यालयीन अधीक्षक म्हणून कार्यरत विनायक बंडगर यांना सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी भारतातील आर्थिक वृद्धी आणि बेरोजगारी दर : १९९१ ते २०२३ या कालावधीतील राज्यनिहाय संकलित माहितीच्या आधारे ओकुन सिद्धांताचा अभ्यास या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला होता. बंडगर यांचे फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, डॉ.संजय आदाटे, प्राचार्य डॉ.संजय बैस, रजिस्ट्रार राजेंद्र पाटील यांनी अभिनंदन केले.



### कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी

**पंढरपूर, दि. ७ ऑगस्ट -**

कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पंढरपूर येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.एस.एम.मोरे यांनी अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, सामाजिक समतेसाठीचे योगदान आदींवर प्रकाश टाकला. विद्यार्थिनी सना काझी हिने अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. प्रा.नवनाथ करांडे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तनासाठी असलेला प्रभाव अधोरेखित केला. कार्यक्रमास श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, रजिस्ट्रार गणेश वाळके, महाविद्यालयातील अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच बी.फार्मसी व डी.फार्मसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार विशाल वाघमारे यांनी मानले.



### रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये 'पंढरपूर सिंहगड'च्या पाच विद्यार्थ्यांची निवड

**पंढरपूर, दि.७ ऑगस्ट -**

एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी (ता. पंढरपूर) येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील अंतिम वर्षातील पाच विद्यार्थ्यांची रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे. सर्वांना वार्षिक ७.५ लाखांचे वेतन पॅकेज मिळाले आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या उत्कृष्ट प्लेसमेंट परंपरेला आणखी एक सुवर्ण अध्याय लाभला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ओंकार मुंढे (बोरगाव, ता. बार्शी), सौरभ दिघे (वाढेगाव, ता. सांगोला), सोहेल खान (वाठार, ता. कराड, जि. सातारा), वैष्णवी पाटील (पिंपळनेर, ता. माढा) आणि श्रेयस दामोदरे (पंढरपूर) यांचा समावेश असल्याचे मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. शाम कुलकर्णी यांनी सांगितले. यशाबद्दल प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. शाम कुलकर्णी, डॉ. गणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ. अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडूरु, डॉ. यशवंत पवार, डॉ. सत्यवान जगदाळे, प्रा. अतुल कुलकर्णी यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मुख्याध्यापक मानसिंग बनसोडे यांचा निवृतीबद्दल सत्कार

**अक्कलकोट, दि. ७ ऑगस्ट -**

मराठा मंदिर निर्मलराजे कन्या प्रशाला अक्कलकोट मुख्याध्यापक मानसिंग बनसोडे हे नुकतेच निवृत्त ाले. निवृत्तीनिमित्त मराठा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विलास देशमुख यांच्या हस्ते सपत्निक मुख्याध्यापक बनसोडे यांचा सत्कार झाला. वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी मुख्याध्यापक शहाजी भोसले, सचिव आत्माराम घाटगे, पाटील, मुख्याध्यापक आर. एस. पडवळकर, मुख्याध्यापक योगेश कबाडे आदि मान्यवरांची याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. बनसोडे यांच्या सेवाकार्याबद्दल मान्यवरांनी गोरवोद्गार काढले. महेश इंगळे, अमोलराजे भोसले, पत्रकार नंदकुमार जगदाळे, राजेश जगताप, शहाजी प्रशाला व कन्या प्रशाला रत्नागिरी पाली जत शिक्षक वृदांच्या वतीने बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.




सोलापूर तरुण भारत वर्धापनदिन चिरायु होवो..!

अर्शिवाद



कै.निर्मलाताई ठोकळ
संस्थापिका, माजी आमदार

अध्यक्ष उपाध्यक्ष संचालिका



ॲड.विपीन शं. ठोकळ | मा.सचिन शं.ठोकळ | सौ.शिल्पाताई स.ठोकळ

सचिव प्राचार्य



श्री.भिकाजी सु.गाजरे | * शुभेच्छुक * | श्री.दत्तात्रय दा.गाजरे

इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित
श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

दैनिक तरुण भारतच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

SPACE DECOR
A Division of Garuda Textiles Pvt. Ltd
आमच्या इथे फायबर पॉट, बेडरुम सेट, सोफा सेट, डायनिंग टेबल, ऑफिस चेअर, ऑफिस टेबल, गार्डन साठीच्या वस्तू, लॉकर्स, आर्टीफिशल प्लॉन्टस व इतर नामवंत कंपनीचे फर्निचर उपलब्ध आहे.

Koustubh V.Karwa
43/23, Samrat Chowk, Solapur 413002
Ph.+91 217 2745692
garudafurniture@gmail.com

राष्ट्रीय विचाराचे एकमेव दैनिक
दै.सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



* शुभेच्छुक *
मा. अय्युब अहमद नल्लामंदू
मा.अबुबकर अ.लतीफ नल्लामंदू

दैनिक तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



डी.ए.व्ही.कॉलेज मॅनेजिंग कमिटी, नवी दिल्ली संचलित

सोलापूर जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संकुल
- द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर
- द.प्रे. भै. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- द.गो. भै. दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूर
- पुष्पा गुप्ता दयानंद मॉडेल स्कूल, सोलापूर
- दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला, सोलापूर
- रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब, पंढरपूर
- महात्मा आनंद स्वामी सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय, करकंब

- संस्थेची वैशिष्ट्ये -
• नर्सरी ते पीएचडी पर्यंत शिक्षणाची सोय • NEP-२०२०ची अंमलबजावणी • सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय • अद्यावत संगणक प्रयोगशाळा व हाय स्पीड इंटरनेटची सोय • प्रत्येक वर्गासाठी कौशल्य विकास आधारित कोर्सची सोय • उच्चशिक्षित व तज्ञ प्राध्यापक • शिष्यवृत्तीची सोय • NCC/ NCC सोय • मुला - मुलींचे स्वतंत्र वसतिगृह • सर्व खेळांसाठी सुसज्ज व सुविधा असणारे क्रीडांगण • स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन • व्यक्तिमत्व विकासासाठी अनेक उपक्रम.

XI(Arts, Sci, Comm), B.A, B.Sc, B.Sc.(ECS), B.Com, BCA, MA, M.Com, M.Sc, MCS, BALLB, LLB, LLM, Ph.D या अभ्यासक्रमांची सोय.
संपर्क क्रमांक - ७०२०५०८४०८, ९९२२८९५४९९

शुभेच्छुक : मा. डॉ. महेशजी चोप्रा
स्थानिक सचिव, दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर





दै.सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा...



सभापती उपसभापती सचिव



मा.विजय गरड सर | मा.बाबासाहेब गायकवाड | मा.तुकाराम जगदाळे

* बाजार समितीची वैशिष्ट्ये *
१) सर्व सोयीनियुक्त प्रशस्त धान्य २) शेतमालाची उघड लिलाव पध्दतीने विक्री व त्वरित चुकारा ३) ६० मे.टन क्षमतेचा भुईकाटा ४) जनावर बाजार ५) फळे भाजीपाला मार्केट ६) कडबा मार्केट ७) शॉपिंग सेंटर ८) कोल्ड स्टोअरेज ९) मालाचे योग्य वजन होण्यासाठी परवानाधारक तोलार १०) सुलभ शौचालय ११) जनावरासाठी निवारा शेड १२) ई-नाम योजना १३) शेतमाल तारण योजना १४) हमीभाव खरेदी केंद्र १५) गांडूळ खंत प्रकल्प १६) धान्य चाळणी यंत्र व गोदाम १७) सौर उर्जा प्रकल्प १८) शेतकरी निवास १९) विविध औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन २०) संपूर्ण बाजार आवारामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे

* शुभेच्छुक *
कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

शेती हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, ती जवळपास निम्म्या लोकसंख्येच्या उपजीविकेचा आधार देते. तथापि, देशातील विविध कृषी-हवामान क्षेत्रे कृषी उत्पादकतेसमोर, विशेषतः शुष्क आणि अर्ध- शुष्क प्रदेशांमध्ये, अद्वितीय आव्हाने उभी करतात. यापैकी, कोरडवाहू शेतीला एक महत्त्वाचे स्थान आहे, कारण ती कमी आणि अनियमित पर्जन्यमान, जमिनीची कमी सुपीकता आणि वारंवार येणारा दुष्काळ यांसारख्या वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या प्रदेशांतील लाखो शेतकऱ्यांना आधार देते.

# सोलापूरच्या कोरडवाहू कृषी संशोधन केंद्राचे यशस्वी मार्गक्रमण!







डॉ. नितीनकुमार रणशूर
भ्र. ७८७५३१७६७३

महाराष्ट्रातील सोलापूर येथील कोरडवाहू कृषी संशोधन केंद्र, ही महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीची एक अग्रगण्य संस्था आहे. जी कोरडवाहू शेती पद्धतींसाठी तयार केलेल्या लक्ष्यित संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि ज्ञान प्रसाराद्वारे आव्हानांना सामोरे जाते. सोलापूर येथील कोरडवाहू कृषी संशोधन केंद्र बहुआयामी महत्त्व स्पष्ट करतो आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीत कृषी शाश्वतता वाढवणे, ग्रामीण विकासाला चालना देणे आणि अन्नसुरक्षेत योगदान देण्यामधील त्याच्या भूमिकेवर भर देत कोरडवाहू शेती पद्धतींसाठी तयार केलेल्या लक्ष्यित संशोधन, तंत्रज्ञान आणि ज्ञान प्रसाराद्वारे आव्हानांना सामोरे जाते.

कोरडवाहू शेती भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या सुमारे ४०% आहे आणि देशातील कृषीप्रधान लोकसंख्येच्या मोठ्या भागाचे पालनपोषण करते. सोलापूर जिल्ह्यात अनियमित आणि अपुरा मान्सून पाऊस पडतो, ज्यामुळे अनेकदा दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होते, पिकांच्या उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो. अशा आव्हानात्मक परिसंस्थेमध्ये पारंपरिक शेती पद्धती वापरल्यास अनेकदा जमिनीचा ऱ्हास, जमिनीची घटलेली उत्पादकता आणि हवामानातील बदलांप्रति वाढलेली असुरक्षितता यांसारख्या समस्या उद्भवतात.



सोलापूर येथील कोरडवाहू कृषी संशोधन केंद्र संशोधन केंद्र ,अनुकूल असलेल्या कृषी पद्धती, पिकांचे वाण आणि मृदा- जल संवर्धन तंत्र विकसित करण्यासाठी व त्यांना प्रमाणित करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य करते. या नवनवीन शोधांमुळे शेतकर्यांना संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे आणि उत्पादन स्थिर करणे शक्य होते, ज्यामुळे कोरडवाहू शेतीमधील अंतर्निहित धोके कमी होतात. अशा वैज्ञानिक प्रगतीमुळे या पिकांवर अवलंबून असलेल्या ग्रामीण जनतेसाठी अन्नसुरक्षा सुधारते आणि गरिबी निर्मूलनास थेट मदत होते.

या केंद्राच्या महत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कोरडवाहू शेतीसाठी अनुकूल असलेल्या मृदा आणि जलसंधारण पद्धतींवर दिलेला भर. अतिवापर आणि अनियमित पावसामुळे या प्रदेशातील जमिनी अनेकदा कमी सेंद्रिय पदार्थ, क्षारता आणि धूप यांसारख्या समस्यांनी ग्रस्त असतात. संशोधन केंद्राने संवर्धन शेती तंत्रांमध्ये पुढाकार घेतला आहे, ज्यामध्ये समोच्च बांध, आच्छादन, आंतरपीक आणि शेततळे व बंधारे यांसारख्या कार्यक्षम जल संचयन पद्धतींचा समावेश आहे. या उपायांमुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो, वाहून जाणारे पाणी कमी होते आणि जमिनीची सुपीकता सुधारते, ज्यामुळे जमिनीची दीर्घकालीन शाश्वतता टिकून राहते. हवामान बदलाच्या संदर्भात, केंद्राने विकसित केलेल्या आणि प्रदर्शित केलेल्या अशा अनुकूलन धोरणांना अधिक महत्त्व प्राप्त होते, कारण ती हवामानातील धक्क्यांविरुद्ध लवचिकता निर्माण करतात आणि हवामान- अनुकूल शेतीसाठी योगदान देतात.



सोलापूर येथील कोरडवाहू कृषी संशोधन केंद्राची भूमिका संशोधन आणि विकासाच्या पलीकडे जाऊन शेतकरी शिक्षण आणि विस्तार सेवांपर्यंत विस्तारलेली आहे, जे तंत्रज्ञानाचा अवलंब आणि परिणामांच्या विस्तारासाठी महत्त्वपूर्ण आहेत. शेतावरील चाचण्या, प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून, हे केंद्र स्थानिक शेतकऱ्यांमध्ये ज्ञान हस्तांतरण आणि क्षमता बांधणी सुलभ करते. हा सहभागी दृष्टिकोन सुनिश्चित करतो की स्थानिक ज्ञान वैज्ञानिक अंतर्दृष्टीसह एकत्रित केले जाईल, ज्यामुळे एक व्यावहारिक आणि संदर्भ-विशिष्ट कृषी विकास मॉडेलला चालना मिळते.

विस्तार सेवांद्वारे शेतकऱ्यांना सक्षम केल्याने ते पिकांची निवड, निविष्ठांचा वापर आणि संसाधन व्यवस्थापनाबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम होतात, ज्यामुळे त्यांच्या उपजीविकेची सुरक्षा वाढते. शिवाय, सोलापूर येथील कोरडवाहू कृषी संशोधन केंद्र कोरडवाहू शेतीसंबंधी धोरण निर्मिती आणि नियोजनात महत्त्वपूर्ण योगदान देते. त्याच्या संशोधनातून मिळालेल्या माहितीचा उपयोग कोरडवाहू प्रदेशांना लक्ष्य करणार्या सरकारी योजना, अनुदान वाटप आणि ग्रामीण विकास कार्यक्रमांसाठी केला जातो. ज्या देशात कृषी धोरणाला अन्न उत्पादन, पर्यावरणीय शाश्वतता आणि सामाजिक- आर्थिक समानता यांच्यात संतुलन साधावे लागते, तिथे हे केंद्र प्रभावी उपाययोजनांना आकार देणारे अनुभवजन्य पुरावे आणि तांत्रिक मार्गदर्शन पुरवते. (लेखक विभागीय कृषी संशोधन केंद्र, सोलापूर येथे सहयोगी संशोधन संचालक आहेत.)

---

## निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेची फळ।।

या संतोक्तीनुसार कोणत्याही कामाचे फळ हे त्याच्या निश्चयावर अवलंबून असते. निश्चय चांगला असेल तर फळ नक्की चांगलेच असते. त्यानुसार कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील बालाजी लक्ष्मण चौगुले यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करत केलेल्या निश्चयातून उद्योजक होण्यापर्यंतची कार्यसिध्दी साधली आहे.

# ध्येयाचा ध्यास लागला की, कामाचा त्रास वाटत नाही

अविनाश गायकवाड
भ्र. ९४२१८७६३४०

खत निर्मिती उद्योगासह बालाजी चौगुले हे महाराष्ट्र राज्य फर्टिलायजर असोसिएशनचे उपाध्यक्ष, ऑल इंडिया फर्टिलायर असोसिएशनचे राज्य सदस्य तर सोलापूर जिल्हा फर्टिईलायजर असो. चे जिल्हा सचिव आहेत. याबरोबरच सोलापूर द्राक्ष बागायदार संघाचे संचालकपद सांभाळत आहेत. त्यामुळे अत्यंत कमी वयातील त्यांची ही झेप सर्वांना थक्क करणारी आहे.


सोलापूर- तुळजापूर रोडवरील उळेपासून तीन किलोमीटरवरील श्रीक्षेत्र कासेगाव येथे महादेवाचे पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे. या पावन नगरीत २ नोव्हेंबर १९७९ रोजी ज्न्म झालेल्या बालाजी चौगुले यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीचा सामना करत एक उत्तुंग यश मिळवले आहे. कासेगाव येथील लक्ष्मण विठोबा चौगुले यांच्या पोटी बालाजीचा जन्म झाला. घरात आई, वडील दोन बहिणी व एक भाऊ. परंपरागत कोरडवाहू शेती. त्यामुळे उत्पन्न जेमतेमच. हातातोंडाची मिळवणी करता करता नाकीनऊ येत. आई व वडील दररोज मजूरी करूनच प्रपंचाचा गाडा चालवत होते. त्यामुळे लहानपणी बालाजीने गरीबीचे चटके अनुभवले. भावंडात मोठा असल्याने कायम जबाबदारीने वागणे आले. त्याचा परिणाम कायम वागण्या बोलण्यात झाला. जेमतेम शेती असल्याने उत्पन्न कमीच होते. त्यामुळे घरात एक आहे तर एक नाही अशी अवस्था. त्या परिस्थितीला तोंड देत त्यांनी गावातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी सोलापूर येथे प्रवेश घेतला. पडेल ते काम करून शिक्षणासाठीचा खर्च भागवणे सुरू झाले. पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीनिमित्त कोल्हापूर गाठले.

एका कृषी व्यवसायाशी निगडीत खाजगी कंपनीमध्ये त्यांना नोकरी मिळाली. येथूनच त्यांच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली. मुळात शेतीचा पिंड व नोकरी कृषी व्यवसायाशी निगडित त्यामुळे अधिक रस घेऊन कंपनीतील उत्पादनाबाबत चिकित्सक वृत्तीने ज्ञान प्राप्त केले. तेथे पडेल ती जबाबदारी स्वीकारली व त्यातूनच चांगला अनुभव आला. याच बळावर त्यांनी व्यवसायाची वाट धरण्याचे ठरवले अन नोकरी सोडून सोलापूर गाठले.

२००१ मध्ये त्यांनी स्वतःच्या व्यवसायाचा श्रीगणेशा केला. शिवशंभू ॲग्रो सीड्स या नावाने खते, बी- बियाणे व कीटकनाशके विक्रीचा व्यवसाय चालू केला. तो करीत असताना त्या व्यवसायामध्ये आलेला अनुभव व सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्याबरोबर इतरांनाही रोजगार मिळावा यासाठी त्यांनी सन २०१० मध्ये महिंद्रा क्रॉप सायन्स या कंपनीची स्थापना केली. या कंपनीमध्ये त्यांनी सुरुवातीला पीक संजीवके व दुय्यम अन्नद्रव्ये मायक्रोन्यूट्रन्स इत्यादी उत्पादन केले. त्यामध्ये त्यांचे अटॅक, मॅक्स डी एफ, बूमफफ्लावर, अपटेक, बॅटरीनाशक, टायगर अशी प्रचलित उत्पादने लोकप्रियतेला आली. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी झाली. त्यातूनच त्यांनी दुय्यम अन्नद्रव्याचा कारखाना २०१७ मध्ये चालू केला. तो धाराशिव जिल्ह्यात तामलवाडी (ता. तुळजापूर) येथे तेरणा व्हॅली फर्टीलायझर अँड केमिकल्स नावाने त्यांनी पत्नी स्वाती बालाजी चौगुले यांच्या नावे हा उद्योग येथे कार्यरत केला आहे. त्यामध्ये बळीराजा, सुपर रिद्धी, सिद्धी पोटॅश, ईगल सुपर, दाणेदार सम्राट ऊस स्पेशल, संपन्न कांदा स्पेशल, सिलिकॉन, मॅक्स फर्ट, बायो फर्ट, रूट फर्ट तसेच ड्रिप सोलोबल खते यामध्ये १९:१९:१९, १२:६१:०, १३:०:४५, ०:५२:३४, ०:०:५०, कॅल्शियम नायट्रेट, अमोनियम सल्टे असे नवनवीन उत्पादने त्यांनी बाजारात आणली. त्याला विशेष लोकप्रियता मिळाली आहे. त्यांची ही उत्पादने महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश येथे वितरित होतात. त्यास शेतकरी चांगला प्रतिसाद देत आहेत.अशा प्रकारे आपल्या कंपनीचा ते विस्तार करीत आहेत. याद्वारे लोकांना रोजगार उपलब्ध करत आहेत. त्यांची ही उत्पादने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत उद्दिष्ट ठेवून केलेल्या आवाहनाला अनुसरून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. ऑरगॅनिक म्हणजेच सेंद्रिय शेतीद्वारे लोकांना विषमुक्त अन्न मिळावे यादृष्टीने ते आपली सर्व उत्पादने ऑरगॅनिक फर्टीलायझर तयार करीत आहेत. सन २०४७ पर्यंत भारत जगातील प्रमुख एकमध्ये गणला जावा यासाठी आपले केंद्रिय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान व राज्याचे माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच विद्यमान कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सेंद्रिय शेतीसाठी प्रबोधनात्मक कार्य अवलंबिले आहे. त्याला अनुसरून बालाजी चौगुले यांनी आपल्या व्यवसायात नवनविन बदल केले आहेत.



ऑरगॅनिक फर्टीलायझर मॅन्युफॅक्चरिंग करून देश हितासाठी पुढे योग्य ती दिशा घेऊन ते कार्यरत आहेत. अशा पद्धतीने त्यांच्या हातून पुढील शेतकरी सेवा व देश सेवा घडो हीच सदिच्छा. त्यांच्या या घोडदौडीत त्यांचे कुटूंबिय विशेषतः पत्नी सौ. स्वाती, मुले, आई श्रीमती मंगलबाई, भाऊ, बहिणी तसेच चौगुले कुटूंबिय व ग्रामस्थांची साथ महत्वाची आहे. (शब्दांकन)



## असाही एक विकासाचा मार्ग

भारत माझा देश आहे, मी भारताचा नागरिक आहे.
याचा आम्हाला अभिमान, सदैव असायला हवा आहे.
हे माझे गाव आहे, माझे त्याच्यावर प्रेम आहे.
ते आदर्श ठेवणे माझे, नागरिक म्हणून कर्तव्य आहे.
स्वच्छता हे सौंदर्याचे, दुसरे नाव आहे.
नगरपालीकेचा जो, कामगार आहे.
तो नित्याचा, पगार घेतो आहे.
रस्ता स्वच्छ करणे, त्याचे आद्य कर्तव्य आहे.
जाणीव असण्याची, अत्यावश्यक गरज आहे.
रस्त्यात ठाई ठाई, उकिरड्यांचे दर्शन आहे.
कुणालाच त्याची, खंत वाटत नाही आहे.
गुटखा तंबाखू खाणे, माझा छंद आहे.
त्यावर पिचकारी मारणे, माझा हक्क आहे.
तो मी जन्मसिद्ध, सदैव बजावणारच आहे.
पाणी पिलेली बाटली, रस्त्यात टाकणार आहे.
कोणत्याही विकासाला, पैसा लागतो आहे.
विकासाच्या जागा जतन, इच्छाशक्तीची गरज आहे.
नाहीतर तो विकास, लगेच भकास होतो आहे.
यासाठी एक उत्तम, उपाय आहे,
स्वतः पिचकारी मारत नाहीत, नेमणूक हवी आहे.
हेल्मेट न घालणाऱ्याला, जसा दंड आहे.
सिग्नल तोडणाराला, जसा दंड आहे.
पिचकारी मारणे, थुंकणे, दंड हे उत्पन्नाचे साधन आहे.
विकासाला भरपूर, पैसा मिळणार आहे.
नागरिकशास्त्राचा धडा, शिकवला जाणार आहे.
नागरिक जेव्हा, सुधारणार आहे.
हाच विकासाचा, पहिला पाया आहे.
पण हे लक्षात, कोण घेतो आहे?

सुनेत्रा पंडित, (मोबा. ८३० ८६३ ७४६५)

# सोलापूर जिल्ह्याचा विकास : दशा व दिशा



महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील सोलापूर जिल्हा हा ऐतिहासिक, औद्योगिक, धार्मिक आणि कृषी क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असलेला जिल्हा आहे. संतांची परंपरा, सिद्धेश्वर मंदिर, अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर, तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिर, वारकरी संप्रदायाचे तीर्थक्षेत्र म्हणून विख्यात असलेले पंढरपूर क्षेत्र, वस्त्रोद्योग, सहकार चळवळ आणि विविध संस्कृतींचा संगम यामुळे सोलापूर जिल्ह्याची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. गेल्या काही दशकांत जिल्ह्याने विकासाची वाटचाल केली असली, तरी दुष्काळ, बेरोजगारी, औद्योगिक मंदी आणि स्थलांतर यांसारख्या समस्याही कायम आहेत. त्यामुळे सोलापूरच्या विकासाची सद्यस्थिती (दशा) आणि भविष्यातील दिशा यांचा विचार करणे आवश्यक ठरते.



## औद्योगिक क्षेत्र



एकेकाळी कापड नगरी म्हणून ओळखला जाणारा सोलापूर जिल्हा आजही चादर, टॉवेल, हातमाग आणि यंत्रमाग उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. एमआयडीसी परिसरात विविध उद्योग कार्यरत आहेत; मात्र अनेक पारंपरिक गिरण्या बंद पडल्याने रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. असे असून सुद्धा अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर आणि सोलापूर येथे येणारे पर्यटन येथील चादरी व टॉवेल खरेदी केल्याशिवाय परतीचा प्रवास करीतच नाहीत. या उद्योगासाठी मनोबल व शासकीय मदतीची गरज अपेक्षित आहे. नुकतेच अक्कलकोट रोड येथे निर्मित पंजवन मार्केट तसेच शहरातील अनेक होलसेल मार्केट परिसरात असलेल्या नागरिकांना आकर्षित करीत आहेत.



सोलापूर शहरात असलेल्या एमआयडीसी मुळे शहराची प्रगती होत आहे, पण त्यासाठी शासनाकडून सोयी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. होटगी रोड येथे नव्याने आयटी पार्क निर्माण होण्याची चर्चा अनेक दिवसापासून आहे. यासाठी सरकारी अधिकाऱ्यांचा सातत्याने पाठपुरावा घेणे अपेक्षित आहे. प्रायव्हेट सिमेंट कंपन्या, एनटीपीसी यांच्यामुळे जिल्हा भरभराटीस येत आहे यात शंका नाही.



प्रा. धन्यकुमार बिराजदार
भ्र. ९४२३३३०७३७



## शिक्षण

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, अभियांत्रिकी, वैद्यकीय, आयुर्वेद, कृषी आणि इतर महाविद्यालयांमुळे उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर– स्वायत्त दर्जा, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर– स्वायत्त महाविद्यालय, संगमेश्वर महाविद्यालय सारख्या महाविद्यालयीन शिक्षण सर्वांना सोईस्कर आहे. याशिवाय जिल्ह्यात अनेक नामांकित कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, शिक्षणशास्त्र, विधी आणि व्यवस्थापन महाविद्यालये कार्यरत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे या भागातील उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र असून अनेक महाविद्यालये त्याच्याशी संलग्न आहेत.

अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयटीआय, नर्सिंग, फार्मसी, कृषी आणि संगणक शिक्षणाच्या संस्था विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देत आहेत. कौशल्य विकास आणि उद्योजकता यांनाही प्रोत्साहन दिले जात आहे. प्राथमिक ते संशोधनपर शिक्षणाच्या सुविधा, ग्रामीण भागातही शिक्षणाचा वाढता प्रसार, मुलींच्या शिक्षणात सातत्याने वाढ, डिजिटल वर्ग, ई– लर्निंग आणि आधुनिक ग्रंथालयांचा विकास, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास व व्यावसायिक शिक्षणावर भर ही येथील महत्त्वाची शैक्षणिक वैशिष्ट्ये म्हणता येईल.

## आरोग्य

सोलापूर हे केवळ औद्योगिक, धार्मिक आणि शैक्षणिक केंद्र नसून आरोग्य सेवांसाठीही महाराष्ट्रात एक विश्वासार्ह ठिकाण म्हणून ओळखले जाते. विशेष म्हणजे पुणे आणि मुंबईसारख्या महानगरांच्या तुलनेत सोलापूरमध्ये अनेक वैद्यकीय उपचार तुलनेने कमी खर्चात उपलब्ध होतात. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव, लातूर, बीड, अहमदनगर तसेच कर्नाटकातील विजयपूर, कलबुर्गी आणि परिसरातील अनेक रुग्ण उपचारासाठी सोलापूरला प्राधान्य देतात. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर, बहुविशेषज्ञ रुग्णालये, वैद्यकीय शिक्षण संस्था आणि तुलनेने परवडणारा उपचार खर्च यांमुळे सोलापूरने आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विशेष स्थान निर्माण केले आहे.



सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय, दंतवैद्यकीय, नर्सिंग, आयुर्वेद, होमिओपॅथी, फिजिओ–थेरपी आणि औषधनिर्माण शिक्षणाच्या संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमुळे प्रशिक्षित डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी तयार होत असून जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळत आहे.





## पर्यटन

सिद्धेश्वर मंदिर, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर, पंढरपूरचे विठ्ठल–रुक्मिणी मंदिर, नान्नज पक्षी अभयारण्य, बार्शीतील भगवंत मंदिर आदी धार्मिक व पर्यटनस्थळांमुळे पर्यटनाला मोठी संधी आहे. सोलापुरातील विमानतळ हा कायम चर्चेचा विषय असतो राजकीय इच्छाशक्तीचा अभाव याला एक कारणीभूत असे म्हणता येईल. प्रशासन व राजकारण यांच्यात सामंजस्य असल्यास पर्यटनाचा विकास लवकर होईल.

बोरामणी येथे असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राखीव जागेची चर्चा निवडणुकीपुरता होते, अन्यवेळी त्याचा विचार का होत नाही, हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. सोलापूर मुंबई, सोलापूर गोवा याशिवाय सोलापूर तिरूपती, सोलापूर बेंगलोर विमान सेवेची गरज वाढत आहे. या गरजा पूर्ण केल्यास सोलापूर जिल्हा भरभराटीस येईल.










सोलापूर जिल्ह्याचा चढता आलेखाचा विचार करत असताना इथल्या प्रमुख आव्हानांचा सुद्धा विचार करणे अपेक्षित आहे. वारंवार पडणारा दुष्काळ, बेरोजगारी आणि युवकांचे स्थलांतर, पारंपरिक उद्योगांची घट, पाणीटंचाई, शेतीवरील वाढता खर्च, ग्रामीण भागातील अपुऱ्या पायाभूत सुविधा,प्रदूषण आणि पर्यावरणीय समस्या या गोष्टी दुर्लक्ष करून जिल्ह्याचा विकास शक्य नाही.

**सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरतील–**

जलसंधारण व पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, कृषी प्रक्रिया उद्योग उभारून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन युवकांना रोजगारक्षम बनविणे, सौर ऊर्जा व हरित ऊर्जा प्रकल्प वाढविणे, पर्यटन विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे, स्मार्ट सिटी व डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणे, महिला बचतगट व उद्योजकता यांना आर्थिक सहाय्य देणे, शिक्षण, संशोधन व नवोपक्रम यांना चालना देणे, पर्यावरण संरक्षण आणि वृक्षारोपण यावर भर देणे. यामुळे सोलापूर सिंगापूर होईल यात शंका नाही.



## सोलापूरचे कृषी क्षेत्र



सोलापूर जिल्हा प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, डाळिंब, द्राक्षे आणि ऊस ही प्रमुख पिके घेतली जातात.

उजनी धरण, भीमा व सीना नदीच्या पाण्यामुळे काही भागात सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली असली, तरी बहुतांश भाग अजूनही दुष्काळग्रस्त आहे. डाळिंबाचे वाढते उत्पन्न जिल्ह्यासाठी गौरवास्पद आहे. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सर्वांना यासाठी आकर्षित करत आहे. काळी सुपीक जमीन असलेल्या या जिल्ह्यात पाऊस कमी पडतो, तरी साखर कारखाने सर्वाधिक आहेत. यामागे अनेक भौगोलिक, आर्थिक आणि राजकीय कारणे आहेत.

उजनी धरण आणि कालव्यांचे जाळे– सोलापूरमध्ये स्थानिक पाऊस कमी असला तरी भीमा नदीवरील उजनी धरण आणि त्याच्या डावा–उजवा कालव्यांमुळे माढा, माळशिरस, पंढरपूर, मोहोळ आदी भागांत मोठ्या प्रमाणावर सिंचन उपलब्ध झाले. त्यामुळे ऊस लागवड शक्य झाली. १९६० नंतर महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या चळवळीचा सोलापूरमध्ये मोठा विस्तार झाला. कारखान्यांनी शेतकऱ्यांना कर्ज, बियाणे, खत, तांत्रिक मार्गदर्शन आणि हमी बाजार उपलब्ध करून दिला. त्यामुळे ऊस लागवड वाढली. अनेक सहकारी साखर कारखाने स्थानिक राजकीय नेतृत्वाशी जोडले गेल्याने कारखान्यांची संख्या वाढत गेली आणि सिंचन प्रकल्पांनाही चालना मिळाली.

ज्वारीसाठी प्रसिद्ध असलेला हा जिल्हा डिसेंबर ते मार्चपर्यंत हुरडा पार्टीसाठी नावलौकिक मिळवत आहे. याचाच एक भाग असा आहे की, जिल्ह्यातील ज्वारी आणि बाजरीच्या भाकऱ्या व शेंगा चटणीचे परदेशात निर्यात कृषी व्यवसायाला चालना देत आहेत. नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर केल्यास कृषी क्षेत्राची अजून भरभराट होईल यात शंका नाही.





## तरुण भारत वर्धापनदिनाच्या शुभेच्छा

मास्टर्स क्रिकेट अॅकडमी, सोलापूर
पाटील पेट्रोल पंपच्या बाजूला, प्रियंका चौक, भवानी पेठ सोलापूर.
– प्रशिक्षक –
राजेश येमुल, दत्तात्रय बडगू, राजवर्धन जिल्ला
– प्रशिक्षणाची वेळ –
सकाळी 6.30 ते 8.30 व दुपारी 4.30 ते 6.30 पर्यंत
संपर्क : 8275207738/7058477340

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक यांच्यातर्फे दैनिक तरुण भारतच्या ४२व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिरासाठी संपर्क ९४२३३३७३४६

दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
के. डी. पाटील – अध्यक्ष
साकिब शेख – सचिव
शुभेच्छुक
## सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन
के. डी. पाटील – अध्यक्ष
साकिब शेख – सचिव
मनोज यलगुलवार – उपाध्यक्ष
दिनेश सारंगी – खजिनदार
नावेद मुन्शी – सहसचिव
कार्यकारणी सदस्य
रंजीता चाकोते, मुकीम खान, डॉ. बकुल जहागिरदार, डॉ. वल्जा घुमे, अभिजीत टाकळीकर, ताबीश जमाल.

## युटोपियन शुगर्स लि.
UTOPIAN SUGARS LTD.
पंतनगर, कचरेवाडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर.
कर्मयोगी – श्रद्धेय कै. सुधाकरपंत परिचारक
दैनिक
# तरुण भारत
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



|| कर्मयोगी ||
स्व.सुधाकरपंत परिचारक (मालक)
मा.आ.प्रशांतराव परिचारक (मालक) चेअरमन
कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर
सोलापूर 'तरुण भारत' वर्धापनदिन चिरायु होवो..!
मा.विजय अंगद जाधव
संचालक : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

सोलापूर तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
-: शुभेच्छुक :-
अॅड.मिलींद थोबडे – मा.अध्यक्ष तथा विद्यमान सदस्य बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा
अॅड. रितेश थोबडे – उच्च न्यायालय मुंबई

श्री पांडुरंग प्रतिष्ठान पंढरपूर, संचलित
# कर्मयोगी
## ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस, पंढरपूर
|| कर्मयोगी || स्व.सुधाकरपंत परिचारक



- कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंजिनिअरिंग) पंढरपूर.
- कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) पंढरपूर.
- कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी पंढरपूर.
- कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (पदवी व पदविका) पंढरपूर.
- कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (बीएससी व जीएनएम) पंढरपूर.
- कर्मयोगी विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालय पंढरपूर.
- कर्मयोगी पब्लिक स्कूल (सीबीएसई) पंढरपूर.
- कर्मयोगी विद्यानिकेतन स्कूल (सेमी इंग्लिश) पंढरपूर.

तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
www.karmayogicollege.ac.in +91 8554006300

## लोकमंगल पतसंस्था
अखंड गतीतून सार्थकता
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर
मा.आ.श्री.सुभाष (बापू) देशमुख – संस्थापक अध्यक्ष - लोकमंगल समूह
महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र एकूण ७५ शाखेत कार्यरत
२५ शाखा स्व:मालकीच्या जागेत कार्यरत
ठेवीवर १०%* व्याजदर
८४ महिने दामदुप्पट
सभासदांना सर्वाधिक लाभांश
सोने तारण कर्ज व लॉकर्सची सोय.
३००० कोटी व्यवसायपूर्ती
सर्व प्रकारची कर्जे तात्काळ उपलब्ध

तुमच्या स्वप्नातील वाहन आता तुमचे होणार...
### वाहन कर्ज
आता सहज उपलब्ध!
दुचाकी कर्ज
चारचाकी कर्ज
इतर वाहन कर्ज
- कोटेशनच्या ७५% पर्यंत कर्ज
- कालावधी ३ ते ७ वर्षे
- दुचाकी, चारचाकी व इतर वाहन खरेदीसाठी त्वरित कर्ज उपलब्ध
- सुलभ हप्ते, कमी व्याजदर

### महिला सन्मान आवर्तक ठेव योजना
दरमहा रू. १००/- ते रू. ५०,०००/- पर्यंत खाते उघडता येईल.
कालावधी (मुदत) २४ महिने राहिल.
पहिला हफ्ता हा संस्था भरेल.
नियम व अटी लागू*

• चेअरमन • श्री. तेली गुरण्णा अप्पाराव
• व्हा.चेअरमन • सौ. कुंभार निर्मला भागवत
• कार्यकारी संचालक • श्री. देशमुख मनीष सुभाष
• सरव्यवस्थापिका • सौ. देवडकर अलका नितीन
* समस्त संचालक मंडळ *
प्रधान कार्यालय : ९४/२९, मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर.
मो. ९८२३१५४५६९, ९९२३४०४६७६
Email: lokmangalpathho@gmail.com
lokmangalpatsanstha
अधिक माहितीसाठी आमच्या जवळच्या शाखेस संपर्क करा.

सोलापूर तरुण भारत


शनिवार, ०८ ऑगस्ट २०२६



## ज्येष्ठ विधिज्ञ

# ॲड. राम नागेश देशपांडे अभिष्टचिंतन विशेषांक






**।। प्रकाशन समारंभ ।।**

**आज शनिवार,**
**दिनांक ८ ऑगस्ट २०२६**

**✻ वेळ ✻**
**सायं. ६.३० वा.**

**✻ स्थळ ✻**
**'शिवस्मारक' सभागृह नवी पेठ, सोलापूर.**

> “ तरुण भारत सोलापूरला सुरू होतोय याचाच सर्वांना आनंद झाला. ठरल्याप्रमाणे मीटिंगमध्ये सोलापूर जनता बँकेच्या चेअरमन साहेबांनी तरुण भारतचा अर्ज काढला. त्याबद्दल ते काही बोलणार तोच सगळ्या १२ जणांनी त्यास मंजुरी दिली... अशा प्रकारे तरुण भारतचं घोडं एकदा गंगेत न्हालं. ”

# मी आणि सोलापूर तरुण भारत

माननीय मोरोपंत पिंगळे यांच्या डोक्यात मराठवाड्याशी संपर्क करता यावा म्हणून सोलापूरला तरुण भारतची शाखा सुरू करावी असा विचार आला. प्रांत कार्यवाह श्री वसंतराव भिडे माझ्याशी याबाबत बोलून गेले होते. सोलापूरला श्री भालजी दाते हे एक छापखाना चालवत होते. आनंदराव भागवत हे त्यावेळी जिल्हा प्रचारक होते. भागवतांबरोबर बोलताना दातेंनी हा छापखाना मला संघाला द्यायचा आहेअसा सहज विचार मांडला. तरुण भारतची उभारणी करण्याचा विचार चालू असतानाच आनंदरावांनी मोरोपंत पिंगळेंना भालजी दात्यांचा हा विचार सांगितला. त्यावर मोरोपंत पिंगळे म्हणाले,यासाठी मी सोलापूरला चक्कर टाकेन.

वसंतरावांनी भिडेंनी माझ्यासमक्ष तरुण भारतचा विषय काढला तेंव्हा मी त्यांना भालजी दात्यांचा हा किस्सा सांगितला नाही. सोलापूरला तरुण भारत सुरू करण्याचा विचार शहरातल्या दोन मोठ्या संघ अधिकाऱ्यांना पसंत नव्हता. पसंत नव्हता म्हणजे त्यांचंही काही म्हणणं होतं. सगळ्याच प्रकल्पांना सगळ्यांचाच पाठींबा असतो असे नाही. काही बाबतीत विरोध हा होणारच. तरुण भारत चालवणं ही साधी गोष्ट नाही. मी त्यात पैसे गुंतवावेत आणि शून्य प्राप्ती मिळवावी अशी त्यांची कल्पना होती. ते दोन्ही अधिकारी शिवस्मारक या संघचलित संस्थेचे पदाधिकारी होते. त्या संस्थेकडे बऱ्यापैकी निधी उपलब्ध होता. आपण तरुण भारत काढला तर हा पैसा आपल्याला तिकडे वापरावा लागेल अशी भीती त्यांना वाटत होती.

सोलापूरला तरुण भारत सुरू करण्याच्या कल्पनेस जिल्हा संघचालक मा. दादा शेळगीकरांचा पूर्ण पाठिंबा होता. पण या एकूण वातावरणामुळे या संस्थेच्या कामात कोणा संघ कार्यकर्त्यांचं सहकार्य घेणं मोठं अवघड होऊन बसलं. प्रमुख संघ अधिकाऱ्यांचा विरोध असताना कुणी यासाठी तयारही झाले नसते. म्हणून मी आणि दादांनी संघ परिवाराबद्दल आदर असणाऱ्या काही लोकांना यासाठी तयार करावं असा आम्ही विचार केला. त्या कल्पनेतूनच इंजिनियर हरिभाऊ गोडबोले, हॉटेल मालक बाबुराव खंडाळकर, पाईप बनविणारे डॉ. चंकेश्वर आदी मंडळींची भेट घेऊन त्यांच्यासह एक संस्था स्थापन करायची असं ठरवलं. हे सगळं घडत असताना याला विरोधकरणाऱ्या एका अधिकाऱ्याने मा. मोरोपंत पिंगळे याना कळवलं की राम देशपांडे सोलापूरला तरुण भारत काढायचा प्रयत्न करत आहेत. पण त्याला एवढं प्रचंड काम जमणार नाही. तुम्ही त्याच्यावर विसंबून राहू नका. मा. मोरोपंत पिंगळे यांनी वसंतराव भिड्यांना याबाबत चौकशी करण्याकरता सोलापूरला पाठविले.

वसंतराव भिडे सोलापूरला आले. त्यांना या नवीन मंडळींचा मी परिचय करून दिला. मी आणि शेळगीकर दादांनी असं ठरवलं होतं की, प्रत्येकाकडून पाच हजार रुपये डिपॉझिट स्वरुपात घ्यायचं आणि त्याला जनता बँकेची गॅरंटी द्यायची. वसंतरावांनाही ही योजना सांगितली. संघ परिवारातील एका धनिक व्यक्तीकडं आम्ही डिपॉझिट मागायला गेलो. त्यांनी मानभावीपणे आपल्या बंधूना विचारलं अरे, हे तरुण भारतवाले आपल्याकडे डिपॉझिट मागायला आले आहेत. आपण देऊ शकतो का ? त्या भावानं आतातरी ते शक्य नाही, असं सांगितलं. हे ऐकून थोडी निराशा झाली.

पुढच्याच आठवड्यात आम्ही बार्शीचा दौरा केला. तरुण भारतच्या प्रकल्पाला विरोध करणारे 'ते' दोन अधिकारी आणि आणखी एकजण आमच्याबरोबर बार्शीला आले. त्यांचा बार्शीत मोठा प्रभाव होता. बार्शीत एकूण ९० व्यापाऱ्यांनी पाच हजार रुपयांचं डिपॉझिट त्याच दिवशी दिलं. इतर ११ जणांनी दोन-तीन दिवसात चेक पाठविण्याचं कबूल केलं. एकाच प्रवासात एक लाख रुपयांची निश्चिती झाल्याने आमचा उत्साह वाढला. या वसुलीची बातमी दुसऱ्या अधिकाऱ्याला समजली. तेव्हा मला का नाही बोलावलं अशी मा. दादा शेळगीकरांकडे त्यांनी तक्रार केली. दोन-तीन दिवसात आम्ही अकलूज व माळीनगरचा दौरा केला. तेथील मॅनेजिंग डायरेक्टरने आमचे चांगले स्वागत केले. एक चांगले वृत्तपत्र तुम्ही काढताय असं म्हणत त्यांनी आमचे अभिनंदन केले. इतकंच नव्हे तर स्वतःचे अडीच हजार आणि पत्नीच्या नावे अडीच हजार असे पाच हजार रुपये दिले.

थेंबे थेंबे तळे साचे म्हणतात तसे हळूहळू सहा लाख रुपयांपर्यंत आमची मजल पोहोचली. तोपर्यंत आम्ही अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीत दोन शेड्स घ्यायचं ठरवलं. त्यासाठीच एकूण सहा लाख रुपये भरावे लागणार होते. पण सुरुवातीला पस्तीस हजार भरून शेड्स ताब्यात मिळणार होत्या. या धावपळीत असताना विरोध करणारे दुसऱ्या अधिकाऱ्याने भलताच उत्साह दाखवला. शहरातील होटगी रोड सहकारी औद्योगिक सोसायटीच्या ताब्यात असलेली, २०-२५ वर्षे पडून असलेली जागा तीन लाख ३५ हजार रुपयांना आम्हाला न विचारताच ताब्यात सुद्धा घेतली. जनता बँकेचं जे २० लाख रुपयांचं कर्ज आम्ही घेणार होतो ते त्यांच्याच प्रभावामुळे मिळणार होतं, म्हणून आम्ही गप्प राहिलो.

या दरम्यान बँकेचे मॅनेजर श्री उद्धवराव कुलकर्णी यांनी नऊ जणांकडून पाच हजारप्रमाणे एकूण ४५ हजार रुपये डिपॉझिट जमा केले. त्यांनी मला स्पष्टपणे सांगितलं की तरुण भारतचा स्वतःचा काही फंड नाही. त्यामुळे त्यांचे कर्ज मंजूर करता येणार नाही, तरीपण मी तुमच्या अर्जावर मंजुरीची शिफारस करून पुढच्या आठवड्याच्या मीटिंगमध्ये अर्ज ठेवणार आहे. त्यापुढे काय करायचं ते तुम्ही ठरवा. जवळजवळ एक आठवडा माझ्या हातात होता. मी बँकेच्या १२ संचालकांच्या भेटी घेतल्या. प्रत्येकाशी तास, दीड तास चर्चा करून आतापर्यंत झालेल्या कामाचा तपशील सांगितला.

तरुण भारत सोलापूरला सुरू होतोय याचाच सर्वांना आनंद झाला. ठरल्याप्रमाणे मीटिंगमध्ये चेअरमन साहेबांनी तरुण भारतचा अर्ज काढला. त्याबद्दल ते काही बोलणार तोच सगळ्या १२ जणांनी त्यास मंजुरी दिली... अशा प्रकारे तरुण भारतचं घोडं एकदा गंगेत न्हालं.

दरम्यान, जागेचे मालक दत्ता सुरवसे यांना जाऊन भेटलो. थोड्याच दिवसात आम्ही तुमच्या पैशाची व्यवस्था करतो. तोवर जरा थांबा अशी विनंती केली. दत्ता सुरवसे म्हणाले, मी कुठे तुम्हाला घाई करतोय. पैसे सावकाश द्या. बरीच वर्षे पडून राहिलेल्या जागेचा तुम्ही उद्धार केला, याचा मला आनंद आहे. आणखी काही मदत लागली तर मोकळेपणाने सांगा. सुनील शेळगीकर वकिल माझा मित्र तुमच्या संचालक मंडळात आहे. मग कशाला चिंता करताय.. हा केवढा मोठा दिलासा होता आमच्यासाठी..

ठरल्याप्रमाणे तरुण भारतचे प्रकाशन झाले. एव्हाना सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवक तरुण भारतची वाटच बघत होते. अंक पाहिल्यानंतर पुणे तरुण भारतपेक्षा चांगली छपाई, अंकातील मांडणी बघून सर्वजण खूष झाले. अंकाचे व्यवस्थापनही मार्गी लागले. अनेक वर्षे पुणे तरुण भारताची विक्री करणारे पंढरपूरचे ज्येष्ठ स्वयंसेवक श्री रामभाऊ जोशी माझ्या विनंतीला मान देऊन सोलापूर तरुण भारतचे एक महत्वाचे अधिकारी म्हणून काम करू लागले. रामभाऊ आल्यामुळे माझ्यावरचा ताण मोठ्या प्रमाणात कमी झाला. मला संघ परिवाराच्या कामात लक्ष घालायला वेळ मिळाला.

> कर्ज मंजूर झाल्यानंतर उभारणीच्या कामाला आम्ही लागलो. सुरुवातीला पुणे तरुण भारतला रोज अहवाल पाठवावयाचा होता. ज्या मशिन्स पुण्याहून आणल्या होत्या त्याकरिता हवी ती वातानुकूलित खोली तयार केली. त्यामध्ये फरशी घालून त्यावर मॅटिंग घातले. जवळजवळ सव्वा महिना ही सगळी उभारणी चालू होती. रोजचा अहवाल पुणे कार्यालयाला पाठविण्यात येत होता. सगळ्या व्यवस्था पूर्ण झाल्यावर प्रकाशनाची अंतिम तारीख तरुण भारतचे प्रमुख बाबुराव कार्णेना कळविली. जवळजवळ आठ दिवसांनी ते आले. मशीनची खोली पाहिली. ती पाहताच संतापूनच त्यांनी सांगितलं, साधी फरशी, मॅटिंग या मशीनला चालत नाही. खाली संगमरवरी फरशी घाला. झालं... इकडे कर्जाचे २० लाख रुपये खात्यावर जमा होऊन त्याचं व्याज सुरू झालं...

> सुप्रभात हॉटेलचे मालक श्री बाबुराव खंडाळकर यांच्याकडे गेलो. त्यांनी गल्ल्याचा ड्रॉवर उघडला. त्यातल्या नोटा मोजल्या. तीस हजार रुपयांपर्यंत होत्या. नोटा मोजल्यावर त्यांनी आम्हाला विचारले, आता एवढे पैसे चालतील का ? आमचा आनंद मनात मावेना. मी आणि दादांनी त्यांचे आभार मानले व त्यांनी दिलेलं सुगंधी दूध घेऊन त्यांचा निरोप घेतला.

आतापर्यंतच्या एकूण सगळ्या घटनांचा विचार करता हे काम संघ कार्यकर्त्यांच्या ताकदीबाहेरचे आहे हे लक्षात आले... न्यूजपेपर चालवणं हे व्यावहारिकदृष्टीने करावं लागणारे काम आहे. संघाची कार्यपद्धती व वृत्तपत्र व्यवसाय यात मोठे अंतर आहे, हे लक्षात आलं. सोलापूरनंतर संभाजीनगर (तेंव्हाचे औरंगाबाद) आणि मुंबई येथेही तरुण भारतचे प्रकाशन सुरू झाले. ही दोन्ही ठिकाणे आर्थिकदृष्ट्या प्रबळ असल्यामुळे त्यांना आमच्यासारख्या आर्थिक अडचणी आल्या नाहीत. पण इतर व्यवस्थापनात ते कमी पडल्यामुळे कालांतराने दोन्ही ठिकाणचे प्रकाशन बंद झाले.

जनता बँकेचे सहकार्य चालू असल्यामुळे सुरुवातीला चार-पाच वर्षे आम्हाला त्रास झाला नाही. पण जाहिरातींची प्रचंड थकबाकी, कागद खरेदीचा व्यवहार त्यामुळे आमची बरीच फजिती झाली. जनता बँकेला सुद्धा आम्हाला सहकार्य करणे जमले नाही. एक-दोन ठिकाणाहून आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न केला, व्यवस्थापनातही काही बदल केले, हरिभाऊ गोडबोलेंनी संस्थेचे अध्यक्ष म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. कालांतराने सोलापूर तरुण भारत सुरळीत चालू लागले. आर्थिकदृष्ट्या फार सक्षम झाले असे नाही. पण नियमितता आली.

अगदी अलिकडे म्हणजे गेल्या १०-१५ वर्षात दिलीप पेठेंनी तरुण भारतचा व्याप सांभाळण्यासाठी जबाबदारी स्वीकारली. दुसऱ्या बँकेचे आर्थिक साहाय्य घेतले. संस्थेच्या व्यवस्थापनातही महत्वपूर्ण बदल केला व पेपर बंद पडू न देता अतिशय जोमाने चालू लागला.

संघाची अखिल भारतीय वृत्तपत्रविषयात लक्ष घालणारी जी संस्था आहे, त्यातही दिलीप पेठेंना मान मिळाला. वृत्तपत्र विभागातील एक जाणकार कार्यकर्ता म्हणून संघाच्या अखिल भारतीय यंत्रणेत त्याला जबाबदारीचे स्थान मिळाले. अशा प्रकारे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र विभागात एक जबाबदार वृत्तपत्र म्हणून सोलापूर तरुण भारतला मान आहे.

स्व. यशवंतराव पेठे यांनी सुरुवातीला तरुण भारत विक्रेता म्हणून आणि नंतर सोलापूर तरुण भारतच्या व्यवस्थापनातही खूप काम केलं. आपल्या कर्तृत्ववान मुलाच्या हाती सर्व व्यवस्थापन देऊन तरुण भारत सुरक्षित केला. आता दिलीप पेठेचा मुलगा ॲड. चैतन्य हा वडिलांना व्यवस्थापनात चांगली मदत करत आहे. सोलापूर संघ परिवारात तरुण भारताला मानाचे स्थान आहे. हे स्थान मिळविण्या करिता स्व. श्रीपाद लिमये यांनी खूप परिश्रम घेतले. तरुण भारतमध्ये त्यांनी यावं म्हणून सलग तीन वर्षे मी त्यांचा पाठपुरावा केला. अनेकांच्या आग्रहामुळे सोलापूर सूत गिरणीनंतर त्याना वळसंगच्या सूत गिरणीत काम करावं लागले.

तिथून ते तरुण भारतकडे येणार इतक्यात त्यांच्यावर मोठा दबाव आला आणि त्यांना लातूरला एक वर्ष जावं लागलं. नंतर मात्र कोणाच्याही दबावाला न घाबरता ते तरुण भारतमध्ये सामील झाले. तरुण भारतची आर्थिक घडी नीट करण्याकरिता त्यांनी खूप परिश्रम घेतले. अध्यक्ष असलेल्या हरिभाऊ गोडबोलेंनी त्यांना मोलाचे सहकार्य केले.

**- राम नागेश देशपांडे**

# ... सोलापूर जनता बँक सुरु झाली!

> “ कुणाच्या घरचे टेबल्स, कुणाच्या घरच्या खुर्च्या, कोणाची घरची कपाटे असं सगळं साहित्य जमवून बँकेच्या कार्याचा शुभारंभ केला. या मंडळींनी संघाच्या तरुण कार्यकर्त्यांकडून शेअर्स गोळा केले. याकामात माझाही सहभाग होता. शहरातील वेगवेगळ्या भागातून शेअर्स गोळा करण्यात आले. संघाच्या कार्यकर्त्यांना हे क्षेत्र नवीन होतं. ”

संघ, शाखा, संपर्क या कामाशिवाय समाजजीवनातील आर्थिक, औद्योगिक समस्याही आपल्याच असतात. त्याही सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. या विचारातूनच सोलापुरात नागरी अर्बन सहकारी बँक सुरू करण्याची कल्पना पुढे आली. संघ विचार जीवनाच्या सर्व क्षेत्रात पोहोचला पाहिजे. मग आर्थिक, सहकारक्षेत्रातही तो पोहोचला पाहिजे. याच विचाराने पुणे जनता सहकारी बँक आणि सांगली अर्बन को-ऑप. बँक या बँका संघ विचारातून, प्रयत्नातून सुरू झाल्या होत्या. सांगलीचे संघचालक श्री गोडबोले वकील यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू होते.

आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचार कमी व्हावा, सहकारचळवळ अधिक बळकट व्हावी या विचारातून अनेक सहकारी संस्था, दूधसंस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या.

सोलापूर शहरातही विभाग प्रचारकांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जनता सहकारी बँक सुरू झाली. डॉ. प. गो. वळसंगकर, गोवर्धन भुतडा, बाबुराव बसवंती, धुंडिराजशास्त्री दाते, चंद्रकांत जक्कल, बसाप्पा कुलकर्णी, दगडुबा भागवत या सर्व मंडळींनी एकत्र येऊन या बँकेचे कार्य सुरू केले. कुणाच्या घरचे टेबल्स, कुणाच्या घरच्या खुर्च्या, कोणाची घरची कपाटे असं सगळं साहित्य जमवून बँकेच्या कार्याचा शुभारंभ केला. या मंडळींनी संघाच्या तरुण कार्यकर्त्यांकडून शेअर्स गोळा केले. याकामात माझाही सहभाग होता. शहरातील वेगवेगळ्या भागातून शेअर्स गोळा करण्यात आले. संघाच्या कार्यकर्त्यांना हे क्षेत्र नवीन होतं. बार्शीचे श्री उद्धवराव कुलकर्णी एका सहकारी बँकेत अधिकारी म्हणून काम करत होते. त्यांना राजीनामा द्यायला लावून जनता बँकेत मॅनेजर म्हणून नियुक्त करण्यात आले.

सोलापूर जनता बँकेचे एक ज्येष्ठ संचालक दगडूबा भागवत यांचे निधन झाले. त्यांच्या जागी संचालक म्हणून मला काम करण्यास सांगितले. मला माणसांचा हिशोब जमतो. पैशांचा हिशोब जमत नाही. म्हणून मी सुरुवातीला नकार दिला.

पण मला सांगण्यात आले की, तोच पैशांचा हिशोब तुला जमावा म्हणून हे काम करावयाचे आहे. आता काय... संघात जे सांगेल ते करावंच लागतं. झालो संचालक. संचालक झाल्यावर शहरातल्या बँकेच्या शाखांची स्वछता आणि दुरुस्ती याकडे मी लक्ष दिले. नवीन खातेदार मिळविणे, त्यांना कर्जे मिळवून देणे या गोष्टीकडे लक्ष द्यायला मला वेळच मिळाला नाही.

मी ज़िल्हा कार्यवाह असताना संघ परिवाराच्या बाहेरील एका व्यक्तीला चेअरमन करण्याचा माझा मानस आणि पुढाकार होता. पण त्या व्यक्तीचा चेअरमन म्हणून व्यवहार बँकेच्या हिताला मारक ठरला. सर्व कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्याबद्दल चीड निर्माण झाली. बँकेची स्थापना करताना विभाग प्रचारक श्री सुरेशराव केतकरांचं मोठं योगदान होतं. बँकेच्या समस्यांमध्ये त्यांचं मार्गदर्शन महत्वाचं होतं. सुरेशरावांशी बोलणं झाल्यानंतर त्या व्यक्तीला चेअरमन पदावरून मुक्त करावं लागलं. त्यामुळे त्यांच्या मनात माझ्याविषयी विलक्षण राग होता.

त्या काळात डॉ. भैय्यासाहेब वळसंगकर हे पाच्छापेठ शाखेचे पालक होते. त्यांची तब्येत बरी नव्हती. तशाही स्थितीत ते काम पाहत होते. त्यांनी संचालक मंडळाच्या बैठकीत तक्रार केली की पाच्छापेठ शाखेत चेक्स वेळेवर क्लिअरिंगला जात नाहीत. हे कळल्यावर दोन-तीन दिवसांनी मी पाच्छापेठ शाखेत गेलो. माहिती घेतली. शाखेच्या चार मोठ्या खात्यांबद्दल अशी तक्रार आहे असं मी सांगितलं. संचालकांच्या एक-दोन बैठकीत मी या मुद्द्यावर तक्रार केली. पण इतर संचालकांनी ते मनावर घेतले नाही.

नंतर संचालकांच्या एका बैठकीत या प्रकरणाची चौकशी करावी असे मी लेखी पात्र दिले. मग मात्र त्याचं गांभीर्य वाढलं. त्याच बैठकीत सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली. पंधरा दिवसांमध्ये संबंधित प्रकरणाची चौकशी करून सविस्तर अहवाल संचालक मंडळासमोर आला. आपण नेमलेला चौकशी अधिकारी हा संबंधित शाखाप्रमुखाचा जवळचा मित्र असल्याचे मला समजले. पुढच्या संचालकांच्या बैठकीत तो विषय मी मांडला. चौकशी अधिकारी बदलावा असे सुचविले. त्यावर दोन-तीन संचालक माझ्यावर चिडले. नवीन चौकशी अधिकारी कोणाला नेमावा हे रामभाऊंनीच सुचवावे, अशी त्यांनी भूमिका घेतली. त्याप्रमाणे मी लगेच संघाचे एक ज्येष्ठ स्वयंसेवक श्री धामणकर वकील यांचे नाव सुचविले. सर्व संचालकांनी त्या नावास मान्यता दिली.




> सोलापूर जनता बँकेचे एक ज्येष्ठ संचालक दगडूबा भागवत यांचे निधन झाले. त्यांच्या जागी संचालक म्हणून मला काम करण्यास सांगितले. मला माणसांचा हिशोब जमतो. पैशांचा हिशोब जमत नाही. म्हणून मी सुरुवातीला नकार दिला. पण मला सांगण्यात आले की, तोच पैशांचा हिशोब तुला जमावा म्हणून हे काम करावयाचे आहे. आता काय... संघात जे सांगेल ते करावंच लागतं... झालो संचालक!

यथावकाश पुणे येथील जॉईंट रजिस्ट्रार यांच्यासमोर केस चालली. आवश्यक ते साक्षी पुरावे झाले. त्यात एक गोष्ट लक्षात आली की, बँकेच्या जनरल मॅनेजरला या सगळ्या गोष्टीची कल्पना होती. त्यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यासाठी पाच वेळा मेमो लिहून ठेवले पण ते संबंधित अधिकाऱ्याला दिले नाहीत. शिवाय.. संचालक मंडळाला या प्रकरणाची माहिती दिली नाही.

या प्रकरणाचा निकाल देताना जॉईंट रजिस्ट्रारने असे नमूद केले की शाखाधिकारी या प्रकरणात दोषी आहेतच पण जनरल मॅनेजर यांनी फार मोठा गुन्हा केला आहे. म्हणून त्यांना कामावरून काढून शाखाधिकाऱ्यावर नियमानुसार कारवाई करावी.

हे प्रकरण चालत असताना दोन-तीन संचालक उपरोधिकपणे म्हणाले, रामभाऊ बँक चालविणे हे शाखा चालविण्यासारखे सोपे नसते. हे प्रकरण चालत असताना खातेदाराने आपले डिपॉझिट परत मागण्याचा धोका होता. त्यावर मी त्यांना म्हणालो, आता आपल्याकडे १०० कोटींचेच डिपॉझिट्स आहेत, त्याऐवजी ५०० कोटींचे डिपॉझिट्स असते तर खातेदाराने बँकेला कुलूप लावले असते... अशा प्रकारे बँक मोठ्या संकटातून वाचली होती. पण त्या धाडसाचे बक्षीसही मला मिळाले.

पुढच्या निवडणुकीच्या वेळेला मी आणि आमदार लिंगराज वल्ल्याळ याना संचालक मंडळात घ्यायचे नाही असा आग्रह या लोकांनी धरला. या गोष्टीमुळे भाजपामध्ये मोठी खळबळ मजली. वल्ल्याळांचें १६ नगरसेवक मित्र आपल्या पदाचा राजीनामा द्यायला निघाले. त्या सर्वांची मी समजूत काढली. येत्या निवडणुकीत आपण आपले पॅनल उभं करू आणि वल्ल्याळांच्या ३-४ मित्रांना निवडून आणू. अशी खात्री त्या नगरसेवकांना दिली. तेंव्हा त्यांनी राजीनामा देण्याचा विचार सोडून दिला.

हा सगळा उद्रेक थांबविण्याकरिता मला स्वतंत्र पॅनेल उभं करावं लागलं. स्वतंत्र पॅनेल उभं करण्याचा माझा विचार स्व. शेळगीकर दादांना फारसा पटला नव्हता. पण असा निर्णय मला का घ्यावा लागला याची त्यांना चांगली जाणीव होती. पॅनल ठरविण्यासाठी आम्ही हरिभाऊ गोडबोले यांच्या घरी एक बैठक आयोजित केली. बैठकीच्या आदल्या दिवशी मी दादा आणि लक्ष्मीपती दासरी दोघांनाही सांगितले की, तुम्ही संघाचे अधिकारी आहात.तुम्ही हरिभाऊ गोडबोल्यांच्या घरी होणाऱ्या आमच्या बैठकीला येऊ नका.

दुसरे दिवशी मी बैठकीसाठी तिथे पोहोचलो. मी येऊन पाहतो तर दोघेही माझ्याअगोदर बैठकीला उपस्थित होते. बैठकीला सुरुवात झाल्यावर प्रास्ताविकात हे पॅनल उभे करण्याची गरज का भासली याचे विवेचन मी केले. माझ्या संचालकपदापेक्षा वल्याळांना डावललं याचं मला दुःख होतं. या निवडणुकीत वल्याळांना डावलल्याने भाजपचे फार मोठे नुकसान होणार होते. ते टाळण्यासाठी आपण पॅनल उभे करत आहोत... वगैरे सगळी पार्श्वभूमी मी कथन केली.

माझं बोलून झाल्यानंतर मा.दादा या बैठकीत म्हणाले की, रामभाऊंना स्वतंत्र पॅनेलचा हा निर्णय का घ्यावा लागत आहे, याची मला व लक्ष्मीपतींना चांगलीच कल्पना आहे. भाजपप्रमाणेच तेलुगू भागातील संघाचेही खूप नुकसान होण्याची शक्यता आहे. म्हणून रामभाऊंनी विरोध केला. त्यातून या स्वतंत्र पॅनलचा विचार पुढे आला. असे असतानाही आम्ही दोघे या बैठकीला आलो आहोत. नंतर थोडा विचार विनिमय होऊन ती बैठक संपली. नाईलाजाने मलाही त्या पॅनलतर्फे उभं राहावं लागलं. पुढे निवडणुका पार पडल्या. सामान्य सभासदांशी माझा फारसा संबंध कधी आला नाही. त्यामुळे मी निवडून येऊ शकलो नाही. पण या निवडणुकीमुळे बंडखोर स्वयंसेवक म्हणून माझ्यावर शिक्का मात्र बसला. परिणामी सामान्य स्वयंसेवकांच्या मनात माझ्याबद्दल अनादराची भावना निर्माण झाली.

निवडणुका झाल्या. एक विषय संपला. आता आपलं नेहमीचं काम करत राहावं म्हणून मी आपला शाखेच्या मागे लागलो.

संघ शाखेमध्ये काम करताना एकच कार्यपद्धती, एकच ध्येय होते, हिंदू समाज संघटन. पण आर्थिक संस्था सुरू करताना त्यामध्ये संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्यातीलसंबंध भिन्न स्वरूपाचे असतात. पद, अधिकार, अधिकाराची उतरंड या संस्थेच्यादृष्टीने महत्वाच्या बाबी असतात. त्या असल्याही पाहिजेत. या सर्वांमध्ये ऐक्याची समान भावना कायम राखून संस्थेचं काम चालवायचं ही अवघड गोष्ट असते. संघाने चालवलेली संस्था म्हणून त्या संस्थेच्या कामाची जबाबदारी संभाळणाऱ्या स्वयंसेवकाला हे अवघड काम करावं लागे.

भिन्नभिन्न नाती असणाऱ्या प्रत्येक गटाशी आपुलकीचे संबंध ठेवणे हे अगदी नव्या स्वरुपाचे काम त्या संघ अधिकाऱ्याला करावे लागे. शाखेच्या कामाचा सराव असतो. पण हे वेगळं काम करताना त्याची कामाची कसोटी लागायची. संघाचं काम हे आता शाखांपुरतं मर्यादित नव्हतंच. अनेक क्षेत्रात ते विस्तारणार होतं. प्रत्येक क्षेत्राचा आवाका वेगळा, गरज वेगळी, कार्यपद्धती वेगळी, स्वभाव वेगळा, त्या क्षेत्राच्या गरजाही वेगळ्या होत्या. हा सगळा नित्य शिकण्याचाच मामला होता. भारतीय जनसंघाचं काम सुरू झालं. म्हणजे राजकीय क्षेत्र आलं. ते काम वाढवण्यासाठी राजकीय ज्ञान आवश्यक झालं. भारतीय मजदूर संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद या संघटनांचं कार्यक्षेत्र वेगळं, आवश्यकता वेगळी. कामाची पद्धत वेगळी. अशा सर्व क्षेत्रांना आवश्यक असे कार्यकर्ते मिळवायचे, शाखांमधून काही तरुणांना त्या दिशेने घडवायचे, हे एक आव्हानच होतं. इतकं व्यापक आणि अवघड काम शहर कार्यवाह, जिल्हा कार्यवाह यांना करावं लागे.

**- राम नागेश देशपांडे**

## बापमाणूस..!

दुसरीत होतो मी. दिवाळीच्या सुट्टीनंतर नुकतीच शाळा सुरु झाली होती. एक दिवस मधली सुट्टी संपली, तास सुरु झाला आणि वकिलीच्या वेषात दादा शाळेत आले. माझा वर्ग विचारून वर्गापाशी आले, लिमयेबाईचा तास सुरु होता. बाईना म्हणाले, दुपारी साडेतीनच्या शोची, परिचय सिनेमाची तिकीटं काढली आहेत, मी आनंदाला न्यायला आलोय. बाई त्यांच्याकडे बघतच राहिल्या. शाळा बुडवून पोराला सिनेमाला घेऊन जाणारे



वडील त्या पहिल्यांदाच बघत होत्या. सिनेमा तर बघितला पण दुसऱ्या दिवशी शाळेत जी पूजा झाली ती वेगळीच. दादांची माझ्या लक्षात राहिलेली ही एक खास आठवण.

त्यानंतर आले आणीबाणीचे पर्व. एकोणीस महिने दादा नाशिकरोड जेलमधे, मिसामधे राजबंदी. सगळेजण एकदोनदा पॅरोलवर घरी येऊन गेले. ह्यांनी कधीच अर्जही केला नाही.

कायम डोक्यात संघकामाचे विचार. कार्यकर्त्यांच्या अडचणी, जिल्हयाचे प्रवास. चुकून घरी असलेच तर संध्याकाळी आईला फर्मान सुटत असे, आज चार जण जेवायला आहेत. आज सहा जण जेवायला आहेत.

सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमधून पदवी, मग कुचन हायस्कूलमधे शिक्षक, दयानंद बीएड् कॉलेजचे प्रोफेसर, इंग्रजीवर कमांड असलेले वकील. पण हे सगळं पार्टटाईम, फुलटाईम संघ कार्यकर्ता. जवळजवळ सतरा वर्ष सोलापूर जिल्हयाचा जिल्हाकार्यवाह म्हणून जबाबदारी. कधी कधी मला वाटायचं, मी त्यांचा मुलगा म्हणून लक्षात राहण्याऐवजी विक्रमादित्य सायंशाखेचा कार्यकर्ता म्हणूनच त्यांच्या लक्षात असेन. सर्व क्षेत्रातली कार्यकर्त्याची फौजच्या फौज उभी करू शकणारा कार्यकर्ता. शहराच्या पूर्व विभागात काम वाढावं म्हणून तेलगु बोलायला शिकून घराघरापर्यंत संपर्क असणारे रामबाऊ.

०८/०८/१९४० ते ०८/०८/२०२६, आज दादांना शहाऐंशी वर्ष पूर्ण झाली, सत्त्याऐंशी सुरु झाले. या शहाऐंशी वर्षातली पहिली वीसेक वर्ष सोडली तर गेली साठेक वर्ष अखंड समाजकारण सुरू आहे. मी वकिल होण्याची वाटच पहात होते. मी नव्वद साली जेव्हा अंगावर कोट चढवला त्याच वर्षी त्यांनी कोट काढून ठेवला तो परत कधी घातला नाही. तूझं तू बघ, एवढाच संदेश. कोर्टातलं गुडवील एवढं मोठं की विरोधी बाजूचे वकीलसुद्धा रामभाऊंचा मुलगा म्हणून मला मदत करायचे. अफाट जनसंपर्क, कायम पडदयामागे राहून दुसऱ्यांना संधी द्यायची, दुसऱ्यांना मोठे करण्याची आवड. त्यामुळे तोटेही अनेक. आजही एखाद्या कार्यकर्त्याला फोन केला की कमीत कमी अर्ध्या तासाची निश्चिती.

अखंड उत्साह, सतत डोक्यात नवनवीन विचारांची कारंजी, अचूक माणूस हेरून त्याच्यातल्या क्षमता ओळखून त्याला नेमक्या कामात गुंतवण्याची हातोटी. स्वतःच्या वतनदार असण्याचा, देशपांडे घराण्याचा माज नाही आणि आजपर्यंत मध्यमवर्गीयच राहिल्याची खंत नाही. व्यक्तिमत्वात एकाच गोष्टीची कमी, ते म्हणजे व्यवहारीपणा. ऐन उमेदीच्या काळात पुण्यासारख्या ठिकाणी मिळत असलेली प्राध्यापकाची नोकरी सोडून हा माणूस शिक्षक संघटनेचं काम करत राहिला. गमावलेल्या संधीचं, केलेल्या त्यागाचं यत्किंचितही दुःख नाही. असा माणूस वडील म्हणून लाभल्याचा मला गर्व आहे. खऱ्या अर्थाने तो माझा बापमाणूस आहे.

**- अॅड. आनंद राम देशपांडे**

# ... असा मिळाला शिवस्मारकचा बांधकाम परवाना!

शिवस्मारकाच्या इमारतीचा नकाशा पुण्याचे श्री साठे नावाच्या आर्किटेक्टने तयार केला होता. तो नकाशा व इतर काही आवश्यक कागदपत्रे यांची फाइल तयार करून श्री चंद्रकांत जक्कल यांनी महापालिकेत दाखल केली. संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी भेटून तो मंजूर करण्याची वारंवार विनंती केली. पण सलग तीन वर्षे जाऊनही फाइल पुढे सरकेना. याचे खरे कारण श्री जक्कलांच्या लक्षात आले नाही. महापालिका कर्मचाऱ्यांच्यामध्ये दोन गट होते. एक गट होता लिंगायत आणि दुसरा इतर सर्वांचा. लिंगायत गटामध्ये सगळे प्रमुख अधिकारी होते. शिवस्मारकाचे काम म्हणजे जक्कलांचे काम या समजुतीतून ती फाईल पुढे सरकली नाही.

काही कामानिमित्त महापौर



श्री बाबुराव चाकोते याना मी भेटायला गेलो होतो. त्या कामासंबंधी बोलून झाल्यावर सहजपणे मी बाबुरावाना बोलून गेलो की, आमच्या शिवस्मारकाच्या बांधकाम परवान्यांचे काम गेली तीन वर्षे अडून पडले आहे, ते जरा बघाल का? बाबुराव म्हणाले, उद्या संध्याकाळी चार वाजता मला महापालिकेत येऊन भेटा. बरोबर चार वाजता मी महापौर कार्यालयात बाबुरावांना भेटलो. त्यांनी लगेच त्यांच्या शिपायाला संबंधित फाईल घेऊन यायला सांगितले. पंधरा मिनिटांत शिपाई फाईल घेऊन आला.

बाबुरावांनी संबंधित फाईल घेऊन त्यांच्या शिपायाला बांधकाम विभागाकडे पाठविले. शिपाई ती फाईल घेऊन संबंधित अधिकाऱ्याकडे घेऊन जायचा आणि तो अधिकारी कामपूर्तीची नोंद करायचा... अशा तीन अधिकाऱ्यांकडे ती फाईल फिरत गेली.. तिघांनीही त्यांचे शेरे मारले... आणि हे काम बिनबोभाट झाले. चौथ्या टेबलवर मात्र ते काम अडले.

संबंधित चौथ्या अधिकाऱ्याने महापौरांना फोनवरून सांगितले की, या अर्जावर सिटी इंजिनीअर यांचा प्रथम आदेश असायला हवा. बाबुरावांनी कानडी भाषेत गोड शिवी देऊन त्याला त्याच्या टेबलपुरता शेरा मारायला सांगितले. शिवीच्या शब्दाने योग्य तो परिणाम झाला. त्याने त्याच्या खात्यापुरता शेरा मारला. तोपर्यंत त्या खात्यात गोंधळ उडाला आणि ती फाईल पुढील दोन अधिकाऱ्यांकडे सरकली. संबंधित अधिकाऱ्यांनी महापौरांचे प्रेमळ शब्द ऐकायच्या ऐवजी आपापल्या टेबलाचे काम केले.

सहाव्या टेबलच्या अधिकाऱ्याने महापौरांना सांगितले की, सिटी इंजिनिअर श्री रेगलसाहेब घरी गेले आहेत. त्यांची सही उद्या घ्यावी लागेल. महापौरांनी विचारले श्री रेगलच्या नंतर अधिकारी कोण आहे ? त्या अधिकाऱ्याने महापौरांना सांगितले की, ते अधिकारीदेखील रेगल साहेबांच्या बरोबर घरी गेले. महापौरांनी विचारले त्यांच्या नंतरचे अधिकारी कोण आहेत ? अधिकाऱ्याने सांगितले श्री मोहन औरंगाबादकर हे तिसरे अधिकारी आहेत. ते टेबलवर आहेत. महापौरांनी औरंगाबादकरांना सांगितले की, तुम्ही रेगलसाहेबाच्याकरिता सही करा. श्री औरंगाबादकर म्हणाले मी तिसऱ्या क्रमांकाचा अधिकारी आहे. मला सही करता येणार नाही. मला तो अधिकार नाही. महापौर म्हणाले पाच मिनिटात मी तिथे येतो. महापौर जर आले तर काय होईल ? या भीतीने औरंगाबादकरांनी सही केली. महापौरांना फोन केला की साहेब, दोन मिनिटात फाईल घेऊन येतो. फाईलवर सही करून औरंगाबादकर फाईल घेऊन शिपायाच्या अगोदरच महापौर कार्यालयात पोहोचले.

महापौरांनी हसून त्यांचे स्वागत केले आणि सही केल्याबद्दल आभार मानले. हुश्श...करत औरंगाबादकर त्वरेने परतले. नंतर बाबुरावांनी मला सांगितले की, रामभाऊ माझ्या बालपणी मी शाखेत जात होतो. एक पुण्य कार्य केल्याबद्दल मला समाधान आहे पण त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. बाबुरावांनी आग्रहाने मला बसायला सांगितले. शिपायाला चहा आणायला सांगितले... हा सर्व प्रकार एक चमत्कारच नाही का ?

**- राम नागेश देशपांडे**

# शिवस्मारक आणि जनता बँक

> कुणाच्या घरचे टेबल्स, कुणाच्या घरच्या खुर्च्या, कोणाची घरची कपाटे असं सगळं साहित्य जमवून बँकेच्या कार्याचा शुभारंभ केला. या मंडळींनी संघाच्या तरुण कार्यकर्त्यांकडून शेअर्स गोळा केले. याकाम त माझाही सहभाग होता. शहरातील वेगवेगळ्या भागातून शेअर्स गोळा करण्यात आले. संघाच्या कार्यकर्त्यांना हे क्षेत्र नवीन होतं.




संघाच्या सर्व तालुका कार्यकारिणीसह जिल्हा कार्यकारिणीची एक मोठी निवासी बैठक घ्यायची होती. त्यासाठी मोठे सभागृह, बाकीच्या सर्व व्यवस्था असलेली जागा हवी होती. अशी मोठी अडचण असली की, डॉ.भैयासाहेब वळसंगकर हे माझा नेहेमीचा आधार होते. त्याप्रमाणे डॉक्टरांना भेटायला त्यांच्याओपीडीत गेलो. अडचण सांगताच भैय्यासाहेब म्हणाले, अशा कार्यक्रमाकरिता आपली हक्काची जागा हवी. आपल्या बँकेची भव्य अशी वास्तू उभी राहिली की, हा प्रश्न कायमचा सुटेल म्हणून बँकेचे संचालक सध्या जागा शोधताहेत. अशी जागा शहराच्या मध्यवर्ती वस्तीत एसटी स्टँन्ड, रेल्वे स्टेशन जवळ असलेली हवी. शहराबाहेरच्या वस्त्यांमध्ये असे प्लॉट मिळतात. पण ते आपल्या उपयोगाचे नाहीत. यावर मी म्हणालो, भैय्यासाहेब आपली शिवस्मारकाची जागा आहे नां? पण तिथले प्रमुख आपल्याला सहकार्य करण्याची शक्यता नाही. त्यांचा अनुभव. यावर मी म्हणालो, मी प्रयत्न करू का? ते म्हणाले तुम्हाला जर यश आले तर सुगंधी दुधात साखर असे होईल.

माझ्या कामासाठी म्हणजे आत्ताच्या बैठकीसाठी त्यांनी मला दोन-तीन जागा सांगितल्या. म्हणाले तुम्हाला जी पसंत पडेल ती निश्चित करा. मग आपण ती मिळविण्याचा प्रयत्न करू. दोन मोठे प्रश्न घेऊन मी डॉक्टरांचा निरोप घेतला.

मी प्रथम शिवस्मारकात गेलो. तिथले प्रमुख दोन-तीन लोकांशी बोलत होते. मी त्यांना म्हणालो, मी पुन्हा येतो. कारण, माझा विषय खूप मोठा आहे. चर्चा करण्यासाठी बराच वेळ लागेल. ते म्हणाले, या लोकांशी माझे बोलणे झालेलेच आहे. तुम्ही बसा. आपण आताच बोलू. दहा-पंधरा मिनिटांत त्यांनी आलेल्या लोकांचा विषय संपविला. सेवकाला सांगून चहा सांगितला. फारशी प्रस्तावना न करता मी एकदम विषयालाच हात घातला. म्हणालो की, शिवस्मारकाचे बांधकाम सोपे नाही... मला तोडत ते म्हणाले, तुम्ही बांधकाम परवाना आणून दिल्यापासून मी प्रयत्न करतो आहे. पण अजून यश येत नाही.. मी म्हटलं, आपली जनता बँक आहे, तिचा विचार तुम्ही का करत नाही... ते म्हणाले, आपली बँक एवढं मोठं कर्ज देऊ शकणार नाही. चेअरमन आणि जनरल मॅनेजर आपल्याला जमू देणार नाहीत. मी म्हणालो, आपल्याला प्रयत्न करायला काय हरकत आहे. तुम्ही एक काम करा. बँकेला द्यायचा अर्ज लिहून तयार ठेवा. मी संध्याकाळी घेऊन जातो. जनरल मॅनेजरच्या घरी जाऊन त्यांना भेटतो.

ठरल्याप्रमाणे संध्याकाळी मी त्यांना पुन्हा भेटलो. त्यांनी अर्ज लिहून पाकीट तयार ठेवले होते. ते घेऊन मी दयानंद कॉलेजवळील स्टेट बँकेच्या कॉलनीत मॅनेजरच्या घरी गेलो. नुकतेच ते बँकेतून आले होते. त्यांच्या पत्नीने नुकताच तयार केलेला गरम गरम चिवडा खायला दिला होता. मी गेल्यावर त्यांनी पत्नीला हाक मारली आणि माझ्याकरताही चिवडा घेऊन यायला सांगितले. त्यांना चिवडा न देऊन कसे चालेल... असं म्हणत वहिनींनी हसतहसत चिवडा, सोबत खोबऱ्याच्या वड्या आणून दिल्या. बऱ्याच दिवसांनी चक्कर टाकलीत... त्या. तुमच्या यजमानांना बँकेचं बरंच काम असतं... म्हणून थोडं येणं कमी केलं... मी.

मी बोलायला सुरुवात केली. थेट विचारलं, हेड ऑफिसकरीता जागेचा शोध कुठपर्यंत आला? बऱ्याच जागा पाहून झाल्या. पण सर्व संचालकांना पसंत पडेल अशी जागा मिळेना. शिवस्मारकाच्या जागेचा प्रयत्न केला का? मी. त्यावर मॅनेजरसाहेब म्हणाले, ती जागा एकदम उत्तमच आहे. पण तिथले प्रमुख आपल्याला जमू देणार नाहीत. मी म्हणालो, मी प्रयत्न करू का? तुम्ही हे जमवलं तर तुम्हाला किलोभर पेढे देईन... त्यांचं वाक्य संपण्यापूर्वीच मी खिशातून पाकीट काढलं आणि त्यांच्या हातात दिलं.

पाकिटातलं पत्र वाचून आश्चर्याने ते उभेच राहिल. त्यांना क्षणभर काय बोलायचे सुचेना. ते म्हणाले, चला रामभाऊ, चेअरमन भैय्यासाहेबांकडे जाऊ. त्यांनी बायकोला सांगितलं काही तरी गोडधोड कर. रामभाऊ जेवायला आहेत. मी माझी सायकल तिथेच ठेवली. त्यांच्याबरोबर कारमध्ये निघालो. भैय्यासाहेबांना ओपीडीत पाहिले. ते नव्हते. नुकतेच घरी गेल्याचे कळले. त्यांचे घर जवळच होते. आम्ही त्यांना घरी गाठले.

डॉक्टरांनी आम्हाला पाहून एवढे खुशीत का आहेत असे विचारले. मॅनेजर साहेबानी काही न बोलताच पाकीट त्यांच्या हातात दिले. नंतर जवळजवळ अर्धा तास आनंदाच्या वातावरणात आमची चर्चा झाली. भैय्यासाहेबांनी त्यांच्या पत्नीला सांगितलं घरात काही गोड असेल तर अगोदर दे. नंतर मस्तपैकी कडक चहा कर. चहा घेऊन मी व मॅनेजर डॉक्टरांचा निरोप घेऊन निघालो. पुढच्याच आठवड्यात बँकेच्या संचालकांची मीटिंग झाली. संघ परिवाराच्या दोन महत्वाच्या संस्था एकत्रित येऊन एक मोठा प्रकल्प उभा करणार असं ठरवलं. त्यानुसार पुढच्या हालचाली सुरू झाल्या.


प्राथमिक एक-दोन बैठका झाल्यानंतर तिसऱ्या बैठकीत त्यांनी मला बोलावले. दोन्ही संस्थांनी माझे आभार मानले. प्रकल्पाचा तपशील ठरला. पुढच्याच आठवड्यात दोन्ही संस्थांमध्ये करार करण्यात आला.

संघ परिवारातील दोन मोठ्या संस्था एकत्र येऊन एक मोठा प्रकल्प उभा करतात.. आणि सोलापूरच्या मध्यवर्ती भागात लॅण्डमार्क ठरावी अशी वास्तू निर्माण करतात... या सगळ्या प्रक्रियेत माझी छोटी भूमिका होती, याचा आनंद आणि समाधान नक्कीच आहे..

**- राम नागेश देशपांडे**



















**चरैवेति चरैवेति**
**चरैवेति चरैवेति यही तो मंत्र है अपना ।**
**नही रुकना नही थकना सतत चलना सतत चलना ।**
**यही तो मंत्र है अपना शुभंकर मंत्र है अपना**

संघाच्या वरील पद्याच्या ओळींच्या अर्थाप्रमाणेच आयुष्यभर अखंड संघकार्यासाठी वाहून घेतलेले व्यक्तिमत्व म्हणजे माझे वडिल श्री राम नागेश देशपांडे म्हणजेच संघाच्या स्वयंसेवकांसाठी त्यांचे ' रामभाऊ' म्हणजेच आमचे दादा !

आज वयाची ८६ वर्षे पूर्ण होऊनही त्यांच्या मनात आणि णि डोक्यात कायम संघाचेच विचार असतात. त्यामुळेच संघासाठी आजन्म वाहून घेतलेला एक कट्टर स्वयंसेवक अशीच त्यांची ओळख करून द्यावी लागेल. जेव्हा त्यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्याचे ठरले, आणि माझ्या भावाने मला त्यांच्यावर लेख लिहायला सांगितला तेव्हा मला माझे वडिल म्हणून त्यांच्या फारशा काही आठवणी आठवल्याच नाहीत .. कारण माझ्या लहानपणी ते मला कायम संघाचेच काम करताना आठवतात . कधी ते माझ्या शाळेच्या कुठल्या कार्यक्रमाला आलेले आठवत नाहीत किंवा त्यांनी कधी आम्हाला फिरायला, सिनेमाला, नाटकाला, किंवा कुठे पर्यटनासाठी बाहेरगावी नेल्याच्या अशा काही आठवणीच नाहीत परंतू संघकामाच्या आठवणी मात्र अगणित आहेत. आणि त्या मी तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. एकूण ३०० पानांचे पुस्तक झाले म्हणजे केवढे अफाट काम त्यांनी केलेले आहे ते तुम्हाला पुस्तक वाचल्यावर कळेलच. मी तर लहानपणापासून ते पहात आलेले आहे आणि अजूनही त्यांचे संघकार्य थांबलेले नाहीच; तर तब्येत सांभाळून, वेळप्रसंगी माझा आणि भावाचा राग पत्करूनही त्यांचे संघकार्य सुरुच असते.

जवळजवळ सतरा वर्षे सोलापूर जिल्हा कार्यवाह असल्याने माझ्या लहानपणापासून मला आठवते की आमचे घर म्हणजे बैठका आणि प्रचारकांच्या येण्याचे, जेवण्याचे हक्काचे स्थान होते. दिवसाची, रात्रीची कुठलीही वेळ असो घरी आलेला प्रचारक कधीही न जेवता परत गेला नाही. एक अतिशय महत्वाची बाब इथे सुरुवातीलाच नमूद करावीशी वाटते की माझ्या आईने दादांना अतिशय समर्थपणे साथ दिली. लोकांचे सतत घरी येणे जाणे, बैठका, सतत होणारे चहापाणी, नाश्ता तसेच रात्री अपरात्री कोणीही प्रचारक आला तरी त्याला पिठलं भाकरी करून वाढणारी अशी माझी आई तिने कधीही या सगळ्याबाबत नाराजीचा सूर काढला नाही. तिने दादांचा संसार नोकरी करून अतिशय कुशलतेने सांभाळला. त्यामुळेच दादा पूर्णवेळ संघकामाला देऊ शकले. माझ्या लहानपणीच्या आठवणी म्हणजे दादांचा सततचा सुरु असणारा प्रवास . त्यामुळे ते एका ठिकाणावरून आले की त्यांच्या बॅगेतून वापरलेले कपडे काढून नवीन कपडे ठेवून मीच त्यांची बॅग भरून दिली की ते लगेच दुसऱ्या गावाला निघून जायचे. दसऱ्याला संघाचे पथसंचलन असते त्यामुळे त्यांच्या गणवेशाची तयारी करणे, त्यांच्या

गणवेशाच्या पट्ट्याचे पितळेचे बक्कल ब्रासोने घासून चकाचक करून ठेवणे, त्यांचे बूट तयार करून ठेवणे ही कामे मी केलेली आठवतात .

संघाचे काम हे प्रामुख्याने आणि मग अधूनमधून जमलेच आणि वेळ मिळाला तर वकिली हा व्यवसाय म्हणून त्यांनी केला. त्यातही समाजकार्यच जास्त असायचे. प्रसंगी स्वतःची पदरमोड करून गरीब लोकांच्या कामे त्यांनी केली. सकाळी सात वाजल्यापासून लोकांचा राबता आमच्या घरी सुरु होत असे. दादांच्या स्वभावामुळे अनेक संघ स्वयंसेवकांचे आमच्या घराशी आगदी आपुलकीचे आणि मायेचे नाते निर्माण झालेले होते . डॉ. भैय्याराव गौतम, मधुभाई कुलकर्णी, तात्या जोगळेकर, सुरेशराव केतकर, दादा शेळगीकर, डॉ. वळसंगकर, दत्तोपंत कुलकर्णी, शांतीलालजी जैन अशी कितीतरी नावे घेता येतील . या सगळ्यांशीच खूप जिव्हाळ्याचे संबंध होते यांच्यापैकी एक तात्या जोगळेकर. यांच्याशी तर अजूनही



# चरैवेति चरैवेति

आमचे दोघांचे अजूनही तेवढेच मायेचे नाते आहे. मी पुण्यात होते तेव्हा नंतर नाशिकला होते तेव्हा आणि आता ठाण्यात आहे तेव्हाही तात्या माझ्या सगळ्या घरी येऊन गेलेले आहेत. अधूनमधून फोनद्वारे आमचा संपर्क होतोच.

घरचे वातावरण संघाचे असल्यामुळे माझा मोठा भाऊ पण शाखेत जायचा आणि मी पण लहानपणापासूनच राष्ट्र सेविका समितीचे काम करत असे .

रा. स्व संघाने आत्ताच पंच परिवर्तनाची जी संकल्पना मांडली आहे त्यातील जो सामाजिक समरसता हा आयाम आहे तो आमच्या दादांनी अनेक वर्षापूर्वीच अंमलात आणलेला होता. जळगावच्या वनवासी भागातील अर्जुन पाडवी नावाचा मुलगा त्यांनी शिक्षणासाठी आमच्या घरी आणलेला होता. आणि ३ वर्ष तो आमच्याच घरी राहिला होता. हे आजकालच्या जमान्यात कुणालाही सांगून खरे वाटेल का? आमचे घर पण तेव्हा दोनच खोल्यांचे होते. पण काय होईल कसे होईल याचा विचारही त्यांनी तेव्हा केला नाही. संघाची तत्वे आणि कार्यप्रणाली आचरणात आणायची ती अशी! पंच परिवर्तनातील अजून एक गतिविधी म्हणजे पर्यावरण संरक्षण. दादांच्या मूळ गावी सांगोला तालुक्यात त्यांनी स्वतःचे १ लाख ६८ हजार रुपये खर्च करून एकूण साठेअठरा हजार आंब्याची, चिंचेची व शेवग्याची रोपे लावली होती. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्याच्या ७७ गावांमध्ये एकाच दिवशी ५ हजार रोपे लावण्यात आली. कायमच कोणत्या ना कोणत्या ध्येयाने झपाटलेले असे हे व्यक्तीमत्व! त्यामुळेच अनेक जबाबदाऱ्या त्यांनी स्विकारल्या आणि यशस्वीपणे पारही पाडल्या. अजूनही वयाच्या या टप्प्यावर असूनही त्यांचे विचार हे काळाच्या पुढे असतात. एक पिता म्हणून आम्हाला दोघांना ते फार वेळ देऊ शकले नाहीत याची त्यांना आता खंत वाटत रहाते. कधीतरी माझ्याजवळ ते बोलूनही दाखवतात तसे; पण मग मीच त्यांना म्हणत असते की ठीक आहे दादा. तुम्ही आम्हाला वेळ दिला नाहीत त्यामुळे आम्ही दोघे भावंडे खूप लवकर आत्मनि निर्भर होऊ शकलो. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास शिकलो. समाजामध्ये आत्मविश्वासाने कसे वावरायचे हेही शिकलो. आताचे पालक मुलांना खूप जपतात. त्यांना फारसे बाहेरचे अनुभव देत नाहीत. पण दादांनी आम्हाला नकळतपणे बऱ्याच गोष्टी शिकवल्या. आमच्या घरात वेगवेगळ्या स्तरातील लोक येत असत. त्यांच्याशी कसे बोलायचे, कसे वागायचे, कामाचे काही निरोप असतील तर ते दादांपर्यंत व्यवस्थित कसे पोहोचतील याची काळजी घ्यायची हे सगळे आम्ही नकळतपणे शिकत गेलो. 'त्यामुळेच आमचे दोघांचेही संवादकौशल्य खूप चांगले होत गेले. दादांचा जनसंपर्क प्रचंड मोठा असल्याने खेडेगावातील शेतकऱ्यापासून ते समाजातील

प्रतिष्ठित डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक हे सगळेच घरी येत असल्याने आमचा व्यक्तीमत्व विकास हा हळूहळू घरातच होत होता.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने यावर्षी र्षी १०० वर्षे पूर्ण केली. कोणत्याही संघटनेसाठी हा खूप मोठा टप्पा आहे. आणि स्वयंसेवकांच्या ज्या पिढीने 'पत्थर पायातील असू दे कुठेतरी स्मरणात 'या स्तरावर काम केले त्या पिढीचे प्रतिनिधीत्व आमच्या दादांनी केलेले आहे असे मला इथे अभिमानाने सांगावेसे वाटते


माझ्या आणि माझ्या भावाच्या शिक्षणाकडे त्यांना त्या काळी फारसे कधी लक्ष देता आले नाही पण आज दोन्ही नातींचा प्रतिवर्षी वाढत जाणारा प्रगतीचा आलेख पाहून त्यांचे आजोबा मनोमन सुखावतात. दोन्ही नातींच्या अभ्यासाकडे व त्यांच्या अभ्यासेतर उपक्रमाकडे त्यांचे लक्ष असते. दोघींनाही फोन करून ते त्यांच्या सगळ्या घडामोडींचा आढावा घेत असतात .

'तन समर्पित मन समर्पित और यह जीवन समर्पित 'याच भावनेने आपले जीवन संघासाठी आणि राष्ट्रासाठी वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांची जी फळी होती त्या पिढीला वय झाले तरी अजून काही न करता बसून रहाणे जमतच नाही. त्यामुळे अजूनही दादा संघाच्या कार्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना, प्रचारकांना जमेल तसे भेटत असतात. अगदीच प्रत्यक्ष भेटता आले नाही तरी फोनवरून संपर्क ठेवून असतात. पण फोनपेक्षा सगळ्यांना घरी बोलावून मस्तपैकी जेवणावर ताव मारत गप्पा मारायला त्यांना जास्त आवडते. माणसे जोडणारा आणि णि माणसे जपणारा असा हा स्वयंसेवक

शेवटी मी इतकेच म्हणेन 'मातृमंदिर का समर्पित दीप मैं । चाह मेरी यह की मैं जलता रहूँ। या काव्यपंक्तिप्रमाणे असेच संघाचे काम करण्यासाठी त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभावे हीच श्री विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना !!!

।। भारतमाता की जय ।।


**- सौ. गौरी दिलीप बडवे**
(ठाणे महानगर बौद्धिक प्रमुख)
राष्ट्र सेविका समिति



ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
ॲड.निलेश जोशी
ॲड.शिल्पा निवृत्तीनाथ कुलकर्णी





ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
* शुभेच्छुक *
ॲड. बाबासाहेब जाधव
माजी अध्यक्ष : सोलापूर बार असोसिएशन
माजी खजिनदार : सोलापूर बार असोसिएशन
माजी उपाध्यक्ष : सोलापूर बार असोसिएशन
माजी उपाध्यक्ष : कौटुंबिक न्यायालय


ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
* शुभेच्छुक *
ॲड.आनंद कुर्डूकर





ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
ॲड.प्रदिपसिंह रजपूत
जिल्हा सरकारी वकील
ॲड. अजिंक्य जाधव, ॲड.अशोक श्रीवास्तव
ॲड.सुरज चंद्रबंसी, ॲड.नेहा उरूट
ॲड.सोनिया पराग, ॲड.भानुदास कोळी
ॲड.हरिओम नाईक


ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
* शुभेच्छुक *
ॲड.वृत्तुसिंग पवार
ॲड.उदित वृत्तुसिंग पवार


ज्येष्ठ विधिज्ञ
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड.उमेश बाळकृष्ण मराठे
ॲड.यशश्री अजिंक्य मराठे
ॲड.विजय भास्कर मराठे
ॲड.अजिंक्य उमेश मराठे


ज्येष्ठ विधिज्ञ
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड.ओंकार गुरव
ॲड.गौरव आरणे
ॲड.जेहेरिया शेख
ॲड.पुजा म्हेत्रे
ॲड.पांखुरी देशपांडे (कुळकर्णी)
ॲड.सुभाष देशपांडे
ॲड. आश्लेष देशपांडे


ज्येष्ठ विधिज्ञ
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड.रघुनाथ दामले
ॲड. ओम कुलकर्णी । ॲड.मोनिका दामले । ॲड. लतू बाबलादे

ज्येष्ठ विधिज्ञ माननीय
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
ॲड.नागेंद्र आर. खंडाळ
ॲड.राहुल नागेंद्र खंडाळ
१०० पेक्षा जास्त केसेस निर्दोष सोडविल्याप्रकरणी ॲड.राहुल खंडाळ यांची गिनीज बुकमध्ये नोंद

ज्येष्ठ विधिज्ञ
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड.अभिजीत पाळंदे, ॲड.गिताराणी घनाते,
ॲड.पवन भालेदार, ॲड.वर्षा दुडम,
सुवर्णा करपे, राणी पाटील,
आनंद दुधगुंडी, सुभाष मंगरुळे,
प्रकाश जाधव
ॲड.विजय ह.पाळंदे

ज्येष्ठ विधिज्ञ
मा.रामभाऊ देशपांडे
यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
ॲड. इंद्रजित (आय.बी.) पाटील
ॲड.सारंग इंद्रजित पाटील